भारत सरकार

विधि, न्याय व कंपनी कार्य मंत्रालय

सत्यमेव जयते

# संपदा शुल्क अधिनियम, १९५३

## (१९५३ चा अधिनियम क्रमांक ३४)

[ १ ऑक्टोबर, १९७७ रोजी अंमलात असल्याप्रमाणे ]

# The Estate Duty Act, 1953

## (Act No. 34 of 1953)

[*As in force on the 1st October, 1977*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले

( १९७९ )

[किंमत रु. १.७०]

# संपदा शुल्क अधिनियम, १९५३

## कलमांचा क्रम

प्रास्ताविका

कलमे

भाग १ ला

### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. निर्वचन.
४. संपदा शुल्क प्राधिकरणे.

भाग २ रा

### संपदा शुल्क बसवणे

### आकारणीची व्याप्ती

५. संपदा शुल्क बसवणे.
५क. हा अधिनियम विशोधित करणारे अधिनियम शेतजमिनींवरील संपदा शुल्काच्या बाबतीत लागू करणे.

### कोणती संपत्ती संक्रामित झाली असे मानले जाते

६. विल्हेवाटशक्तीच्या अंतर्गत असलेली संपत्ती.
७. मृत्यूबरोबर समाप्त होणारे हितसंबंध.
८. मरणासन्न दाने.
९. मृत्यूपूर्वी विवक्षित कालावधीमध्ये केलेली दाने.
१०. जेथे दात्याला सर्वस्वी वगळलेले नसते अशी दाने--मग ती केव्हाही दिलेली असोत.
११. मृत्यूपूर्वी विवक्षित कालावधीमध्ये मर्यादित हितसंबंधाची विल्हेवाट करणे.
१२. हक्क राखून केलेल्या संव्यवस्था.
१३. संयुक्त विनिधाने.
१४. आदात्यासाठी चालू ठेवलेली विमापत्रे.
१५. मृताने खरेदी केलेली किंवा दिलेली वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध.
१६. मृतामार्फत प्राप्त झालेल्या संपत्तीमधून खरेदी केलेली किंवा दिलेली वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध.

### कंपन्यांकडे करण्यात आलेल्या हस्तांतरणांशी संबंधित विशेष उपबंध

१७. नियंत्रित कंपनीकडे हस्तांतरित केलेली संपत्ती.
१८. कंपनीचे व कंपनीच्या अधिकाऱ्यांचे हस्तांतरकाच्या मृत्यूनंतर नियंत्रकाला माहिती देण्याचे कर्तव्य.
१९. कलम १७ खालील शुल्काची उगराणी व भार.
२०. सर्वसाधारणत: नियंत्रित कंपन्यांच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.
२०क. विवक्षित प्रकरणांत भारताबाहेर निगमित झालेल्या कंपन्यांचे कर्तव्य आणि दायित्व.

भाग ३ रा

### शुल्क-आकारणीला अपवाद

२१. विदेशी संपत्ती.
२२. मृताने विश्वस्त म्हणून धारण केलेली संपत्ती.
२३. जो हितसंबंध कब्जागत हितसंबंध होण्यापूर्वी निष्फळ होतो असा हितसंबंध.
२४. विल्हेवाटकर्त्याकडे प्रत्यावर्तित होणारी संपत्ती.
२५. विवाहसाथीच्या मृत्यूनंतर संव्यवस्थाबद्ध संपत्तीपासून मिळणारी प्राप्ती.
२६. पैशाच्या रूपातील संपूर्ण किंवा आंशिक प्रतिफलाच्या बदल्यात सद्भावपूर्वक केलेल्या खरेदीमुळे संक्रामित होणारी संपत्ती.
२७. नातेवाईकांच्या प्रीत्यर्थ केलेली विल्हेवाट.

२८. विवक्षित पूर्ववर्ती विक्री आणि गहाणे यांच्यावर नवीन व वाढीव शुल्कदरांचा परिणाम.

२९. संव्यवस्था केलेल्या ज्या संपत्तीच्या बाबत मृताच्या विवाहसाथीच्या मृत्यूनंतर संव्यवस्थेच्या दिनांकापासून संपदा शुल्क भरण्यात आले असेल ती संपत्ती.

२९क. विवक्षित प्रकरणीं पेन्शने, इ. ना सूट.

३०. संपदा शुल्काच्या संबंधात दुबार कराधान टाळण्यासाठी किंवा त्यातून सुटका देण्यासाठी करार.

३१. संपत्तीच्या त्वरित उत्तराधिकारासाठी मजरा.

३२. हिंदू विधवेचा जो हितसंबंध प्रत्यावर्ती मालकाकडे प्रक्रांत होतो त्याला सूट.

३३. सूट.

**भाग ४ था**

**संपत्तीची एकवट व शुल्काचे दर**

३४. एकवट.

३५. शेतजमीन अंतर्भूत असलेल्या संपत्तीवरील संपदा शुल्काचे दर.

**भाग ५ वा**

**आकारणीपात्र मूल्य**

३६. ऐन मूल्य अंदाजे कसे ठरवावे.

३७. अन्यक्रामणावर निर्बंध असेल त्यावेळी खाजगी कंपनीमधील शेअर्सचे मूल्यांकन.

३८. अपेक्षी हितसंबंधाचे मूल्यांकन.

३९. सहदायकी संपत्तीमधील जो हितसंबंध मृत्यूबरोबर समाप्त होतो त्याचे मूल्यांकन.

४०. मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या हितसंबंधामधून मिळणाऱ्या लाभांचे मूल्यांकन.

४१. मूल्यांकन नियंत्रकाने करावयाचे.

४२. मूल्यांकनाचा खर्च.

४३. नियंत्रकास मूल्यांकन स्वीकारता येईल व सोईस्कर असेल त्यावेळी प्रमाणित करता येईल.

**भाग ६ वा**

**वजाती**

४४. संपदेचे आकारणीपात्र मूल्य ठरवताना अंत्यसंस्कारांचा वाजवी खर्च आणि काही अपवाद करून ऋणे व बोजे यांबाबत मजरा देणे.

४५. वजातयोग्य ऋणांवरील मर्यादा.

४६. आणखी मर्यादा.

४७. परकीय देशात राहणाऱ्या व्यक्तींना देय असलेली ऋणे, त्या देशामधील दत्तशुल्क संपत्ती खेरीजकरून अन्य बाबतीत प्रथमच वजा करावयाची नाहीत.

४८. परदेशातील संपत्ती स्वाधीन करून घेण्याच्या किंवा तिचे प्रशासन करण्याच्या खर्चाबाबत विवक्षित मर्यादांमध्ये मजरा देता येईल.

४९. प्रतियोगी नसलेल्या देशात भरलेल्या शुल्काबाबत मजरा.

५०. मृताच्या संपदेचे प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी न्यायालय फी भरण्यात आली असेल तर संपदा शुल्कात सवलत.

५०क. दान-कर भरण्यात आलेला असेल तर संपदा शुल्कात सवलत.

५०ख. भांडवली लाभांवर कर भरण्यात आलेला असेल तर संपदा शुल्कात सवलत.

**प्रकरण ७ वे**

**शुल्काची उगराणी**

५१. शुल्काच्या उगराणीची पद्धत.

५२. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारा शुल्काचा भरणा.

५३. उत्तरदायी व्यक्ती आणि त्यांची कर्तव्ये व दायित्वे.

५४. विवक्षित प्रकरणांत, उत्तरदायी व्यक्तींमध्ये विश्वस्त समाविष्ट असू शकतील.

५५. जिच्याकडे कब्जा असल्याचे समजले जाते अशा प्रत्येक व्यक्तीने, नियंत्रकाकडून मागणी होईल त्याप्रमाणे संपत्तीच्या तपशिलाचे विवरणपत्र द्यावयाचे.

५६. नियंत्रकास तपशील पुरवण्यात आल्याशिवाय प्रतिनिधित्व, इ. प्रदान करावयाचे नाही.
५७. पक्के निर्धारण करण्यापूर्वी तात्पुरते निर्धारण करण्याची शक्ती.
५८. निर्धारण.
५९. निर्धारणातून निसटलेली संपत्ती.
६०. कसूर किंवा लपवणूक याबद्दल दंड.
६१. चुकांची दुरुस्ती.
६२. नियंत्रकाच्या आदेशांविरुद्ध अपील.
६३. अपील नियंत्रकाच्या आदेशावर अपील अधिकरणाकडे अपील.
६४. उच्च न्यायालयाकडे निर्देशन.
६५. सर्वोच्च न्यायालयाकडे अपील.
६६. उच्च न्यायालयाकडे निर्देशन केले असता प्रतिनिधित्वाचे प्रदान करण्यास विलंब लावावयाचा नाही.
६७. संपदा शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र.
६८. अपेक्षी हितसंबंधाच्या बाबतीत शुल्काचे परिवर्तन.
६९. गुंतागुंतीच्या प्रकरणांतील निर्धारण.
७०. भरणा पुढे ढकलण्यास नियंत्रक सशर्त मुभा देऊ शकेल.
७१. मृत्यू झाल्यापासून वीस वर्षांनंतर अदत्त राहिलेल्या शुल्कास व व्याजास मंडळ माफी देऊ शकेल.
७२. नमुने.
७३. शुल्क, दंड, इत्यादींच्या मागणीची नोटीस व वसुली.
७३क. निर्धारणाची किंवा फेरनिर्धारणाची कार्यवाही सुरू करण्यासाठी मुदत.

**भाग ८ वा**

**संपदा शुल्काचा संपत्तीवरील प्रभार आणि त्याबाबतचे पैसे उभारण्याबाबत सुविधा**

७४. संपदा शुल्क हा त्यास पात्र असलेल्या संपत्तीवरील पहिला प्रभार.
७५. विवक्षित प्रकरणांत संपदा शुल्कामधून विमुक्ती.
७६. विवक्षित प्रकरणांत उत्तरदायी व्यक्तीची विश्वस्तांनी किंवा मालकांनी परतफेड करावयाची.
७७. शुल्क भरण्यासाठी किंवा अगोदरच भरलेली रक्कम उभारण्यासाठी सुविधा.

**भाग ९ वा**

**संकीर्ण**

७८. विवक्षित प्रकरणांत न्यायालयांच्या अधिकारितेस आडकाठी.
७९. शपथेवर पुरावा घेणे, इत्यादींबाबतची शक्ती.
८०. निर्धारणांच्या बाबतीतील माहिती प्रकट करणे.
८०क. उत्तरदायी व्यक्तींच्या संबंधातील माहिती प्रकाशित करणे.
८१. माहिती पुरविण्यासाठी राज्यांबरोबर व्यवस्था.
८२. नोटिसा बजावणे.
८३. प्राधिकृत प्रतिनिधींच्या मार्फत उपस्थिती.
८४. कंपन्यांनी मृत व्यक्तीचा तपशील नियंत्रकास पुरवावयाचा.
८५. मंडळाच्या नियम करण्याबाबतच्या शक्ती.

पहिली अनुसूची.

दुसरी अनुसूची.

# संपदा शुल्क अधिनियम, १९५३

(१९५३ चा अधिनियम क्रमांक ३४)[१]

[६ ऑक्टोबर, १९५३]

**संपदा शुल्क बसवणे व त्याची उगराणी करणे यांबाबत उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

**भाग १ ला**

प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'संपदा शुल्क अधिनियम, १९५३' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार [२]*** संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा [३]दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(१) "मूल्यांकनाबाबतचा प्रतिज्ञालेख" याचा अर्थ, प्रतिनिधित्व प्रदान केले जाण्यासाठी केलेल्या अर्जाच्या संबंधात, 'न्यायालय फी अधिनियम, १८७०' (१८७० चा ७)-कलम १९ याखाली केलेला मूल्यांकनाबाबतचा प्रतिज्ञालेख असा आहे;

[४][(१क) "अपील नियंत्रक" याचा अर्थ, कलम ४ खाली 'संपदा शुल्क अपील नियंत्रक' म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती असा आहे;

(१ख) "अपील अधिकरण" याचा अर्थ, 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा ११)-कलम ५क खाली नियुक्त केलेले अपील अधिकरण असा आहे;]

(२) "मंडळ" याचा अर्थ, [५]['केंद्रीय महसूल मंडळ अधिनियम, १९६३' (१९६३ चा ५४) याखाली घटित केलेले केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ] असा आहे;

(३) "कंपनी" यामध्ये कोणत्याही निगम-निकायाचा समावेश आहे—मग तो कोणत्याही ठिकाणी निगमित केलेला असो;

(४) "नियंत्रित कंपनी" याचा अर्थ, कलम १७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेली कंपनी असा आहे;

(५) "नियंत्रक" याचा अर्थ, कलम ४ खाली संपदा शुल्क नियंत्रक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ती असा असून, त्यात 'संपदा शुल्क उप नियंत्रक' किंवा 'संपदा शुल्क सहायक नियंत्रक' म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीचा समावेश आहे;

(६) "मृत व्यक्ती" व "मृत" याचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मृत्यू पावणारी व्यक्ती असा आहे;

(७) "संपदा शुल्क" याचा अर्थ, या अधिनियमाखालील संपदा शुल्क असा आहे;

(८) "मृत्युपत्रव्यवस्थापक" याचा अर्थ, मृत व्यक्तीचा मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक असा आहे;

---

१. उद्देश व कारणे यांच्या निवेदनाकरिता पहा—**भारताचे राजपत्र**, १९५२, भाग दोन-विभाग २, पृष्ठ ४२२; आणि प्रवर समितीच्या अहवालाकरिता पहा—कित्ता, १९५३, भाग दोन-विभाग २, पृष्ठे २१० ते २४०.

हा अधिनियम १९६३ चा विनियम ३-कलम ३ व अनुसूची यांद्वारे काही बदलांसह दादरा व नगरहवेली, गोवा, दमण व दीव आणि पाँडिचेरी यांवर विस्तारित करण्यात आला आहे (१ एप्रिल, १९६३ रोजी व तेव्हापासून).

२. १९५४ चा अधिनियम ४१-कलम २(२) व अनुसूची यांद्वारे "जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून" हे शब्द गाळले.

३. १५ ऑक्टोबर, १९५३, पहा—**भारताचे राजपत्र**, १९५३, भाग दोन-विभाग ३, पृष्ठ १५९५ वर प्रकाशित झालेली अधिसूचना क्र. एस्.आर्.ओ-१८८२, दिनांक ८ ऑक्टोबर, १९५३.

४. १९५८ चा अधिनियम ३३-कलम२ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९६३ चा अधिनियम ५४-कलम ५ द्वारे "'कद्रीय महसूल मंडळ अधिनियम, १९२४' याखाली घटित केलेले केंद्रीय महसूल मंडळ" या मूळ मजकुराऐवजी घातले.

(९) "कुलमुखत्यारी" यामध्ये, ज्या मुखत्यारीमुळे किंवा प्राधिकारामुळे त्यांचा आदाता किंवा अन्य धारक, स्वत:ला योग्य वाटेल अशा प्रकारे संपत्ती विनियुक्त करण्यास किंवा तिची विल्हेवाट करण्यास समर्थ होतो त्या प्रत्येक मुखत्यारीचा किंवा प्राधिकाराचा समावेश आहे,--मग ते जीवित व्यक्तींच्या दरम्यानच्या लेखाअन्वये किंवा मृत्युपत्राअन्वये वापरण्याजोगे असोत वा दोन्हींच्या अन्वये वापरण्याजोगे असोत--पण यात, त्याने स्वत: न केलेल्या विल्हेवाटीअन्वये विश्वासाच्या भूमिकेतून वापरण्याजोगी किंवा गहाणधारक म्हणून वापरण्याजोगी असलेली कोणतीही मुखत्यारी वर्जिलेली आहे ;

(१०) "बोजे" यामध्ये गहाणे व समापनीय प्रभार यांचा समावेश आहे ;

(११) "अपेक्षित हितसंबंध" यामध्ये उर्वरित किंवा प्रत्यावर्ती हक्कसंबंध आणि निहित किंवा समाश्रित असा अन्य प्रत्येक भावी हितसंबंध यांचा समावेश आहे, पण त्यात पट्टा-समापनावर अवलंबून असणारे प्रत्यावर्ती अधिकार समाविष्ट नाहीत ;

(१२) "वैध प्रतिनिधी" याचा अर्थ, मृत व्यक्तीच्या संपदेचे विधिदृष्ट्या जी व्यक्ती प्रतिनिधित्व करते ती व्यक्ती असा आहे, आणि त्यात पुढील व्यक्तींचा समावेश आहे--

(एक) मृत्युपत्रव्यवस्थापक,

(दोन) या अधिनियमाखालील कोणत्याही आबंधनाचा संबंध येत असेल त्याबाबतीत, मृत व्यक्तीच्या संपदेचा किंवा तिच्या कोणत्याही भागाचा कब्जा घेणारी किंवा त्यात लुडबुड करणारी कोणतीही व्यक्ती, आणि

(तीन) मृत हा हिंदू कुटुंबातील सहदायाद असेल त्याबाबतीत, त्या कुटुंबाचा त्या त्या काळी कर्ता असलेली व्यक्ती;

[1][(१२क) "उत्तरदायी असलेली व्यक्ती" किंवा "उत्तरदायी व्यक्ती" याचा अर्थ, या अधिनियमाच्या अर्थानुसार संपदा शुल्काबद्दल उत्तरदायी असलेली व्यक्ती असा आहे, आणि त्यात, जिच्या बाबतीत मृताच्या संपदेच्या ऐन मूल्याच्या निर्धारणासाठी या अधिनियमाखाली कोणतीही कार्यवाही करण्यात आली आहे अशा प्रत्येक व्यक्तीचा समावेश आहे ; ]

(१३) "संपत्ती विनियुक्त करण्याची मुखत्यारी" याचा अर्थ, एखाद्या संपत्तीची विल्हेवाट कशी काय करावयाची ते ठरवण्याची, त्या संपत्तीचा मालक नसलेल्या व्यक्तीच्या ठायी निहित केलेली मुखत्यारी असा आहे ;

(१४) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

[1][(१४क) "प्रधान अधिकारी" याचा केंद्रीय, राज्य किंवा प्रांतीय अधिनियमाद्वारे स्थापित कंपनी किंवा निगम यांच्या संबंधातील अर्थ, व्यवस्थापक, व्यवस्थापन संचालक, व्यवस्थापन अभिकर्ता किंवा सचिव असा आहे, आणि त्यात कंपनी किंवा निगम यांच्या व्यवस्थापनाशी निगडित असलेल्या ज्या कोणत्याही व्यक्तीवर, तिला या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ प्रधान अधिकारी म्हणून मानण्याचा आपला उद्देश असल्याबद्दल नियंत्रकाने नोटीस बजावली असेल तिचा समावेश आहे ; ]

(१५) "संपत्ति" यामध्ये जंगम किंवा स्थावर संपत्तीतील कोणताही हितसंबंध, तिच्या विक्रीपासून मिळणारे उत्पन्न आणि त्या त्या काळी विक्रीच्या उत्पन्नाचे प्रतिरूप असलेला कोणताही पैसा किंवा गुंतवणूक यांचा समावेश आहे व तसेच त्यात, कोणत्याही पद्धतीने एका प्रकारामधून दुसऱ्या प्रकारामध्ये परिवर्तित केलेल्या कोणत्याही संपत्तीचा समावेश आहे.

**स्पष्टीकरण १.--**एखाद्या व्यक्तीने किंवा तिच्या संमतीने, खुद्द तिच्याविरुद्ध अथवा ज्या संपत्तीची विल्हेवाट करण्यास किंवा स्वत:च्या लाभासाठी जिच्यावर प्रभार किंवा भार लादण्यास ती सक्षम होती किंवा होऊ शकेल अशा संपत्तीच्या विरुद्ध बजावणीयोग्य असे कोणतेही ऋण किंवा अन्य अधिकार निर्माण करणे ही त्या व्यक्तीने केलेली विल्हेवाट असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा विल्हेवाटीच्या संबंधातील "संपत्ति" या शब्दप्रयोगात निर्माण केलेले ऋण किंवा अधिकार याचा समावेश असेल.

**स्पष्टीकरण २.--**मृताच्या खर्चाने ऋण किंवा अन्य अधिकार नष्ट करणे ही, जिच्या लाभासाठी ते ऋण किंवा तो अधिकार नष्ट करण्यात आला असेल अशा व्यक्तीप्रीत्यर्थ मृताने केलेली विल्हेवाट असल्याचे मानण्यात येईल, आणि अशा विल्हेवाटीच्या संबंधातील "संपत्ती" या शब्दप्रयोगात, ऋण किंवा अधिकार नष्ट करण्यामुळे प्रदान झालेल्या लाभाचा समावेश असेल;

(१६) "मृत्यूबरोबर संक्रामित होणारी संपत्ती" यात, मृत्यूनंतर लगेच किंवा काही कालांतराने, निश्चितपणे किंवा समाश्रितपणे आणि मूलत: किंवा पर्यायी प्रक्रांतिव्यवस्था म्हणून संक्रामित होणाऱ्या संपत्तीचा समावेश आहे, आणि "मृत्यूबरोबर" या शब्दात, "केवळ मृत्यूच्या संदर्भात विनिश्चित करता येण्यासारख्या काळी" या अर्थाचा समावेश आहे;

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

(१७) "सार्वजनिक धर्मादाय प्रयोजन" यात, भारताच्या राज्यक्षेत्रांतर्गत गरिबांना मदत, शिक्षण, वैद्यकीय मदत व सर्वसाधारणपणे सार्वजनिक उपयोगाच्या अन्य कोणत्याही उद्दिष्टाची अभिवृद्धी यांचा समावेश आहे ;

(१८) "प्रतिनिधित्व" याचा अर्थ, मृत्युपत्राचे संप्रमाण किंवा प्रशासनपत्र असा आहे ;

(१९) "संव्यवस्थाबद्ध संपत्ती" याचा अर्थ, नैसर्गिक किंवा विधिकल्पित अशा कोणत्याही व्यक्तींसाठी उत्तराधिकाराच्या मार्गाने नेमस्त झालेली किंवा न्यासविषय झालेली संपत्ती असा आहे,—मग अशी संव्यवस्था या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अंमलात आलेली असो किंवा त्यानंतर असो ; आणि "संव्यवस्था" याचा अर्थ, ज्याद्वारे संपत्तीची संव्यवस्था होते अशी, समर्पण किंवा स्थायी देणगी धरून कोणतीही विल्हेवाट असा आहे ;

(२०) "मूल्यांकनकर्ता" याचा अर्थ, कलम ४ खाली नियुक्त केलेला मूल्यांकनकर्ता असा आहे.

३. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी— निर्वचन.

(क) एखादी व्यक्ती स्वाधिकारी असती तर एखाद्या संपत्तीची विल्हेवाट करणे तिला ज्यामुळे शक्य झाले असते असा तिचा हक्कसंबंध किंवा हितसंबंध त्या संपत्तीत असेल किंवा तिला अशी कुलमुखत्यारी असेल तर, ती संपत्तीची विल्हेवाट करण्यास सक्षम असल्याचे मानण्यात येईल ;

(ख) मृताच्या हितसंबंधातून निष्पन्न होणारी विल्हेवाट—मग तिला अन्य कोणत्याही व्यक्तीची सहमती आवश्यक होती म्हणा किंवा नव्हती म्हणा—ही त्याने केली असल्याचे मानण्यात येईल ;

(ग) ज्या पैशाबाबत एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या संपत्तीवर प्रभार निर्माण करण्याची कुलमुखत्यारी आहे असा पैसा हा पहिल्या व्यक्तीला जिची विल्हेवाट करण्याची शक्ती आहे अशा त्या संपत्तीमधील हितसंबंध असल्याचे मानण्यात येईल ;

(घ) एखाद्या व्यक्तीचा अधिवास हा, जणू काही तिला 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३९) याचे त्या विषयावरील उपबंध लागू असावेत त्याप्रमाणे ठरवण्यात येईल.

(२) या अधिनियमाच्या २ ऱ्या व ३ ऱ्या भागामध्ये, विल्हेवाट करण्यात आलेला कोणताही हितसंबंध, काढलेले विमापत्र, जिची खरेदी किंवा तरतूद केली आहे अशी वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध यासंबंधीच्या किंवा संपत्तीचे केलेले कोणतेही दान, संव्यवस्था किंवा विल्हेवाट किंवा हस्तांतरण यासंबंधीच्या कोणत्याही निर्देशात, प्रकरणपरत्वे, असा कोणताही हितसंबंध, विमापत्र, वार्षिकी, दान, संव्यवस्था, विल्हेवाट किंवा हस्तांतरण यांचा समावेश आहे असा त्या निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल—मग याप्रमाणे विल्हेवाट करणे, विमा उतरवणे, खरेदी करणे किंवा तरतूद करणे या गोष्टी या अधिनियमाच्या प्रारंभाच्या पूर्वी केलेल्या असोत वा नंतर केलेल्या असोत.

[१][(३) शंका राहू नये यासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीबाबत या अधिनियमात असलेल्या निर्देशांत, अशा व्यक्तीच्या मृत्यूनंतर जी संपत्ती संक्रामित झाली आहे असे मानण्यात येते तिच्याबाबतच्या निर्देशांचा समावेश आहे असा त्यांचा अर्थ लावण्यात येईल.]

[२][(४) १ एप्रिल, १९६४ या दिवशी किंवा त्यानंतर करण्यात आलेले दान किंवा करण्यात आलेली विल्हेवाट किंवा साहिलेली हितसंबंधाची समाप्ती यांच्या संबंधात कलमे ९, ११ व ३३ यांमध्ये सार्वजनिक धर्मादाय प्रयोजन किंवा प्रयोजने यांबाबत असलेल्या कोणत्याही निर्देशात जे प्रयोजन समग्रपणे किंवा सारतः समग्रपणे धार्मिक स्वरूपाचे आहे ते समाविष्ट नाही असा त्या निर्देशाचा अर्थ लावण्यात येईल.]

४. (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी पुढीलप्रमाणे प्राधिकरणे असतील, ती अशी :— संपदा शुल्क प्राधिकरणे.

(क) मंडळ,

(ख) संपदा शुल्क नियंत्रक,

[३][(खख) संपदा शुल्क अपील नियंत्रक,]

(ग) मूल्यांकनकर्ता.

(२) केंद्र शासन स्वतःस योग्य वाटतील तेवढे संपदा शुल्क नियंत्रक नियुक्त करू शकेल आणि मंडळाने त्यांच्याकडे नेमून दिल्या असतील अशा संपदा किंवा असे संपदावर्ग आणि अशी क्षेत्रे यांच्याबाबत, ते नियंत्रक मंडळाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, आपली कार्ये पार पाडतील :

परंतु, मंडळ याबाबतीत करील अशा नियमांच्या अधीनतेने, ज्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांमध्ये मृताच्या संपदेचा कोणताही भाग असेल असा प्रत्येक नियंत्रक अशा संपूर्ण संपदेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या संबंधात, या अधिनियमाद्वारे नियंत्रकाला प्रदान करण्यात आलेल्यांपैकी कोणतीही शक्ती वापरू शकेल :

---

१. १९५४ चा अधिनियम १७-कलम ४ द्वारे घातले (१५ ऑक्टोबर, १९५३ रोजी व तेव्हापासून).
२. १९६५ चा अधिनियम १५-कलम १९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).
३. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ३ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

परंतु आणखी असे की, या अधिनियमाद्वारे नियंत्रकाला प्रदान करण्यात आलेल्या सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही शक्ती आपण याबाबत विनिर्दिष्ट केलेल्या एखाद्या नियंत्रकालाच वापरता येतील, अन्य कोणत्याही नियंत्रकाला नाहीत असे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे मंडळ निदेशित करू शकेल.

[1][(२क) केंद्र शासन स्वतःस योग्य वाटतील तेवढे संपदा शुल्क अपील नियंत्रक नियुक्त करू शकेल आणि मंडळ निदेशित करील अशा संपदा किंवा असे संपदावर्ग किंवा अशी क्षेत्रे यांच्याबाबतीत ते नियंत्रक, मंडळाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, आपली कार्ये पार पाडतील, आणि अशा निदेशांन्वये दोन किंवा अधिक संपदा शुल्क अपील नियंत्रकांकडे तीच संपदा किंवा तेच संपदा वर्ग किंवा तेच क्षेत्र नेमून दिलेले असेल त्याबाबतीत, करावयाच्या कामाचे वितरण आणि वाटप यासाठी मंडळ जे कोणतेही आदेश देईल त्यांनुसार ते आपली कार्ये पार पाडतील.]

(३) केंद्र शासन या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ मूल्यांकनकर्ते म्हणून काम करण्यासाठी पुरेशा संख्येत अर्हताप्राप्त व्यक्तींना या अधिनियमाच्या प्रारंभानंतर बारा महिन्यांच्या आत नियुक्त करील आणि त्यानंतर वेळोवेळी नियुक्त करू शकेल आणि अशा व्यक्तींच्या पारिश्रमिकासाठी आकारश्रेणी निश्चित करील.

(४) लोक सेवेतील आणि लोक पदांवरील व्यक्तींच्या सेवा-शर्तींचे विनियमन करणारे केंद्र शासनाचे नियम व आदेश यांच्या अधीनतेने, नियंत्रक आपली कार्ये पार पाडण्याच्या कामी आपणास सहाय्य करण्याकरिता आवश्यक असेल तेवढा कार्यकारी किंवा लिपिकीय कर्मचारीवर्ग नियुक्त करील.

(५) या अधिनियमाची अंमलबजावणी करण्यासाठी मूल्यांकनकर्त्यांखेरीज नेमलेले अन्य सर्व अधिकारी व व्यक्ती मंडळाचे आदेश, अनुदेश व निदेश यांचे पालन आणि अनुसरण करतील :

[2][परंतु, संपदा शुल्क अपील नियंत्रक, आपले अपीलविषयक कार्याधिकार वापरत असताना, त्याच्या विवेकाधिकारात हस्तक्षेप होईल अशाप्रकारे मंडळ असे आदेश, अनुदेश किंवा निदेश देणार नाही.]

## भाग २ रा

### संपदा शुल्क बसवणे

### आकारणीची व्याप्ती

संपदा शुल्क बसवणे.

**५.** (१) या अधिनियमाच्या प्रारंभानंतर मृत्यू पावणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या बाबतीत, यात यापुढे व्यक्तपणे उपबंधित केले असेल तेवढे सोडून इतर बाबतीत, या अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या [3][राज्यांमध्ये १ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी जी राज्यक्षेत्रे समाविष्ट होती त्यांमध्ये] असलेली शेतजमीन धरून अशा व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संव्यवस्था केलेल्या वा संव्यवस्था न केलेल्या सर्व संपत्तीचे यात यापुढे उपबंधित केल्यानुसार जे ऐन मूल्य असेल त्यावर कलम ३५ अनुसार निश्चित केलेल्या दरांनी 'संपदा शुल्क' या नावाचे शुल्क बसवण्यात येईल व ते भरावे लागेल.

(२) ज्या राज्यांच्या बाबतीत त्या राज्यांच्या विधानमंडळांनी त्या राज्यांमध्ये असलेल्या शेतजमिनींवरील संपदा शुल्काच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद २५२-खंड (१) खाली हा अधिनियम अंगीकृत करणारे ठराव पारित केले असतील अशा इतर कोणत्याही राज्यांची नावे केंद्र शासनाला **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पहिल्या अनुसूचीमध्ये जादा दाखल करता येतील आणि अशी कोणतीही अधिसूचना निघाल्यानंतर, अशाप्रकारे दाखल केलेली राज्ये ही, पोटकलम (१) च्या अर्थानुसार पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली राज्ये असल्याचे मानण्यात येईल.

[4][हा अधिनियम विशोधित करणारे अधिनियम शेतजमिनींवरील संपदा शुल्काच्या बाबतीत लागू करणे.]

[4][५क. (१) (एक) 'वित्त अधिनियम, १९५४' (१९५४ चा ७),

(दोन) 'कराधान कायदे (जम्मू व काश्मीरवर विस्तारण) अधिनियम, १९५४' (१९५४ चा ४१), आणि

(तीन) 'निरसन व विशोधन अधिनियम, १९५७' (१९५७ चा ३६),

यांच्याद्वारे या अधिनियमात करण्यात आलेली विशोधने, पश्चिम बंगाल आणि जम्मू व काश्मीर या राज्यांमधील शेतजमिनी खेरीजकरून, पण हस्तांतरित राज्यक्षेत्रांमधील शेतजमिनी धरून राज्यांमध्ये समाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रांमध्ये असलेल्या शेतजमिनींबाबतच्या संपदा शुल्काला, पूर्वोक्त अशा प्रत्येक विशोधन अधिनियमाद्वारे केलेली विशोधने ज्या ज्या दिनांकांना परिणामक झाली त्या त्या दिनांकी व तेव्हापासून लागू होतील व लागू झाली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, उक्त राज्यांपैकी कोणत्याही राज्यामध्ये समाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रांच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत, पूर्वगामी उपबंधांच्या आधारे उक्त विशोधने एरव्ही ज्या दिनांकाला परिणामक झाली असती त्या दिनांकानंतर, संबंधित विधानमंडळाने संविधानाचा अनुच्छेद २५२-खंड (१) याखाली ठराव

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ३ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).
२. कित्ता—कलम ३ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).
३. अनुकूलन आदेश (क्र. ३) १९५६ द्वारे "राज्यांमध्ये" याऐवजी घातले (१ नोव्हेंबर, १९५६ रोजी व तेव्हापासून).
४. १९६० चा अधिनियम १६-कलम २ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

पारित केला असेल तर, उक्त राज्यक्षेत्रांच्या त्या भागातील शेतजमिनींवरील संपदा शुल्काच्या बाबतीत उक्त विशोधने, हा अधिनियम शेतजमिनींच्या संबंधातील संपदा शुल्काला ज्या दिनांकास लागू झाला असेल त्याच दिनांकाला परिणामक झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) 'संपदा शुल्क (विशोधन) अधिनियम, १९५८' (१९५८ चा ३३) याअन्वये या अधिनियमात केलेली विशोधने [1]* * * पश्चिम बंगाल आणि जम्मू व काश्मीर या राज्यांतील राज्यक्षेत्रे खेरीजकरून राज्यांमध्ये समाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रांमध्ये असलेल्या शेतजमिनींच्या बाबतीत संपदा शुल्क बसवण्याच्या संबंधातही लागू होतील.

[3][ (२क) (एक) 'केंद्रीय महसूल मंडळ अधिनियम, १९६३' (१९६३ चा ५४),

(दोन) 'वित्त अधिनियम, १९६४' (१९६४ चा ५),

(तीन) 'कराधान कायदे (वसुली कार्यवाही चालू राहणे व त्या विधिग्राह्य करणे) अधिनियम, १९६४' (१९६४ चा ११),

(चार) 'प्रत्यक्ष कर (विशोधन) अधिनियम, १९६४' (१९६४ चा ३१),

(पाच) 'वित्त अधिनियम, १९६५' (१९६५ चा १०),

(सहा) 'वित्त (क्र. २) अधिनियम, १९६५' (१९६५ चा १५),

(सात) 'कराधान कायदे (विशोधन व संकीर्ण उपबंध) अधिनियम, १९६५' (१९६५ चा ४१) आणि

(आठ) 'वित्त अधिनियम, १९६६' (१९६६ चा १३),

यांद्वारे या अधिनियमात किंवा त्याच्या संबंधात केलेली विशोधने,——

(क) गुजराथ, [4][तामिळनाडू], महाराष्ट्र व राजस्थान ही राज्ये; आणि

(ख) केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जी राज्ये, संविधानाचा अनुच्छेद २५२-खंड (१) याखाली त्या राज्यांच्या विधानमंडळांनी उक्त विशोधने अंगीकृत करणारे ठराव पारित केल्यानंतर विनिर्दिष्ट करील अशी इतर कोणतीही राज्ये,

यांमध्ये समाविष्ट असलेल्या राज्यक्षेत्रांमध्ये असलेल्या शेतजमिनींबाबतच्या संपदा शुल्काला, पूर्वोक्त अशा प्रत्येक विशोधन अधिनियमाद्वारे केलेली विशोधने ज्या ज्या दिनांकाला ती परिणामक झाली त्या त्या दिनांकी व तेव्हापासून लागू होतील, व लागू झाली असल्याचे मानण्यात येईल. ]

(३) हा अधिनियम, [2]* * * हस्तांतरित राज्यक्षेत्रांमध्ये असलेल्या शेतजमिनींबाबत संपदा शुल्क बसवले जाण्याच्या बाबतीत लागू असण्याचे १ एप्रिल, १९५९ या दिवशी व तेव्हापासून समाप्त होईल, आणि पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, तो अशाप्रकारे समाप्त झाला असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**——"हस्तांतरित राज्यक्षेत्रे" याचा अर्थ, 'बिहार आणि पश्चिम बंगाल (राज्यक्षेत्रांचे हस्तांतरण) अधिनियम, १९५६' (१९५६ चा ४०)-कलम ३-पोटकलम (१) च्या आधारे ज्यांची १ नोव्हेंबर, १९५६ रोजी व तेव्हापासून पश्चिम बंगाल राज्यात भर घालण्यात आली ती राज्यक्षेत्रे असा आहे. ]

### कोणती संपत्ती संक्रामित झाली असे मानले जाते

६. मृत व्यक्ती आपल्या मृत्यूच्या वेळी ज्या संपत्तीची विल्हेवाट करण्यास सक्षम होती ती संपत्ती तिच्या मृत्यूबरोबर संक्रामित होते असे मानण्यात येईल.

विल्हेवाटशक्तीच्या अंतर्गत असलेली संपत्ती.

७. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, ज्या संपत्तीत मृताच्या मृत्यूबरोबर समाप्त होणारा असा मृताचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा हितसंबंध असेल अशी संपत्ती ही असा हितसंबंध समाप्त होण्यामुळे प्रोद्भूत किंवा निर्माण होणाऱ्या लाभाच्या व्याप्तीपर्यंत मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होते असे मानण्यात येईल——यामध्ये विशेषत: मिताक्षरा, मरुमक्कत्तायम् किंवा अलियसंतान कायद्याद्वारे नियंत्रित होणाऱ्या हिंदू कुटुंबाच्या सामाईक संपत्तीत असलेला सहदायकी हितसंबंध समाविष्ट आहे.

मृत्यूबरोबर समाप्त होणारे हितसंबंध.

---

१. १९६४ चा अधिनियम ५-कलम ४९ द्वारे "ओरिसा," हा शब्द गाळला (२३ सप्टेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता-कलम ४९ द्वारे "ओरिसा राज्यात व" हे शब्द गाळले (२३ सप्टेंबर, १९६३ रोजी व तेव्हापासून).

३. १९६८ चा अधिनियम २२-कलम २ द्वारे घातले.

४. 'मद्रास राज्य (नामांतर) (केंद्रीय विषयांवरील कायद्यांचे अनुकूलन) आदेश, १९७०' द्वारे "मद्रास" या शब्दाऐवजी घातले (१४ जानेवारी, १९६९ रोजी व तेव्हापासून).

(२) मिताक्षरा विधिप्रणालीद्वारे नियंत्रित होणाऱ्या हिंदू सहदायकीचा सदस्य मृत झाला असता–

(क्) मृताला त्याच्या मृत्यूच्या वेळी अठरावे वर्ष पूर्ण झाले असेल तरच, किंवा

(ख्) त्याच्या मृत्यूच्या वेळी त्याला अठरावे वर्ष पूर्ण झाले नसेल त्याबाबतीत, त्याच्या मृत्यूच्या वेळी त्याचा बाप किंवा पुरुष वंशक्रमातील अन्य पुरुष पूर्वज त्याच कुटुंबाचा सहदायाद नसेल तरच,

पोटकलम (१) चे उपबंध हे सहदायकी संपत्तीतील मृताच्या हितसंबंधाच्या बाबतीत लागू होतील.

**स्पष्टीकरण**.––(सहदायकीच्या अंतर्गत असलेल्या) एखाद्या उपसहदायकीची स्वतःची वेगळी संपत्ती असून मृत हा तिचा एक सदस्य असेल त्याबाबतीत, या पोटकलमाचे उपबंध सहदायकीच्या व उपसहदायकीच्या बाबतीत अलगअलगपणे परिणामक होतील.

(३) मरुमक्कत्तायम् वारसा नियमाद्वारे नियंत्रित होणाऱ्या कोणत्याही तरवडचा किंवा तवज्जेचा सदस्य किंवा अलियसंतान वारसा नियमाद्वारे नियंत्रित होणाऱ्या कुटुंबाचा किंवा कवरूचा सदस्य मरण पावला असता, त्या मृताचे वय अठरा वर्षे पूर्ण नसेल तर, प्रकरणपरत्वे, तरवड, तवज्जे, कुटुंब किंवा कवरु या संपत्तीतील मृताच्या हितसंबंधाच्या बाबतीत पोटकलम (१) चे उपबंध लागू होणार नाहीत.

(४) ज्या संपत्तीमध्ये मृताचा किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीचा केवळ एक पदधारक म्हणून किंवा धर्मादाय लाभांचा ग्रहीता म्हणून किंवा एकव्यक्तिक निगम म्हणून हितसंबंध असेल अशा संपत्तीला पोटकलम (१) चे उपबंध लागू होणार नाहीत.

**स्पष्टीकरण**.––शंकानिरसनासाठी याद्वारे असे घोषित करण्यात येते की, स्थानमचा धारक हा या पोटकलमाच्या अर्थानुसार पदधारकही नाही किंवा एकव्यक्तिक निगमही नाही.

मरणासन्न दाने.

८. मरणासन्नतेच्या कल्पनेने केलेले दान म्हणून प्राप्त झालेली संपत्ती ही दात्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाली असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.––या कलमातील "मरणासन्नतेच्या कल्पनेने केलेले दान" या शब्दप्रयोगाचा अर्थ, 'भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५' (१९२५ चा ३९)-कलम १९१ मधील त्याच्या अर्थाप्रमाणेच आहे.

मृत्यूपूर्वी विवक्षित कालावधीमध्ये केलेली दाने.

९. (१) मृताने केलेली व जीवित व्यक्तींच्या दरम्यानचे दान म्हणून तात्काळ अंमलात यावी असे अभिप्रेत असलेली जी विल्हेवाट––मग ती हस्तांतरण, सुपूर्दगी, न्यासघोषणा, क्रमवर्ती व्यक्तींच्या प्रीत्यर्थ संव्यवस्था या किंवा अन्य कोणत्याही मार्गाने केलेली असो––मृताच्या मृत्यूपूर्वी [1][दोन वर्षे] किंवा अधिक काळ अगोदर सद्भावपूर्वक केलेली असणार नाही त्या विल्हेवाटीअन्वये प्राप्त झालेली संपत्ती मृत्यूबरोबर संक्रामित झाली असल्याचे मानण्यात येईल :

परंतु, सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनांसाठी दिलेल्या दानांच्या बाबतीत हा कालावधी सहा महिन्यांचा असेल.

[2][ (२) पोटकलम (१) चे उपबंध पुढील दानांना लागू होणार नाहीत :––

(क्) विवाहाच्या प्रतिफलार्थ केलेली दाने––दहा हजार रुपये इतक्या कमाल मूल्यमर्यादेपर्यंत;

(ख्) जी दाने मृताच्या सर्वसामान्य खर्चाचा भाग होती हे नियंत्रकाची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत केले आहे ती दाने––दहा हजार रुपये इतक्या कमाल मूल्यमर्यादेपर्यंत. ]

जेथे दात्याला सर्वस्वी वगळलेले नसते अशी दाने–– मग ती केव्हाही दिलेली असोत.

१०. कोणतेही दान केव्हाही दिलेले असो––त्याद्वारे प्राप्त झालेल्या संपत्तीचा आदात्याने तत्काळ सद्भावपूर्वक कब्जा घेऊन उपभोग घेण्यास सुरुवात केली असून त्यानंतर पुढे दात्याला सर्वस्वी वगळून अथवा एखाद्या संविदेअन्वये किंवा अन्यथा त्याला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून आदात्याने ती संपत्ती स्वतःकडे ठेवून घेतली असे जेथवर झालेले नाही तितक्या व्याप्तीपर्यंत ती संपत्ती दात्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाल्याचे मानण्यात येईल :

परंतु, राखीव लाभाच्या अभ्यर्पणामुळे किंवा अन्यथा, मागाहून ती संपत्ती दात्याला सर्वस्वी वगळून अथवा एखाद्या संविदेअन्वये किंवा अन्यथा त्याला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून मृत्यूपूर्वी किमान [1][दोन वर्षे] इतका काळ उपभोगण्यात आली असेल तर, दानाच्या दिवशी व तेव्हापासून पूर्वोक्तानुसार ती आदात्याने सर्वस्वी स्वतःकडे ठेवून घेतली नव्हती एवढ्याच केवळ कारणास्तव, ती संक्रामित झाल्याचे मानले जाणार नाही :

[3][ परंतु आणखी असे की, विवाहसाठी, पुत्र, कन्या, भाऊ किंवा बहीण यांनी दिलेल्या कोणत्याही दानाखाली मिळालेले घर किंवा त्याचा भाग, त्यामध्ये राहण्याचा अधिकार संबद्ध विल्हेवाटीअन्वये किंवा कोणत्याही सांपार्श्विक विल्हेवाटीअन्वये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दात्याप्रीत्यर्थ राखून ठेवलेला किंवा सुनिश्चित करण्यात आला असल्यास ती बाब खेरीजकरून इतर बाबतींत, दाता तेथे राहात होता एवढ्याच कारणास्तव, दात्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाल्याचे मानले जाणार नाही .]

---

१. १९६६ चा अधिनियम १३-कलम ३८ द्वारे "एक वर्ष" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २ द्वारे पोटकलम (२) ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९६५ चा अधिनियम १०-कलम ६९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

११. (१) या कलमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, मृत्यूबरोबर समाप्त होणारा असा मर्यादित हितसंबंध कब्जागत हितसंबंध झाल्यानंतर त्याची विल्हेवाट करण्यात आली असेल किंवा तो समापित झाला असेल—मग अशी विल्हेवाट किंवा समापन हे अभ्यर्पण, हक्क आश्वासनपत्र, निर्णिहिती, समपहरण याद्वारे झालेले असो वा (जी नियत मुदत समाप्त होताच तो हितसंबंध समाप्त होण्याच्या मर्यादेस अधीन असेल ती मुदत संपल्यामुळे विल्हेवाट किंवा समापन घडून आले असेल ती बाब खेरीजकरून) अन्य कोणत्याही रीतीने झालेले असो, पूर्णतः असो वा अंशतः असो, आणि मूल्यार्थ असो—, वा नसो, व ती विल्हेवाट किंवा समापन (किंवा एकाहून अधिक असल्यास त्यांच्यापैकी कोणतेही) पोटकलम (२) द्वारे वगळलेले नसेल तेथे,— मृत्यूपूर्वी विवक्षित कालावधीमध्ये मर्यादित हित-संबंधाची विल्हेवाट करणे.

(क) जर पूर्वोक्ताप्रमाणे त्या हितसंबंधाची विल्हेवाट किंवा त्याचे समापन झाले नसते आणि त्या हितसंबंधावर अपेक्षी किंवा त्यास अधीन असलेल्या कोणत्याही हितसंबंधाची विल्हेवाट करण्यात आली नसती तर, ज्या संपत्तीत तो हितसंबंध विद्यमान होता ती संपत्ती कलम ५ खाली मृत्यूनंतर संक्रामित झाली असती असे असेल तर, ती संपत्ती सगळीच्या सगळी मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये समाविष्ट असल्याचे या कलमाच्या आधारे मानण्यात येईल; किंवा

(ख) जर पूर्वोक्ताप्रमाणे त्या हितसंबंधाची विल्हेवाट किंवा समापन झाले नसते आणि त्या हितसंबंधावर अपेक्षी किंवा त्यास अधीन असलेल्या कोणत्याही हितसंबंधाची विल्हेवाट करण्यात आली नसती तर, ज्या संपत्तीत हितसंबंध विद्यमान होता अशी संपत्ती मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीत विशिष्ट व्याप्तीपर्यंत समाविष्ट असल्याचे कलम ७ च्या आधारे मानण्यात आले असते असे असेल तर, ज्या संपत्तीत तो हितसंबंध विद्यमान होता ती संपत्ती मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीत विशिष्ट व्याप्तीपर्यंत समाविष्ट असल्याचे या कलमाच्या आधारे मानण्यात येईल.

(२) मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या अशा मर्यादित हितसंबंधाची विल्हेवाट किंवा समापन मृत्यूच्या आधी किमान [1][दोन वर्षे] इतका काळ (किंवा, ते सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी केले किंवा साहिले गेले असल्यास, मृत्यूपूर्वी किमान सहा महिने इतका काळ) सद्‌भावपूर्वक करण्यात आले किंवा साहिले गेले असेल तेव्हा—

(क) जर, विल्हेवाट किंवा समापन यांच्यामुळे किंवा ते होताच हक्कदार होणाऱ्या व्यक्तीने, जिच्यामध्ये हितसंबंध विद्यमान होता अशा संपत्तीचा त्यानंतर तत्काळ सद्‌भावपूर्वक कब्जा घेऊन उपभोग सुरू केला असेल आणि तेव्हापासून पुढे विल्हेवाटीच्या किंवा समापनाच्या लगतपूर्वी जिचा हितसंबंध होता अशा व्यक्तीला सर्वस्वी वगळून आणि तसेच एखाद्या संविदेअन्वये किंवा अन्यथा तिला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून ती स्वतःकडे ठेवून घेतली असेल तर; किंवा

(ख) आंशिक समापनाच्या बाबतीत, मृताचा ज्या संलेखान्वये हितसंबंध होता अशा संलेखातील उपबंधांच्या आधारे त्याने संपत्तीच्या काही भागाचा किंवा काही लाभाचा कब्जा ठेवून घेणे किंवा त्याचा उपभोग घेणे एवढ्याच कारणास्तव मागील परिच्छेदात विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती पूर्ण झाल्या नसतील तर,

ती विल्हेवाट किंवा ते समापन यांचा या पोटकलमानुसार अपवाद करण्यात येईल:

परंतु, खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या संपत्तीचा सद्‌भावपूर्वक कब्जा व उपभोग मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या अशा मर्यादित हितसंबंधाच्या विल्हेवाटीनंतर किंवा समापनानंतर तत्काळ ग्रहण केला गेला नसेल अशा बाबतीत, राखीव लाभाच्या अभ्यर्पणामुळे किंवा अन्यथा, मागाहून ती संपत्ती विल्हेवाटी-च्या किंवा समापनाच्या लगतपूर्वी जिचा हितसंबंध होता अशा व्यक्तीला सर्वस्वी वगळून आणि संविदेअन्वये किंवा अन्यथा तिला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून मृत्यूपूर्वी किमान [1][दोन वर्षे] इतका काळ उपभोगली गेली असेल तर, ती विल्हेवाट किंवा समापन यांचा या पोटकलमानुसार अपवाद करण्यात येईल:

[2][परंतु आणखी असे की, एखाद्या घरातील किंवा त्याच्या भागातील जो हितसंबंध मृत्यूबरोबर समाप्त होणारा असा मर्यादित हितसंबंध आहे त्याची विल्हेवाट किंवा समापन हे, विवाहसाठी, पुत्र, कन्या, भाऊ किंवा बहीण यांच्या प्रीत्यर्थ करण्यात आले किंवा साहिले गेले असेल त्या बाबतीत, विल्हेवाटी-च्या किंवा समापनाच्या लगतपूर्वी जिचा हितसंबंध होता ती व्यक्ती त्या घरात राहात असली तरी, ती विल्हेवाट किंवा समापन यांचा या पोटकलमानुसार अपवाद करण्यात येईल—मात्र संबद्ध विल्हेवाटीअन्वये किंवा कोणत्याही सांपाश्विक विल्हेवाटीअन्वये तेथे राहण्याचा अधिकार प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अशा व्यक्तीप्रीत्यर्थ राखून ठेवलेला किंवा सुनिश्चित केलेला असेल तर गोष्ट अलाहिदा:]

परंतु आणखी असे की, या पोटकलमातील कोणतीही गोष्ट मागील पोटकलमाच्या उपबंधांच्या आधारे नव्हे तर अन्यथा संपदा शुल्काचा जो कोणताही प्रभार उद्‌भवतो त्यावर परिणाम करणारी आहे असा तिचा अर्थ लावला जाणार नाही.

---

१. १९६६ चा अधिनियम १३-कलम ३८ द्वारे 'एक वर्ष' याऐवजी हा उल्लेख घातला (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६५ चा अधिनियम १०-कलम ६९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

(३) ज्या संपत्तीमध्ये प्रस्तुत हितसंबंध विद्यमान होता अशा संपत्तीवरील बोजा, (यानंतर कलम २७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे) सहयोगी क्रियांद्वारे निर्माण झाला असून, पोटकलम (१) लागू करताना, त्या हितसंबंधाच्या विल्हेवाटीचा त्यामध्ये समावेश असेल तर त्या बाबतीत त्या संपत्तीचे मूल्य टिकवण्याकरता किंवा वाढवण्याकरता योजलेल्या प्रयोजनांसाठी ज्याचा विनियोग करण्यात आला तो पैसा किंवा त्या पैशाचे सममूल्यक या रूपातील प्रतिफलाच्या बदल्यात बोजा निर्माण केलेला असल्यास त्या बाबीचा अपवाद करून इतर बाबतीत, त्या संपत्तीसंबंधीच्या निर्देशाचा अर्थ, बोजापासून मुक्त अशा त्या संपत्तीसंबंधीचे उल्लेख म्हणून लावण्यात येईल, आणि त्या अपवादात्मक बाबतीत त्या निर्देशांचा अर्थ, अशा प्रतिफलाचा याप्रमाणे जितक्या व्याप्तीपर्यंत विनियोग करण्यात आला तितक्या बोजास अधीन अशा त्या संपत्तीचे निर्देश म्हणून लावण्यात येईल.

(४) मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या अशा मर्यादित हितसंबंधाची विल्हेवाट किंवा समापन झाले असेल त्याबाबतीत, तिच्यामध्ये ज्या व्यक्तीचा हितसंबंध होता तिला विल्हेवाट किंवा समापन यांच्याशी सहयोगी असलेल्यांपैकी कोणत्याही क्रियेच्या आधारे त्यानंतर कोणत्याही वेळी लाभ मिळाला असेल तर, तिला आणि तसेच एखाद्या संविदेअन्वये किंवा अन्यथा तिला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून संपत्तीचा तत्काळ सद्‌भावपूर्वक कब्जा घेऊन उपभोग सुरू करण्यात आला व कब्जा तसाच ठेवून घेण्यात आला असे पोटकलम (२) च्या प्रयोजनार्थ मानले जाणार नाही ; तसेच तिला असा लाभ होत असताना, पूर्वोक्ता-प्रमाणे सर्वस्वी वगळून ती संपत्ती उपभोगली गेली असेही पोटकलम (२) च्या पहिल्या परंतुकाच्या प्रयोजनार्थ मानण्यात येणार नाही.

(५) मागील पोटकलमामध्ये--

(क) विल्हेवाटीशी सहयोगी असणाऱ्या कोणत्याही क्रियांचा निर्देश हा, विल्हेवाट करणे ही ज्यांपैकी एक क्रिया आहे अशा, कलम २७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही सहयोगी क्रियांचा निदर्शक आहे असे समजले जाईल; आणि

(ख) समापनाशी सहयोगी असणाऱ्या कोणत्याही क्रियांचा निर्देश हा, समापनामध्ये परिणत होणारी, किंवा त्याच्या पूर्वकल्पनेने केलेली किंवा त्यास अनुलक्षून केलेली विल्हेवाट ही ज्यांपैकी एक क्रिया आहे अशा, याप्रमाणे व्याख्या केलेल्या कोणत्याही सहयोगी क्रियांचा निदर्शक आहे असे समजले जाईल.

हक्क राखून केलेल्या संव्यवस्था.

१२. (१) ज्या विलेखान्वये किंवा मृत्युपत्र म्हणून परिणामक न होणाऱ्या अन्य कोणत्याही संलेखान्वये संपत्तीमधील आजीव किंवा मृत्यूच्या संदर्भाने समापनीय अशा अन्य कोणत्याही मुदतीचा हितसंबंध संव्यवस्थाकर्त्याकडे व्यक्तपणे किंवा उपलक्षितपणे राखून ठेवण्यात आला असेल किंवा अशा संपत्तीतील पूर्ण हितसंबंध परत स्वतःकडे घेण्याचा किंवा परत मागून घेण्याचा अधिकार कोणत्याही शक्तीचा वापर करून स्वतःकडे राखून ठेवला असेल किंवा राखून ठेवला जाणार असेल त्याद्वारे मृताने केलेल्या संव्यवस्थेखाली संक्रामित होणारी संपत्ती ही संव्यवस्थाकर्त्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाल्याचे मानण्यात येईल :

परंतु, असा कोणताही हितसंबंध किंवा अधिकार अभ्यर्पित करण्यात आल्यामुळे मागाहून संव्यवस्था-कर्त्याला अथवा एखाद्या संविदेअन्वये किंवा अन्यथा त्याला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून ती संपत्ती मृत्यूपूर्वी किमान [१][ दोन वर्षे ] इतका काळ उपभोगण्यात आली असेल तर, असा हितसंबंध किंवा अधिकार याप्रमाणे राखून ठेवला होता एवढ्याच केवळ कारणास्तव, ती संपत्ती संव्यवस्थाकर्त्याच्या मृत्यू-बरोबर संक्रामित झाल्याचे मानले जाणार नाही :

[२][परंतु आणखी असे की, विवाहसाथी, पुत्र, कन्या, भाऊ किंवा बहीण यांच्या प्रीत्यर्थ केलेल्या अशा संव्यवस्थेमध्ये समाविष्ट असलेले घर किंवा त्याचा भाग हा, त्यामध्ये राहाण्याचा अधिकार त्या संव्यवस्थेअन्वये किंवा कोणत्याही सांपार्श्विक विल्हेवाटीअन्वये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संव्यवस्थाकर्त्या-प्रीत्यर्थ राखन ठेवलेला असल्यास किंवा सुनिश्चित करण्यात आलेला असल्यास ती बाब खेरीजकरून इतर बाबतीत, संव्यवस्थाकर्ता तेथे राहात होता एवढ्याच कारणास्तव, संव्यवस्थाकर्त्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाल्याचे मानले जाणार नाही.]

**स्पष्टीकरण**.--संव्यवस्था केलेल्या संपत्तीमध्ये आपल्या स्वतःच्या आणि (कलम २७ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे) आपल्या नातलगांपैकी कोणाच्याही निर्वाहासाठी हितसंबंध राखून ठेवणारा संव्यवस्थाकर्ता या कलमाच्या अर्थानुसार स्वतःसाठी हितसंबंध राखून ठेवीत असल्याचे मानण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या व्यक्तीने एखादी संपत्ती संव्यवस्थेअन्वये अन्य एका किंवा अधिक व्यक्तींप्रत त्यांच्या त्यांच्या हयातीकरता आणि त्यांच्या मृत्यूनंतर संव्यवस्थाकर्त्याप्रत त्याच्या हयातीकरता आणि त्यानंतर इतर व्यक्तींप्रत केली असेल आणि संव्यवस्था-कर्त्याचा संपत्तीतील हितसंबंध कब्जागत हितसंबंध होण्यापूर्वी तो मरण पावला असेल तर, या कलमाच्या अर्थानुसार ती संपत्ती संव्यवस्थाकर्त्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाली असल्याचे मानण्यात येणार नाही.

---

१. १९६६ चा अधिनियम १३- कलम ३८ द्वारे 'एक वर्ष' याऐवजी हा उल्लेख घातला (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

२. १९६५ चा अधिनियम १०- कलम ६९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

१३. एखादी व्यक्ती कोणत्याही संपत्तीला किंवा ज्या पैशांतून कोणतीही संपत्ती खरेदी करण्यात आली त्या पैशांना संपूर्णपणे हक्कदार असून तिने स्वतः एकटीने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर एकविचाराने, किंवा आपसात व्यवस्था करून, स्वतः व अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याकडे संयुक्तपणे ती अशाप्रकारे हस्तांतरित किंवा निहित करवली असेल ––मग ते विल्हेवाटीद्वारे असो वा अन्यथा असो––की जेणेकरून त्या संपत्तीच्या काही भागातील हितप्रद हितसंबंध तिच्या मृत्यूनंतर त्या अन्य व्यक्तीकडे उत्तरजीवित्वानुसार संक्रामित किंवा उपार्जित होईल, तर ती संपूर्ण संपत्ती ही मृत्यूबरोबर संक्रामित झाली असल्याचे मानण्यात येईल. संयुक्त विनिधाने.

१४. (१) कोणत्याही व्यक्तीने स्वतःच्या जीविताचे विमापत्र काढले असून, आदात्याच्या––मग तो नामनियुक्त असो वा अभिहस्तांकिती असो, ––हितासाठी तिने ते विमापत्र संपूर्णपणे चालू ठेवले असेल त्या बाबतीत, त्या विमापत्राखाली मिळालेला पैसा अथवा अशा हितासाठी त्या व्यक्तीने विमापत्र अंशतः चालू ठेवले असेल त्या बाबतीत तिने भरलेल्या विमाहप्त्यांच्या प्रमाणानुसार अशा पैशाचा भाग विमेदाराच्या मृत्यूनंतर संक्रामित झाल्याचे मानण्यात येईल. आदात्यासाठी चालू ठेवलेली विमापत्रे.

**स्पष्टीकरण.**––मृत व्यक्तीने केलेल्या संव्यवस्थेमुळे किंवा तिचा परिणाम म्हणून काढण्यात आलेले तिच्या जीविताचे विमापत्र हे मृताने काढलेले विमापत्र म्हणून समजण्यात येईल.

(२) पोटकलम (१) च्या प्रयोजनांसाठी, कोणत्याही विमापत्रावर भरलेल्या विमाहप्त्यांपैकी जेवढे हप्ते मृताने केलेल्या संव्यवस्थेमुळे किंवा तिचा परिणाम म्हणून संव्यवस्थेमध्ये समाविष्ट असलेल्या संपत्तीमधून––मग ती मृताने दिलेली असो वा नसो––, किंवा संव्यवस्थेखाली निर्माण झालेल्या उत्पन्नामधून––मग ते मृताने दिलेले असो वा नसो––, भरलेले असतील तेवढे हप्ते हे मृताने भरलेले हप्ते म्हणून समजण्यात येतील :

परंतु, ज्या कोणत्याही रकमा संव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी मृताने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेल्या संपत्तीमधून किंवा त्या संपत्तीचे प्रतिरूप असणाऱ्या संपत्तीमधून किंवा मृताने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे दिलेल्या उत्पन्नामधून––मग ते अशा संपत्तीमधून निर्माण झालेले असो, किंवा अन्यप्रकारे निर्माण झालेले असो––भरलेल्या नसतील त्या रकमा मृत आणि अन्य कोणतीही व्यक्ती यांच्यातील कोणत्याही प्रतियोगी व्यवस्थेचा भाग म्हणून भरलेल्या नव्हत्या अशी नियंत्रकाची खात्री झाल्यास, मृताने त्या भरल्या होत्या असे समजण्यात येणार नाही.

(३) या कलमाच्या प्रयोजनांसाठी,––

(क) "संव्यवस्था" या शब्दप्रयोगात, कोणतीही विल्हेवाट, न्यास, प्रसंविदा, करार किंवा व्यवस्था यांचा समावेश आहे, आणि

(ख) जर एखाद्या व्यक्तीने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे संव्यवस्था केली असेल किंवा त्यामध्ये तिने भाग घेतला असेल, आणि विशेषतः, पण या खंडातील पूर्वगामी शब्दांच्या व्यापकतेला बाध न येता, तिने संव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पैसे दिले असतील किंवा देण्याचे अभिवचन दिले असेल किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर, अशा अन्य व्यक्तीने संव्यवस्था करण्याबाबत किंवा तीत भाग घेण्याबाबत प्रतियोगी व्यवस्था केली असेल तर, त्या व्यक्तीने संव्यवस्था केली असल्याचे मानण्यात येईल.

१५. मृताने स्वतः एकट्याने किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर एकविचाराने, किंवा आपसात व्यवस्था करून खरेदी केलेली किंवा दिलेली कोणतीही वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध त्याच्या मृत्यूनंतर उत्तरजीवित्वानुसार किंवा अन्यथा उपार्जित होणाऱ्या किंवा उद्भवणाऱ्या हितप्रद हितसंबंधाच्या व्याप्तीपर्यंत त्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाल्याचे मानण्यात येईल. मृताने खरेदी केलेली किंवा दिलेली वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध.

**स्पष्टीकरण.**––हितप्रद हितसंबंधाची व्याप्ती मृत्यूपूर्वी त्यामध्ये हिताधिकाऱ्याचा जो कोणताही अपेक्षी हितसंबंध असेल तो विचारात न घेता निश्चित केली पाहिजे.

१६. (१) मृतामार्फत प्राप्त झालेल्या कोणत्याही संपत्तीला जी व्यक्ती केव्हातरी हक्कदार होती किंवा ती संपत्ती जिच्या साधनसंपत्तीमध्ये केव्हातरी समाविष्ट होती अशा कोणत्याही व्यक्तीने, संपूर्णतः किंवा अंशतः खरेदी केलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही वार्षिकीच्या किंवा अन्य हितसंबंधाच्या संबंधात, जणू काही ती वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध मृताने दिलेले असावे त्याप्रमाणे, अथवा मृतामार्फत प्राप्त झालेली सर्व संपत्ती उपयोजित करूनही संपूर्ण वार्षिकी किंवा हितसंबंध देण्यास ती अपुरी ठरली असती हे नियंत्रकाची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत झाले तर, जणू काही अशा शाबीत झालेल्या अपुरेपणाच्या प्रमाणात तितक्या व्याप्तीपर्यंत कमी केलेल्या रकमेइतकी तत्सम वार्षिकी किंवा हितसंबंध मृताने दिलेला असावा त्याप्रमाणे, कलम १५ परिणामक होईल : मृतामार्फत प्राप्त झालेल्या संपत्ती-मधून खरेदी केलेली किंवा दिलेली वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध.

परंतु, पूर्वोक्ताप्रमाणे असा कोणताही अपुरेपणा उद्भवला असता किंवा काय हे आणि त्याची व्याप्ती निश्चित करण्याच्या प्रयोजनार्थ, मृतामार्फत प्राप्त झालेल्या संपत्तीपैकी ज्या भागाबाबत, तो भाग किंवा जिचे तो प्रतिरूप आहे ती संपत्ती ज्या विल्हेवाटीची विषयवस्तू होती ती विल्हेवाट वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध यांची खरेदी किंवा तरतूद किंवा त्याबद्दलच्या खर्चाची कोणत्याही रीतीने भरपाई यांना अनुलक्षून अथवा ते करणे शक्य किंवा सुकर व्हावे या दृष्टीने करण्यात आली नव्हती हे नियंत्रकाची खात्री होईल अशाप्रकारे शाबीत झालेले आहे असा कोणताही भाग त्या संपत्तीतून वगळण्यात येईल.

(२) या कलमामध्ये पुढील शब्दप्रयोगांना याद्वारे नेमून दिल्याप्रमाणे तेते अर्थ असतील, ते असे :—

(क्) "मृतामार्फत प्राप्त झालेली संपत्ती" याचा अर्थ, मृताने स्वतः एकटयाने अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर एकविचाराने, किंवा आपसात व्यवस्था करून केलेली विल्हेवाट त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी त्यास दिलेला पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील [1][संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात केली असली तरीही] जी संपत्ती त्या विल्हेवाटीची विषयवस्तू असेल अशी, किंवा जी संपत्ती अशा विल्हेवाटीच्या विषयवस्तूपैकी कशाचेही प्रतिरूप असेल अशी कोणतीही संपत्ती असा आहे—मग ती प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे केलेली असो, आणि दरम्यानच्या एका विल्हेवाटीच्या आधारे असो वा अधिक विल्हेवाटींच्या आधारे असो—आणि अशी कोणतीही दरम्यानची विल्हेवाट ही संपूर्ण किंवा आंशिक प्रतिफलाच्या बदल्यात केलेली असो वा नसो :

परंतु, जेथे प्रथम उल्लेखिलेली विल्हेवाट ही मृताला त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी देण्यात आलेला पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात करण्यात आली असेल आणि ती विल्हेवाट ज्या सहयोगी क्रियांमध्ये —

(क्) मृताने स्वतः एकटयाने अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीबरोबर एकविचाराने, किंवा आपसात व्यवस्था करून मृताला त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी देण्यात आलेला पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात नव्हे तर अन्यथा केलेल्या विल्हेवाटीचा, किंवा

(ख्) अन्य कोणत्याही व्यक्तीने केलेल्या ज्या विल्हेवाटीमुळे मृताच्या संपत्तीचे मूल्य कमी होते त्या विल्हेवाटीचा

समावेश आहे त्यांचा भाग नव्हती असे नियंत्रकाची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत झाले असेल त्याबाबतीत, संपदा शुल्क आकारण्यात यावे किंवा काय याबाबत विचार करताना, उक्त प्रथमनिर्दिष्ट विल्हेवाट ही, जणू काही हा उपबंध तिच्या संबंधात लागू होत नाही असे समजून, हिशेबातून वगळण्यात येईल;

(ख्) "विल्हेवाट" यामध्ये कोणताही न्यास, प्रसंविदा, करार किंवा व्यवस्था यांचा समावेश आहे; आणि

(ग्) "विषयवस्तू" हा शब्दप्रयोग कोणत्याही विल्हेवाटीच्या संबंधात केला असता त्यामध्ये, अशा विल्हेवाटीअन्वये किंवा तिच्या आधारे केलेला किंवा प्रदेय असलेला कोणताही वार्षिक किंवा नियतकालिक भरणा याचा समावेश आहे.

(३) कलम ३४च्या प्रयोजनांसाठी, मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये या कलमाच्या आधारे समाविष्ट केलेल्या कोणत्याही संपत्तीत त्याचा हितसंबंध होता असे मानण्यात येईल.

### कंपन्यांकडे करण्यात आलेल्या हस्तांतरणांशी संबंधित विशेष उपबंध

नियंत्रित कंपनीकडे हस्तांतरित केलेली संपत्ती.

१७. (१) एखाद्या नियंत्रित कंपनीकडे मृताने कोणतीही संपत्ती (त्याच्या मृत्यूबरोबर समाप्त होणारा मर्यादित हितसंबंध किंवा विश्वासाच्या नात्याने हस्तांतरित केलेली संपत्ती यांहून अन्य) आणि मृतास त्या कंपनीकडून उपार्जित होणारे जे कोणतेही लाभ त्याच्या मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या तीन वर्षांमध्ये उपार्जित झाले ते हस्तांतरित केले असतील त्या बाबतीत, संपदा शुल्काच्या प्रयोजनांसाठी, कंपनीची मत्ता ही त्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये पोट-कलम (२) अनुसार ठरविलेल्या व्याप्तीपर्यंत समाविष्ट असल्याचे मानण्यात येईल.

(२) कंपनीची मत्ता पूर्वोक्ताप्रमाणे ज्या व्याप्तीपर्यंत समाविष्ट असल्याचे मानावयाचे ती व्याप्ती म्हणजे कंपनीकडून लगतपूर्वीच्या तीन हिशेब-वर्षांमध्ये मृताला उपार्जित झालेल्या लाभाच्या एकवट रकमेची त्या उक्त वर्षांमधील कंपनीच्या निव्वळ प्राप्तीच्या एकवट रकमेशी तुलना करून निश्चित केलेल्या प्रमाणाइतकी असेल:

परंतु,—

(क्) उक्त हिशेब-वर्षांपैकी कोणत्याही हिशेब-वर्षामध्ये कंपनीला तोटा झाला असेल तर, कंपनीची उक्त एकवट निव्वळ प्राप्ती निश्चित करताना अशा तोटयाची रक्कम वजा करण्यात येईल;

(ख्) कंपनी उक्त हिशेब-वर्षांपैकी उपान्त्य वर्षात किंवा शेवटच्या वर्षात अस्तित्वात आली असेल तर, उक्त हिशेब-वर्षांच्या संबंधातील या पोटकलमातील निर्देशांचा अर्थ, प्रकरणपरत्वे, त्या वर्षांपैकी अखेरच्या दोन वर्षांबाबतचे किंवा अखेरच्या वर्षाबाबतचे निर्देश म्हणून लावण्यात येईल.

(३) या कलमाच्या आधारे कंपनीची जी मत्ता मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये समाविष्ट असल्याचे मानण्यात येते तिच्यामध्ये कंपनीने पूर्वोक्तांपैकी पहिल्या हिशेब-वर्षाची सुरुवात आणि मृताचा मृत्यू यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी,—

(क्) कंपनीमधील शेअर्स किंवा तिची ऋणपत्रे यांच्याशी संलग्न असलेल्या अधिकारांच्या पूर्तीसाठी किंवा त्यापोटी, किंवा

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ५ द्वारे "संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात नव्हे तर अन्यथा केली असेल तेथे" या मजकुराऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

(ख) पुढील पद्धती सोडून अन्य कोणत्याही प्रकारे––म्हणजे कंपनीला तिच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी मिळालेला पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात केलेल्या विक्रीच्या मार्गाने अथवा एखाद्या अधिनियमितीद्वारे किंवा तिच्या खाली लादलेले कर किंवा पट्टचा किंवा अन्य देणे चुकते करण्यासाठी किंवा त्यापोटी, अथवा एखाद्या अपकृतीबद्दल, अपाय पोचलेल्या व्यक्तीशी संगनमत नसताना ओढवलेला द्रव्यदंड किंवा दंड किंवा देणे चुकते करण्यासाठी किंवा त्यापोटी असल्यास तेवढे खेरीजकरून इतर बाबतीत कोणत्याही प्रकारे, आपल्या ज्या-मत्तेची विल्हेवाट किंवा वितरण केलेले असेल अशी कोणतीही मत्ता––मृत्यूच्या वेळी चालू राहिलेल्या किंवा तत्पूर्वी पूर्ण झालेल्या परिसमापनामध्ये तिची याप्रमाणे विल्हेवाट किंवा वितरण करण्यात आले असेल त्या मत्तेसुद्धा––समाविष्ट असेल :

परंतु, कोणत्याही हिशेब-वर्षात किंवा लगतपूर्व हिशेब-वर्षाची अखेर व मृताचा मृत्यू यामधील कालावधीत केलेल्या भरण्याच्या संबंधात, ज्या रकमा सगळचा मिळून त्या वर्षातील किंवा कालावधीतील कंपनीच्या प्राप्तीच्या रकमेपेक्षा अधिक नसून ज्यांमधून प्राप्तिकर कापावा लागला किंवा ज्यांवर प्राप्तिकर आकारण्याजोगा होता अशा रकमांच्या रूपाने विल्हेवाट करण्यात आलेल्या किंवा वितरित करण्यात आलेल्या मत्तेला हे पोटकलम लागू होणार नाही.

(४) (एक) नियंत्रित कंपनी म्हणजे जी कंपनी कोणत्याही संबद्ध वेळी जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली होती किंवा हे उपबंध अगोदरपासून अंमलात असते तर, जी तशी असल्याचे मानण्यात आले असते, आणि जी पोटकंपनी नाही किंवा ठळकपणे इतरेजन जिच्यात हितसंबंधित आहेत अशी कंपनी नाही अशी कोणतीही कंपनी होय.

**स्पष्टीकरण.**––या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी––

(क) जर एखाद्या कंपनीतील शेअर्सच्या हितप्रद मालकीमुळे अशा कंपनीचे नियंत्रण जिला या पोटकलमाचे उपबंध लागू आहेत अशा कंपनीहून अन्य कंपनीकडे किंवा ज्यांच्यापैकी कोणतीही कंपनी जिला पूर्वोक्त उपबंध लागू होतात अशा प्रकारची नाही अशा दोन किंवा अधिक कंपन्यांकडे असेल तर ती कंपनी दुय्यम कंपनी असल्याचे मानण्यात येईल;

(ख) जर एखाद्या कंपनीची पंचवीस टक्क्यांहून कमी नाही एवढी मतदानशक्ती धारण करणाऱ्या शेअर्सचे (ज्या शेअर्सवर नियत दराने लाभांश मिळण्याचा अधिकार मिळतो––मग तो नफ्यामधील वाटा उचलण्याच्या अतिरिक्त अधिकारासह असो किंवा त्याशिवाय असो––ते शेअर्स सोडून) इतरेजनांमध्ये बिनशर्त नियतवाटप केलेले असेल, किंवा इतरेजनांनी ते बिनशर्त संपादन केले असतील व ज्या वर्षाकरिता किंवा अन्य कालावधीकरिता कंपनीचे हिशेब केलेले असतील त्याच्या अखेरीस इतरेजनांनी (या पोटकलमाचे उपबंध जिला लागू आहेत अशा कंपनीचा समावेश नाही) ते शेअर्स हितार्थ धारण केलेले असतील आणि असे कोणतेही शेअर्स अशा वर्षामध्ये किंवा अन्य कालावधीमध्ये मान्यताप्राप्त रोखेबाजारातील व्यवहाराची विषयवस्तू असतील किंवा धारकांकडून इतरेजनांपैकी इतर व्यक्तींना खरोखरी मुक्तपणे हस्तांतरित करण्याजोगे असतील तर, जिच्यात ठळकपणे इतरेजन हितसंबंधित आहेत अशी ती कंपनी असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) एखादी कंपनी,––

(क) जर कोणत्याही पाच किंवा त्याहून कमी व्यक्ती एकत्रितपणे कंपनीच्या कारभारावर प्रत्यक्ष-रीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या नियंत्रणाधिकार बजावत असतील किंवा बजावण्यास समर्थ असतील किंवा तो प्राप्त होण्यास हक्कदार असतील आणि विशेषतः, पण पूर्वगामी मजकुराच्या व्यापकतेला बाध न येता, जर कोणत्याही पाच किंवा त्याहून कमी व्यक्ती एकत्रितपणे त्या कंपनीच्या भाग भांडवलापैकी किंवा मतदान-शक्तीपैकी अधिकतर भाग धारण करत असतील किंवा प्राप्त होण्यास हक्कदार असतील तर, किंवा

(ख) जर कोणत्याही पाच किंवा त्याहून कमी व्यक्ती एकत्रितपणे, एकतर कंपनीच्या विक्रीस काढलेल्या भाग भांडवलाचा अधिकतर भाग किंवा कंपनीची सगळीच्या सगळी प्राप्ती सदस्यांमध्ये प्रत्यक्षात वितरित करण्यात आली असेल तर, ज्यामुळे याप्रमाणे वितरित केलेल्या रकमेपैकी अधिकतर भाग मिळण्यास ते हक्कदार होऊ शकतील असा त्या भांडवलाचा भाग धारण करीत असतील किंवा प्राप्त होण्यास हक्कदार असतील तर, किंवा

(ग) जर,––

(एक) जिला हे पोटकलम लागू होते अशी ती कंपनी आहे असे गृहीत धरून; किंवा

(दोन) ती कंपनी आणि अन्य कोणतीही कंपनी किंवा कंपन्या म्हणजे ज्यांना उक्त पोटकलम लागू होते अशा कंपन्या आहेत असे गृहीत धरून,

त्या कंपनीच्या प्राप्तीच्या (उक्त पोटकलमांच्या प्रयोजनासाठी तिच्याकडे संविभागून देण्यात आलेली किंवा त्यांपैकी कोणत्याही गृहीतकानुसार तिच्याकडे संविभागून देता आली असती अशी कोणतीही प्राप्ती धरून) निम्म्यापेक्षा अधिक प्राप्ती जास्तीत जास्त पाच व्यक्तींमध्ये त्या प्रयोजनासाठी संविभाजित करता आली असती असे असेल तर,

ती कंपनी ही जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असल्याचे मानण्यात येईल.

(तीन) एखादी कंपनी जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली आहे किंवा नाही याबाबत निर्णय करताना, ज्या एकमेकांच्या नातेवाईक आहेत अशा व्यक्ती, ज्या व्यक्ती अन्य कोणत्याही व्यक्तींनी नामनियुक्त केल्या असतील अशा व्यक्ती, त्या अन्य व्यक्तींसह, तसेच भागीदारीमध्ये असलेल्या व्यक्ती, आणि कंपनीची जे कोणतेही शेअर्स किंवा आबंधने कोणत्याही न्यासास अधीन असतील किंवा मृत व्यक्तीच्या संपदेचा भाग असतील त्यामध्ये हितसंबंधित असलेल्या व्यक्ती या वर्गनिहाय एकेकच व्यक्ती असल्याचे समजण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.---या खंडाच्या प्रयोजनासाठी,---

(क) "नातेवाईक" या शब्दप्रयोगाचा अर्थ, पती, पत्नी, पूर्वज, रेषीय वंशज, भाऊ किंवा बहीण असा आहे ;

(ख) एखादी कंपनी ही जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली आहे असे मानावयाचे किंवा मानावयाचे नाही याबाबत निर्णय करण्याच्या कामी या पोट-कलमाच्या कोणत्याही उपबंधामुळे महत्त्वपूर्ण ठरणारा असा कोणताही अधिकार किंवा शक्ती एखादी व्यक्ती अन्य व्यक्तीच्यावतीने प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे धारण करीत असेल किंवा तिला अशा अन्य व्यक्तीच्या निदेशानुसार किंवा तिच्यावतीने त्याचा वापर करणे आवश्यक होत असेल तर, अशी एखादी व्यक्ती ही त्या अन्य व्यक्तीने नामनियुक्त केलेली व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल.

(चार) एखादी गुंतवणूक कंपनी जर समापित झाली असती तर कंपनीची जी मत्ता तिचे सदस्य व कर्जदाते धनको यांना वितरणासाठी उपलब्ध झाली असती तिच्यापैकी निम्म्याहून अधिक भाग मिळण्यास सदस्य किंवा कर्जदाते धनको म्हणून कोणत्याही पाच किंवा त्याहून कमी व्यक्ती हक्कदार झाल्या असत्या असे असेल तर ती गुंतवणूक कंपनी जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असल्याचे मानण्यात येईल.

(पाच) खंड (एक) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या खंडाच्या प्रयोजनापुरती जी कंपनी जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली असल्याचे मानण्यात आले आहे अशी कंपनी, खंड (दोन) च्या उपखंड (क), (ख) किंवा (ग) मध्ये किंवा खंड (चार) मध्ये उल्लेखिलेल्या व्यक्तींमध्ये, उक्त खंड (एक) चे उपबंध जिला लागू होत नाहीत आणि जी अन्य कोणत्याही व्यक्तीने नामनियुक्त केलेली नाही अशा कंपनीचा समावेश केल्यानेच केवळ ती जास्तीत जास्त पाच व्यक्तींच्या नियंत्रणाखाली आहे असे मानणे शक्य नसेल तर, ती दुय्यम कंपनी असल्याचे मानण्यात येणार नाही.

(सहा) या पोटकलमामधील "संबद्ध वेळ" या शब्दप्रयोगाचा अर्थ, मृताच्या मृत्यू-बरोबर संपणाऱ्या आणि या कलमाच्या प्रयोजनांपुरती संबंध असलेली विल्हेवाट, हस्तांतरण किंवा अन्य संव्यवहार किंवा [1] घटना यांच्या दिनांकास किंवा जर ती विल्हेवाट, हस्तांतरण किंवा अन्य संव्यवहार किंवा घटना सहयोगी क्रियांपैकी एक असल्यास त्यांपैकी सर्वांत आधीच्या क्रियेच्या दिनांकास सुरू होणाऱ्या अशा कालावधीतील कोणतीही वेळ असा आहे.

(५) कलम ३४ च्या प्रयोजनांसाठी, मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये, जी संपत्ती समाविष्ट असल्याचे या कलमाच्या आधारे मानले गेले असेल अशा संपत्तीमध्ये मृताचा हितसंबंध होता असे मानण्यात येईल.

कंपनीचे व कंपनीच्या अधिकाऱ्यांचे हस्तांतरकाच्या मृत्यूनंतर नियंत्रकाला माहिती देण्याचे कर्तव्य.

१८. (१) मृताने एखाद्या नियंत्रित कंपनीला संपत्तीचे हस्तांतरण केले असेल त्याबाबतीत, कंपनीवर मृताच्या मृत्यूच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत मृताच्या मृत्यूची, मृताने कंपनीकडे संपत्तीचे हस्तांतरण केले या गोष्टीची आणि मृताला कंपनीकडून लाभ उपार्जित झाले या गोष्टीची माहिती नियंत्रकाला देण्याचे आबंधन असेल आणि त्या दिनांकास जी व्यक्ती कंपनीची प्रधान अधिकारी होती किंवा त्या दिनांकापूर्वी कंपनी परिसमापित व विसर्जित झाली असेल तर, जी व्यक्ती केव्हातरी कंपनीची प्रधान अधिकारी होती आणि या कलमाखाली कोणतीही माहिती पुरविणे जिला आवश्यक करण्यात आले असेल अशा प्रत्येक व्यक्तीवर, कंपनीने किंवा अन्य एखाद्या व्यक्तीने प्रस्तुत माहिती यापूर्वीच नियंत्रकाला दिली आहे हे तिला माहीत नसेल किंवा तशी ती दिली आहे असे समजण्यास वाजवी कारण नसेल तर पूर्वोक्त तथ्यांपैकी तिच्या माहितीच्या कक्षेत असणाऱ्या तथ्यांच्या संबंधात तसेच आबंधन राहील.

(२) मागील पोटकलमामुळे ज्या कंपनीवर किंवा पूर्वोक्त अशा ज्या व्यक्तीवर नियंत्रकाला कोणतीही माहिती देण्याचे आबंधन असेल तिने अशा आबंधनाचे पालन करण्यात कसूर केल्यास, नियंत्र-काला कसूरदारावर एक हजार रुपयांहून अधिक नाही एवढा दंड बसवता येईल.

[2] * * * *

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ६ द्वारे इंग्रजी "इव्हन" या शब्दाऐवजी "इव्हेंट" हा शब्द घातला (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून). मराठीत या दुरुस्तीची गरज नाही.

२. किता---कलम ७ द्वारे स्पष्टीकरण गाळले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

१९. (१) मृताच्या मृत्यूनंतर प्रदेय असलेल्या शुल्काबाबत कलम १७ च्या आधारे पुढील व्यक्ती उत्तरदायी असतील, त्या अशा :— कलम १७ खालील शुल्काची उगराणी व भार.

(क) ती कंपनी;

(ख) मृत्यूच्यावेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी कंपनीकडे असलेली—मग भांडवल म्हणून असो किंवा उत्पन्न म्हणून असो—कोणतीही मत्ता (कंपनीला तिच्या स्वतःच्या उपयोगासाठी व लाभासाठी प्राप्त झालेला पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात जी व्यक्ती सद्भावपूर्वक खरेदीदार झाली असेल तिच्याहून अन्य अशी) जी व्यक्ती प्रत्यक्षपणे कंपनीकडून किंवा अन्यप्रकारे प्राप्त करते किंवा तिची विल्हेवाट करते अशी कोणतीही व्यक्ती ;

(ग) कंपनीच्या मत्तेचे वितरण झाल्यानंतर अशी कोणतीही वितरित मत्ता जिला प्राप्त झालेली असेल अशी कोणतीही व्यक्ती :

परंतु, एखादी व्यक्ती,—

(एक) कोणत्याही मत्तेच्या संबंधात, त्या मत्तेच्या मूल्यापेक्षा अधिक प्रमाणात कोणत्याही शुल्काबद्दल खंड (ख) च्या आधारे उत्तरदायी होणार नाही, किंवा

(दोन) खंड १७ मुळे कंपनीची जी मत्ता मृत्यूबरोबर संक्रामित होते त्या मत्तेच्या ऐन मूल्याशी त्या मत्तेच्या वितरण मूल्याचे जे प्रमाण असेल त्याच प्रमाणात संपूर्ण शुल्काशी प्रमाणशीर असलेल्या शुल्कभागापेक्षा अधिक प्रमाणात कोणत्याही मत्तेच्या संबंधात खंड (ग) मुळे उत्तरदायी होणार नाही.

**स्पष्टीकरण.**—या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी "वितरित मत्ता" आणि "मृत्यूबरोबर संक्रामित होणारी कंपनीची मत्ता" या शब्दप्रयोगांत कंपनीच्या मत्तेचे वितरण झाल्यानंतर मृताला प्राप्त झालेल्या कोणत्याही वितरित मत्तेचा समावेश होत नाही; आणि कंपनीची कोणतीही वितरित मत्ता प्राप्त झाल्यावर जी व्यक्ती अशा मृताच्या पूर्वी मरण पावली असेल ती खंड (ग) च्या आधारे उत्तरदायी असलेली व्यक्ती होती असे मानण्यात येईल.

(२) [1][भारताबाहेर] निगमित करण्यात आलेली एखादी कंपनी मागील पोटकलमाच्या किंवा या पोटकलमाच्या आधारे कोणत्याही शुल्काबद्दल उत्तरदायी ठरत असेल त्याबाबतीत, मृत्यूच्या वेळी त्या कंपनीची सदस्य असलेली प्रत्येक व्यक्तीदेखील त्या कंपनीमध्ये असलेल्या तिच्या हितसंबंधाच्या मूल्याच्या प्रमाणात त्या शुल्काचा जितका भाग हिस्सेरशीने येईल तितक्या भागाबद्दल उत्तरदायी राहील.

(३) या कलमामुळे कोणत्याही शुल्काबद्दल उत्तरदायी होणाऱ्या व्यक्तीला शुल्काची रक्कम उभारून ते भरण्याच्या प्रयोजनासाठी, उत्तरदायी पक्षांना प्रदान केलेल्या सर्व शक्ती असतील.

(४) कंपनीचे समापन करण्यात आल्यानंतर, [2]['कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १)-कलम ५३०] याचे पोटकलम (१), हे जणू काही, त्या पोटकलमाच्या खंड (क) मध्ये या अधिनियमाचे कलम [3][१७] याच्या आधारे कंपनीची जी मत्ता मृत्यूबरोबर संक्रामित होते त्या मत्तेच्या बाबतीत प्रदेय असलेल्या कोणत्याही शुल्कासंबंधीचा उल्लेख समाविष्ट होता अशाप्रकारे परिणामक होईल आणि [4]['कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १)-कलम १२३] हे त्या अनुरोधाने परिणामक होईल.

(५) कलम १७ मुळे मृताच्या मृत्यूनंतर प्रदेय होणारे शुल्क हा, कंपनीकडे जी मत्ता मृत्यूच्या वेळी किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी आली असेल अशा मत्तेवरील तरत्या प्रतिभूतीच्या रूपाने पहिला प्रभार असेल आणि कोणत्याही वितरित मत्तेच्या बाबतीत, पोटकलम (१)-खंड (ग) मुळे कोणतीही व्यक्ती ज्याबद्दल उत्तरदायी होत असेल असा कोणताही शुल्कभाग हा देखील, त्या मत्तेवरील पहिला प्रभार असेल :

परंतु, जेणेकरून त्याची दखल नसताना सद्भावपूर्वक एखादी संपत्ती मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात खरेदी करणाऱ्या व्यक्तीच्या संबंधाने ती संपत्ती प्रभार्य होईल अशाप्रकारे या पोटकलमातील कोणतीही गोष्ट प्रवर्तित होणार नाही.

(६) जेथे कोणतीही शुल्काची रक्कम—

(क) केवळ पोटकलम (१)-खंड (ग) मुळे त्याबाबत उत्तरदायी होणाऱ्या व्यक्तीने भरली असेल तेथे ; किंवा

(ख) जिच्यावर तिचा प्रभार आहे अशा कोणत्याही वितरित मत्तेमधून, पोटकलम (५) च्या आधारे उभारली असेल तेथे,

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ८ द्वारे "ज्यांवर या अधिनियमाचा विस्तार आहे त्या राज्य क्षेत्रांबाहेर" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम ८ द्वारे "'भारतीय कंपनी अधिनियम, १९१३'-कलम २३१" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९५७ चा अधिनियम ३६-कलम ३ व अनुसूची दोन यांद्वारे "१६" याऐवजी घातले.

४. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ८ द्वारे "'भारतीय कंपनी अधिनियम, १९१३'-कलम १२९" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

त्या व्यक्तीस किंवा, प्रकरणपरत्वे, प्रभारास अधीन अशा त्या मत्तेला जी व्यक्ती हक्कदार होती तिला (या पोटकलमाव्यतिरिक्त तिला अंशदानाचा किंवा हानिरक्षणाचा जो कोणताही अधिकार असेल त्याला बाध न येता) अशाप्रकारे भरणा केलेली किंवा पूर्वोक्ताप्रमाणे उभारलेली शुल्काची रक्कम, उक्त खंड (ग्) च्या आधारे नव्हे तर अन्यथा, त्याबद्दल उत्तरदायी असलेल्या व्यक्तीकडून वसूल करता येईल.

(७) केवळ एखादी व्यक्ती मृताच्या मृत्यूच्या वेळी कंपनीकडे जी मत्ता होती तिच्यामधील कोणत्याही हितसंबंधाला किंवा अशा मत्तेवर प्रभारित असलेल्या कोणत्याही रकमेला हक्कदार होती एवढ्याच कारणावरून कंपनीला आपण भरलेल्या शुल्काचा कोणताही भाग त्या व्यक्तीकडून वसूल करता येणार नाही.

(८) कलम ५३ ची पोटकलमे (१) आणि (३) यांचे उपबंध, कलम १७ मुळे प्रदेय होणाऱ्या शुल्काच्या संबंधात परिणामक असणार नाहीत.

सर्वसाधारणतः नियंत्रित कंपन्यांच्या संबंधात नियम करण्याची शक्ती.

२०. (१) मंडळाला पुढील प्रकारचे नियम करता येतील :—

(क्) कोणत्या प्रकारच्या विल्हेवाटी किंवा क्रिया म्हणजे नियंत्रित कंपन्यांकडे केलेली हस्तांतरणे असल्याचे कलम १७ च्या अर्थानुसार मानण्यात येईल ते विहित करणारे;

(ख्) कोणत्या बाबी अशा कोणत्याही नियंत्रित कंपनीकडून मृताला उपार्जित होणारे लाभ म्हणून समजण्यात याव्यात, कोणत्या रीतीने त्यांची रक्कम निश्चित करण्यात यावी आणि कोणत्या वेळी ते उपार्जित होत असल्याचे समजण्यात यावे ते विहित करणारे;

(ग्) कोणत्या रीतीने अशा कोणत्याही कंपनीची निव्वळ प्राप्ती आणि तिच्या मत्तेचे मूल्य निश्चित करावयाचे ते विहित करणारे;

(घ्) कोणत्या रीतीने अशा कोणत्याही कंपनीच्या हिशेब-वर्षाची गणना करावयाची ते विहित करणारे;

(ङ्) अशा कोणत्याही कंपनीचे मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणारे शेअर्स आणि ऋणपत्रे यांचे संपदा शुल्कासाठी कोणत्या रीतीने मूल्यांकन करावयाचे ते विहित करणारे;

(च्) मृताने अशा कोणत्याही कंपनीकडे हस्तांतरित केलेल्या संपत्तीच्या मूल्याच्या संदर्भात वरची मर्यादा उपबंधित करणारे आणि अशा कोणत्याही कंपनीची मत्ता (किंवा तिचा यथाप्रमाण भाग) आणि मृताने धारण केलेले अशा कोणत्याही कंपनीचे शेअर्स आणि ऋणपत्रे या दोन्हींच्या बाबतीत जेथे अन्यथा शुल्क प्रदेय होत असेल तेथे, दुबार शुल्क आकारणीस प्रतिबंध करणारे;

(छ्) अशा कोणत्याही कंपनीच्या नावाने होणारे संव्यवहार हे संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यातील सद्भावपूर्ण व्यवहार असल्याचे कोणत्या शर्तीवर व कोणत्या व्याप्तीपर्यंत मानण्यात यावे ते विहित करणारे; आणि

(ज्) सर्वसाधारणतः अशा कोणत्याही कंपनीच्या यंत्रणेमार्फत संपदा शुल्क चुकवले जाण्यास आळा घालणारे.

(२) या कलमाखाली तयार करण्यात आलेले सर्व नियम, त्यांच्या अंतिम प्रकाशनाच्या दिनांकाच्या किमान पंधरा दिवस आधी लोकसभेसमोर ठेवण्यात येतील.

[1][विवक्षित प्रकरणांत भारताबाहेर निगमित झालेल्या कंपन्यांचे कर्तव्य आणि दायित्व.]

[1][**२०क.** भारताबाहेर निगमित झालेली जी कंपनी भारतामध्ये व्यापारधंदा चालवत असेल तिला 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा ११) याच्या प्रयोजनार्थ त्या कंपनीच्या कोणत्याही सदस्याच्या किंवा तिच्यामधील ऋणपत्रधारकाच्या मृत्यू-दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षाच्या बाबतीत पूर्ण झालेल्या तीन निर्धारणांपैकी दोन निर्धारणांच्या पुरती निवासी असल्याचे मानण्यात आले असेल त्याबाबतीत, सदस्याच्या किंवा, प्रकरणपरत्वे, ऋणपत्रधारकाच्या मृत्यूची खबर मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत ती कंपनी नियंत्रकाला मृताच्या कंपनीमध्ये जो हितसंबंध असेल त्याच्याबाबतीत विहित असेल असा तपशील पुरवील, आणि मृत व्यक्ती भारताचा अधिवासी असून या अधिनियमातील बाकीच्या उपबंधांपैकी कोणत्याही उपबंधानुसार उत्तरदायी असलेल्या व्यक्तीने, प्रकरणपरत्वे, त्या संबंधातील संपदा शुल्क भरण्यात आले आहे किंवा ते भरण्यात येईल किंवा कोणतेही संपदा शुल्क देय नाही अशा अर्थाचे प्रमाणपत्र नियंत्रकाकडून मिळवले असल्यास तेवढी प्रकरणे खेरीजकरून इतर बाबतींत, ती कंपनी मृताने कंपनीमध्ये धारण केलेले शेअर्स किंवा ऋणपत्रे यांच्या ऐन मूल्यावर दुसऱ्या अनुसूचीच्या २ऱ्या भागामध्ये उल्लेखिलेल्या दरांनी बसवण्यात येईल अशा संपदा शुल्काबद्दल उत्तरदायी राहील.]

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ९ द्वारे घातले (१ जुल, १९६० रोजी व तेव्हापासून).

## भाग ३ रा

## शुल्क-आकारणीला अपवाद

२१. (१) मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये,— विदेशी संपत्ती.

(एक) कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत,— मग तिची संव्यवस्था केलेली असो वा नसो— मृत व्यक्ती तिच्या मृत्यूच्या वेळी [1][भारतात] अधिवासी होती; किंवा

(दोन) मृत व्यक्ती ज्या संपत्तीची आजीव मालक असेल अशा संव्यवस्था केलेल्या संपत्तीच्या बाबतीत, संव्यवस्थाकर्ता हा ती संव्यवस्था परिणामक झाली त्या दिनांकी [1][भारतात] अधिवासी होता

असे नसेल तर,—

(क) [2][भारताबाहेर] असलेली स्थावर संपत्ती;

(ख) मृत्यूच्या वेळी [2][भारताबाहेर] असलेली जंगम संपत्ती,

समाविष्ट करण्यात येणार नाही.

(२) मंडळाला, या कलमाच्या प्रयोजनासाठी, निरनिराळ्या मत्ता-वर्गांचे स्वरूप व ठिकाण ज्या रीतीने निर्धारित करता येईल ती रीत विनियमित करणारे नियम करता येतील.

२२. मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये, मृताने न केलेल्या विल्हेवाटीखाली अगर, मृताने केलेल्या ज्या विल्हेवाटीअन्वये हिताधिकाऱ्याने मृत्यूच्या पूर्वी किमान [3][दोन वर्षे] संपत्तीचा कब्जा व उपभोग सद्‌भावपूर्वक ग्रहण केला असेल व तेव्हापासून पुढे मृतास अथवा एखाद्या संविदेद्वारे किंवा अन्यथा मृताला मिळणारा एखादा लाभ सर्वस्वी वगळून त्याने तो स्वतःकडे ठेवून घेतला असेल (मग ते मूळ विल्हेवाटीच्या आधारे असो वा मृताकडे मुळात राखून ठेवलेल्या कोणत्याही लाभाचे मागाहून अभ्यर्पण झाल्यामुळे असो वा अन्यथा असो) त्या विल्हेवाटीखाली मृताने अन्य व्यक्तीचा विश्वस्त म्हणून धारण केलेली संपत्ती समाविष्ट असल्याचे मानले जाणार नाही : मृताने विश्वस्त म्हणून धारण केलेली संपत्ती.

[4][परंतु, मृताने विवाहसाथी, पुत्र, कन्या, भाऊ किंवा बहीण यांच्या प्रीत्यर्थ केलेल्या विल्हेवाटी-अन्वये अन्य व्यक्तीचा विश्वस्त म्हणून धारण केलेले एखादे घर किंवा त्याचा भाग हा त्यामध्ये राहण्याचे अधिकार संबद्ध विल्हेवाटीखाली किंवा कोणत्याही सांपार्श्विक विल्हेवाटीखाली मृताप्रीत्यर्थ प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे राखून ठेवलेला किंवा सुनिश्चित करण्यात आला असल्यास तेवढे खेरीजकरून इतर बाबतीत, मृत व्यक्ती त्यामध्ये राहात होती एवढ्याच कारणास्तव, मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्ती-मध्ये समाविष्ट होत असल्याचे मानण्यात येणार नाही.]

२३. संव्यवस्था केलेल्या संपत्तीच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीचा संव्यवस्थेखालील हितसंबंध, तो कब्जागत हितसंबंध होण्यापूर्वी त्याच्या मृत्यूमुळे निष्फळ किंवा समाप्त झाला असेल आणि अशा संव्यवस्थे-खालील एक किंवा अधिक तदुत्तर प्रक्रांतिव्यवस्था अस्तित्वात राहिल्या असतील तेथे, असा हितसंबंध निष्फळ झाला किंवा समाप्त झाला एवढ्याच कारणास्तव ती संपत्ती त्याच्या मृत्यूबरोबर संक्रामित होत असल्याचे मानण्यात येणार नाही. जो हितसंबंध कब्जागत हितसंबंध होण्यापूर्वी निष्फळ होतो असा हितसंबंध.

**स्पष्टीकरण १.**—जेथे एखाद्या व्यक्तीने स्वतःच्या प्रीत्यर्थ हयातीकरता आणि स्वतःच्या मृत्यूनंतर अन्य कोणत्याही व्यक्तीप्रीत्यर्थ संपत्तीची संव्यवस्था केली असून अबाधित हितसंबंध किंवा विल्हेवाट करण्याची अबाधित शक्ती अखेरीस संव्यवस्थाकर्त्याकडे प्रत्यावर्तित व्हावयाची असेल तेथे, अशा अन्य व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्यावेळी तहहयात मालक म्हणून ज्याच्याकडे संपत्तीचा कब्जा आहे तो संव्यवस्था-कर्ता अशा मृत्यूनंतर तत्काळ प्रत्यावर्ती अधिकारास हक्कदार होतो किंवा संपूर्ण संपत्तीची विल्हेवाट करण्याची अबाधित शक्ती त्याला प्राप्त होते एवढ्याच कारणास्तव, ती संपत्ती अशा मृत्यूनंतर संव्यवस्था-कर्त्याकडे संक्रामित होते असे मानले जाणार नाही.

**स्पष्टीकरण २.**—जेथे संव्यवस्था करून दिलेल्या संपत्तीतील एखाद्या व्यक्तीचा हितसंबंध मृत्युपत्र-कर्त्याच्या किंवा अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या संपदेच्या अवशिष्टातील किंवा अवशिष्टाच्या भागातील हितसंबंधाचा बनलेला असेल आणि उक्त संपदा त्या व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत प्रशासनाखाली असण्याचे चालू राहील तेथे, अशा व्यक्तीचा अवशिष्टात किंवा अवशिष्टाच्या भागात असलेला उक्त हितसंबंध हा, जर मृत्युपत्रकर्त्याच्या किंवा अकृतमृत्युपत्र व्यक्तीच्या मृत्यूनंतर अवशिष्ट तत्काळ विनिश्चित करण्यात आला असता तर, अवशिष्टापासून किंवा अवशिष्टाच्या भागापासून मिळणारी प्राप्ती ज्या दिनांकी व जेव्हापासून त्या हितसंबंधाशी संबंधनीय झाली असती त्या दिनांकापासून कब्जागत हितसंबंध झाल्याचे मानण्यात येईल.

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम १० द्वारे "अधिनियमाचा विस्तार असलेल्या राज्यक्षेत्रामध्ये" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १० द्वारे "उक्त राज्यक्षेत्रांबाहेर" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. १९६६ चा अधिनियम १३-कलम ३८ द्वारे 'एक वर्ष' याऐवजी हा उल्लेख घातला (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

४. १९६५ चा अधिनियम १०-कलम ६९ द्वारे मूळ परंतुकाऐवजी घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

विल्हेवाटकर्त्याकडे प्रत्यावर्तित होणारी संपत्ती.

२४. (१) जर कोणत्याही संपत्तीच्या विल्हेवाटीद्वारे विल्हेवाटकर्त्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीला, तहहयात किंवा तिच्या मृत्यूबरोबर समापनीय असा एखादा हितसंबंध प्रदान केला असून विल्हेवाटकर्त्याला उर्वरित हितसंबंध अबाधितपणे प्रदान केलेला असेल आणि अशा व्यक्तीने हितसंबंधाचा कब्जा घेऊन तेव्हापासून पुढे तो कब्जा ठेवून घेतला असेल तर, अशा व्यक्तीच्या मृत्यूनंतर, विल्हेवाटकर्त्याच्या हयातीत त्या हितसंबंधाचे त्याजकडे प्रत्यावर्तन झाले एवढ्याच कारणास्तव, ती संपत्ती त्याच्याकडे संक्रामित झाली असे मानण्यात येणार नाही.

(२) जेथे कोणत्याही संपत्तीचा विल्हेवाटीद्वारे पोटकलम (१) मध्ये उल्लेखलेला असा कोणताही हितसंबंध, दोन किंवा अधिक व्यक्तींना अलगअलगपणे किंवा संयुक्तपणे किंवा अनुक्रमाने प्रदान केला असेल तेथे, पोटकलम (१) हे असा हितसंबंध एका व्यक्तीला प्रदान केलेला असता ज्या पद्धतीने ते लागू होते त्याच पद्धतीने लागू होईल :

परंतु, जेथे तहहयात किंवा समापनीय असा उक्त हितसंबंध प्राप्त होणारी अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती, विल्हेवाट होण्यापूर्वी कोणत्याही वेळी ती स्वतः किंवा त्या स्वतः उक्त संपत्तीची विल्हेवाट करण्यास सक्षम असेल किंवा असतील तेथे, पोटकलम (१) लागू होणार नाही.

विवाहसाथीच्या मृत्यूनंतर संव्यवस्थाबद्ध संपत्तीपासून मिळणारी प्राप्ती.

२५. जेथे पती किंवा पत्नी यांपैकी एकजण या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी जी विल्हेवाट परिणामक झाली तिच्याअन्वये त्यांच्यापैकी दुसऱ्याने संव्यवस्था केलेल्या संपत्तीपासून मिळणाऱ्या प्राप्तीस एकटाच किंवा त्या दुसऱ्या व्यक्तीबरोबर संयुक्तपणे हक्कदार असेल आणि त्याचा किंवा तिचा मृत्यू होताच उत्तरजीवी व्यक्ती स्वतः संव्यवस्था केलेल्या संपत्तीपासून होणाऱ्या प्राप्तीस ऐन संपत्ती सोडून हक्कदार होईल तेथे, अशा उत्तरजीवी व्यक्तीच्या मृत्यूपर्यंत त्या संपत्तीबाबत संपदा शुल्क प्रदेय असणार नाही.

पैशाच्या रूपातील संपूर्ण किंवा आंशिक प्रतिफलाच्या बदल्यात सद्भावपूर्वक केलेल्या खरेदीमुळे संक्रामित होणारी संपत्ती.

२६. (१) कलम २७ व कलम ४६ यांच्या उपबंधांच्या अधीनतेने, जिने केलेल्या विल्हेवाटीनुसार संपत्ती संक्रामित होते अशा व्यक्तीकडून संपत्ती सद्भावपूर्वक खरेदी करण्यात आली होती एवढ्याच कारणास्तव मृत व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या त्या संपत्तीच्या बाबतीत, किंवा अनेकांच्या हयातीकरिता दिलेल्या कोणत्याही भाडेपट्टयाअन्वये कब्जात येणाऱ्या प्रत्यावर्ती हितसंबंधाच्या बाबतीत, किंवा अनेकांच्या हयातीकरता दिलेल्या कोणत्याही वार्षिकीच्या समापनाच्या बाबतीत, जेथे विक्रेत्याला किंवा दात्याला त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी किंवा भाडेपट्टयाच्या संबंधात दाता हा जिचा विश्वस्त होता अशा व्यक्तीच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील प्रतिफलाच्या बदल्यात अशी खरेदी करण्यात आली असेल किंवा भाडेपट्टा किंवा वार्षिकी देण्यात आली असेल तेथे, संपदा शुल्क प्रदेय असणार नाही.

(२) जेथे विक्रेत्याला किंवा दात्याला, त्याच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी किंवा भाडेपट्टयाच्या बाबतीत दाता हा जिचा विश्वस्त होता अशा कोणत्याही व्यक्तीच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील आंशिक प्रतिफलाच्या बदल्यात अशी कोणतीही खरेदी करण्यात आली असेल अथवा भाडेपट्टा किंवा वार्षिकी देण्यात आली असेल तेथे, संपदा शुल्काच्या प्रयोजनार्थ वजात म्हणून प्रतिफलाचे मूल्य संपत्तीच्या मूल्यातून मजरा घालण्यात येईल.

नातेवाईकांच्या प्रीत्यर्थ केलेली विल्हेवाट.

२७. (१) मृताने त्याच्या नातेवाईकाच्या प्रीत्यर्थ केलेली विल्हेवाट जर—

(क) मृताच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी त्याला देण्यात आलेला पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात मृताने केलेली नसेल; किंवा

(ख) मृत व्यक्ती तिने केलेल्या विल्हेवाटीद्वारे नव्हे तर अन्यथा तिच्याकडे आलेल्या विश्वासाच्या भूमिकेत आणि केवळ अशाच भूमिकेत संबंधित नसेल तर,

ती विल्हेवाट [1][या अधिनियमाच्या] प्रयोजनार्थ दान असल्याचे समजण्यात येईल; आणि या अधिनियमातील दानासंबंधीच्या निर्देशांचा त्या अनुरोधाने अर्थ लावण्यात येईल :

परंतु, जेथे विल्हेवाट ही मृताच्या स्वतःच्या उपयोगासाठी किंवा हितासाठी पैसा किंवा पैशाचे सममूल्यक या रूपातील आंशिक प्रतिफलाच्या बदल्यात मृताने केली असेल तेथे, संपदा शुल्काच्या प्रयोजनार्थ वजात म्हणून प्रतिफलाचे मूल्य संपत्तीच्या मूल्यातून मजरा घालण्यात येईल.

(२) जेथे मृताने त्याच्या नातेवाईकाच्या प्रीत्यर्थ संपत्तीची विल्हेवाट केली असेल तेथे मृताच्या प्रीत्यर्थ, मृताच्या अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या मर्यादित वार्षिकीची किंवा अन्य हितसंबंधाची निर्मिती किंवा विल्हेवाट हे या कलमाच्या प्रयोजनार्थ, मृताने केलेल्या विल्हेवाटी-दाखल असलेले प्रतिफल समजण्यात येणार नाही.

(३) नियंत्रित कंपनी, ज्याच्या संबंधात पोटकलम (१) च्या खंड (क) चे किंवा त्याच्या परंतुकाचे उपबंध परिणामक असल्याचा दावा सांगण्यात आला आहे अशा संव्यवहारात निबद्ध असेल तर, ते उपबंध पुढील परिस्थितीत परिणामक झाले असते याविषयी नियंत्रकाची खात्री झाली तर आणि तरच फक्त आणि तेवढ्याच व्याप्तीपर्यंत ते उपबंध त्यासंबंधात परिणामक होतील, ती परिस्थिती अशी की—

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम ११ द्वारे 'कलम ९' या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

जर कंपनीने आपले सदस्य आणि संपूर्णपणे व अनन्येकरून धंद्याच्या प्रयोजनासाठी नव्हे तर अन्यथा ज्या व्यक्तीबाबत ती कोणत्याही दायित्वास अधीन आहे अशी अन्य कोणतीही व्यक्ती यांच्याकरता, कंपनीतील शेअर्स व तिचो ऋणपत्रे यांच्याशी संलग्न असलेले अधिकार व ज्या अटींवर असे कोणतेही दायित्व आले होते त्या अटी यांच्यानुसार न्यास म्हणून तिची मत्ता धारण केलेली असेल, आणि केवळ कंपनीचा धंदा चालवण्याची व कंपनीची मत्ता त्याकामी वापरण्याची शक्ती असलेला विश्वस्त या भूमिकेतून कंपनी वागली असेल तर.

(४) एखाद्या नियंत्रित कंपनीने मृताच्या नातेवाईकाच्या प्रीत्यर्थ केलेले दान दिले जाण्याच्या वेळी मृताचे तिच्यावर कलम १७ च्या अर्थानुसार नियंत्रण असेल तर, ते दान म्हणजे [1][या अधिनियमाच्या] प्रयोजनापुरते, मृताने केलेले दान होय आणि त्या दानाअन्वये प्राप्त होणारी संपत्ती ही मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीमध्ये त्या कलमाच्या आधारे समाविष्ट आहे असे समजणे लगत-पूर्व पोटकलमात उल्लेखिलेल्या परिस्थितीत क्रमप्राप्त आहे याबाबत नियंत्रकाची खात्री होईल तर व तेवढ्या व्याप्तीपर्यंत तसे समजले जाईल.

(५) मृताने एखाद्या नियंत्रित कंपनीच्या प्रीत्यर्थ विल्हेवाट केली असून, ती विल्हेवाट त्याच्या नातेवाईकाच्या प्रीत्यर्थ केली असती तर पोटकलम (२) च्या कक्षेत आली असती असे असेल तेव्हा, मृताचा कोणीही नातेवाईक विल्हेवाटीच्या वेळी किंवा त्यानंतर मृताच्या हयातीत कंपनीचा सदस्य नव्हता असे नियंत्रकाची खात्री होईल अशा रीतीने दाखवून देण्यात आले नाही तर, ती विल्हेवाट जणू काही मृताच्या नातेवाईकाच्या प्रीत्यर्थ करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे हे कलम परिणामक होईल.

**स्पष्टीकरण.**---या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी जी नियंत्रित कंपनी अशा दुसऱ्या कंपनीची सदस्य आहे त्या कंपनीची सदस्य असलेली अशी किंवा असल्याचे या उपबंधाच्या आधारे मानण्यात येणारी अशी व्यक्ती, त्या दुसऱ्या कंपनीची सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

(६) मृताला, पोटकलम (२) मध्ये उल्लेखिलेल्या अशा वार्षिकीच्या किंवा अन्य हितसंबंधाच्या संबंधातील कोणतीही रक्कम मिळण्यास अनुलक्षून जेथे सहयोगी क्रिया करण्यात आल्या असतील किंवा अशी कोणतीही रक्कम मिळणे त्याला शक्य व्हावे किंवा सुकर व्हावे या दृष्टीने त्या करण्यात आल्या असतील तेथे, हे कलम ज्याप्रमाणे मृताच्या प्रीत्यर्थ अशी वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध निर्माण करण्याच्या किंवा त्यांची विल्हेवाट करण्याच्या संबंधात परिणामक होते त्याप्रमाणे त्या सहयोगी क्रियांपैकी प्रत्येक क्रियेच्या संबंधात ते परिणामक होईल.

(७) या कलमामध्ये---

(एक) "नातेवाईक" याचा मृताच्या संबंधातील अर्थ,---

(क) मृताची पत्नी किंवा पती,

(ख) मृताचा पिता, माता, अपत्ये, चुलते/मामा/मावसे/आत्यांचे पती आणि चुलत्या/मामी/मावश्या/आत्या,

(ग) मागीलपैकी कोणत्याही उपखंडाच्या कक्षेत येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीची कोणतीही संतती आणि अशा कोणत्याही व्यक्तीशी किंवा संततीशी विवाहबद्ध असलेली अन्य व्यक्ती असा आहे;

(दोन) "अपत्ये" आणि "संतति" यांच्या उल्लेखात, अनौरस अपत्ये आणि दत्तक अपत्ये यांच्या उल्लेखाचा समावेश आहे;

(तीन) "वार्षिकी" यामध्ये, कोणत्याही प्रदानांच्या मालिकेचा समावेश आहे,---मग ती प्रदाने परस्परनिगडित असोत वा नसोत, सारख्याच रकमेची असोत वा वेगवेगळ्या रकमांची असोत आणि ठराविक कालांतरागणिक प्रदेय असोत वा अन्य प्रकारे प्रदेय असोत---आणि कंपनीतील शेअर्स किंवा तिची ऋणपत्रे यांच्यावरील लाभांशांची किंवा व्याजांची प्रदाने म्हणजे जर ती मृत्यू होताच थांबण्यास पात्र असतील अथवा कंपनीतील शेअर्स किंवा ऋणपत्रे यांच्याशी संलग्न असलेल्या कोणत्याही अधिकारांचे विलोपन झाल्यामुळे किंवा त्या अधिकारात कोणताही बदल झाल्यामुळे किंवा ते शेअर्स किंवा ऋणपत्रे काढली गेल्यामुळे प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, त्यात घट होण्यास पात्र असतील तर, ती प्रदाने म्हणजे या कलमाच्या प्रयोजनार्थ मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या मर्यादित वार्षिकीला घटकभूत असणाऱ्या प्रदानांची मालिका होय असे समजण्यात येईल;

(चार) "सहयोगी क्रिया" याचा अर्थ---

(क) ज्या क्रिया, एकाच संपत्तीवर परिणाम करतात किंवा ज्यांपैकी एक क्रिया एखाद्या संपत्तीवर परिणाम करत असून दुसरी किंवा दुसऱ्या क्रिया जी संपत्ती प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे त्या संपत्तीचे प्रतिरूप असेल अशा संपत्तीवर किंवा त्या संपत्तीतून उद्-भवणाऱ्या प्राप्तीवर किंवा कोणत्याही संचयी प्राप्तीचे प्रतिरूप असेल अशा कोणत्याही संपत्तीवर परिणाम करते किंवा करतात, किंवा

---

१. १९५८ चा अधिनियम ३३--कलम ११ द्वारे 'कलम ९' याऐवजी वरील शब्दोल्लेख घातला (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

(ख) ज्या कोणत्याही दोन क्रियांपैकी एक क्रिया दुसरीला अनुलक्षून किंवा ती घडवून आणणे शक्य व्हावे किंवा ती घडून येणे सुकर व्हावे यासाठी घडवून आणण्यात येते आणि त्या दोहोंपैकी कोणत्याही क्रियेशी ज्या कोणत्याही तिसऱ्या क्रियेचा तशाच प्रकारचा संबंध असतो, आणि त्या तिहींपैकी कोणत्याही क्रियेशी ज्या चौथ्या क्रियेचा संबंध आहे आणि याप्रमाणे पुढे तशीच परंपरा चालू असते,

अशा कोणत्याही प्रकारच्या दोन किंवा अधिक क्रिया असा आहे; मग त्या क्रिया एकाच व्यक्तीने केलेल्या असोत वा वेगवेगळ्या व्यक्तींनी केलेल्या असोत, पूर्वोक्त पद्धतीपेक्षा वेगळ्या प्रकारे निगडित असोत वा नसोत, आणि त्या समकालीन असोत अगर त्यांपैकी एक दुसरीच्या आधी घडो वा मागाहून घडो.

विवक्षित पूर्ववर्ती विक्री आणि गहाणे यांच्यावर नवीन व वाढीव शुल्कदरांचा परिणाम.

२८. जेथे कोणत्याही संपत्तीमधील अपेक्षी हितसंबंध पैशाच्या रूपातील किंवा पैशाइतकेच मूल्य असलेल्या गोष्टीच्या रूपातील संपूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात सद्भावपूर्वक विकण्यात आला असेल किंवा गहाण ठेवण्यात आला असेल---मग ते या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी असो वा त्यानंतर असो---आणि हितसंबंध कब्जात येण्याच्या वेळी संपदा शुल्काचे जे दर मृत्यू पावणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत अंमलात असतील ते मृत्यू पावणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत लागू होणारे असे विक्रीच्या किंवा गहाणाच्या वेळीचे काही दर अंमलात असल्यास त्यांपेक्षा जास्त असतील तेथे,–

(क) मृत्यू पावणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीत लागू होणारे असे विक्रीच्या किंवा गहाणाच्या वेळचे काही संपदा शुल्काचे दर अंमलात असल्यास ते दर असते तर, खरेदीदार किंवा गहाणधारक यांच्याकडून संपत्तीबाबत प्रदेय झाले असते असे कोणतेही शुल्क असल्यास त्याहून अन्य कोणतेही शुल्क त्याला हितसंबंध कब्जात येईल तेव्हा द्यावे लागणार नाही, आणि

(ख) गहाणाच्या बाबतीत, गहाणदाराकडून प्रदेय असलेले कोणतेही त्याहून अधिक शुल्क हा गहाणाच्या नंतरचा प्रभार म्हणून, क्रमित होईल.

संव्यवस्था केलेल्या ज्या संपत्तीच्या बाबत मृताच्या विवाह-साथीच्या मृत्यूनंतर संव्यवस्थेच्या दिनांकापासून संपदा शुल्क भरण्यात आले असेल ती संपत्ती.

२९. विवाहसाथींपैकी एकाच्या मृत्यूनंतर कोणत्याही संव्यवस्थाबद्ध संपत्तीच्या संबंधात अगोदरच संव्यवस्थेच्या दिनांकापासूनचे संपदा शुल्क भरण्यात आलेले असेल तेव्हा, त्या विवाहसाथींपैकी दुसऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्या संपत्तीबाबत संपदा शुल्क भरावे लागणार नाही, मात्र ही दुसरी व्यक्ती आपल्या मृत्यूच्या वेळी किंवा संव्यवस्था चालू असताना कोणत्याही वेळी अशा संपत्तीची विल्हेवाट करण्यास सक्षम होती आणि तिच्या मृत्यूनंतर अशा संपत्तीच्या संबंधात संव्यवस्थेखालील उत्तरवर्ती प्रक्रांतिव्यवस्था अंमलात आल्या असल्यास त्या बाबतीत ती आपल्या मृत्यूच्या वेळी स्वाधिकारी होती असे असेल तर गोष्ट अलाहिदा.

विवक्षित प्रकरणीं पेन्शने, इ. ना सूट.

[1][ २९क. (क) मृताच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवेला किंवा इतर अवलंबित व्यक्तींना केंद्र शासनाच्या सुधारित पेन्शन नियमांखाली अथवा राज्य शासन किंवा प्रांतीय अधिनियमाद्वारे स्थापन झालेला निगम यांच्या कोणत्याही तत्सम योजनेखाली अथवा संरक्षण सेवेतील सदस्यांना लागू असलेल्या नवीन पेन्शन संहितेखाली उपार्जित होणारे किंवा उद्‌भवणारे कोणतेही पेन्शन याबाबत; अथवा

(ख) जी कोणतीही वार्षिकी किंवा पेन्शन अशी विधवा किंवा अवलंबित व्यक्ती यांना–

(एक) 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा ११) किंवा 'प्राप्तिकर अधिनियम, १९६१,' (१९६१ चा ४३) याखाली संमत झालेल्या वयोनिवृत्तिवेतन निधीतून प्रदेय असेल त्याबाबत, अशा वार्षिकीची किंवा पेन्शनची रक्कम दरसाल पंधरा हजार रुपयांच्या सममूल्यकापेक्षा अधिक होणार नाही इतक्या व्याप्तीपर्यंत;

(दोन) केंद्र शासन याबाबत **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा आंतरराष्ट्रीय संघटनांनी स्थापन केलेल्या वयोनिवृत्तिवेतन निधीतून किंवा पेन्शन निधीतून प्रदेय असेल त्याबाबत,

संपदा शुल्क प्रदेय असणार नाही. ]

संपदा शुल्काच्या संबंधात दुबार कराधान टाळण्यासाठी किंवा त्यातून सुटका देण्यासाठी करार.

३०. केंद्र शासनाला कोणत्याही प्रतियोगी देशाच्या शासनाशी, या अधिनियमाखाली आणि प्रतियोगी देशामध्ये अंमलात असलेल्या समनुरूप कायद्याखाली आकारणीयोग्य असलेल्या संपदा शुल्काच्या संबंधात दुबार कराधान टाळण्यासाठी किंवा त्यातून सुटका देण्यासाठी करार करता येईल, आणि कराराची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असेल त्याप्रमाणे **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे तो उपबंध करता येईल.

**स्पष्टीकरण**.---या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी, "प्रतियोगी देश" याचा अर्थ, केंद्र शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे जो देश प्रतियोगी देश असल्याचे घोषित करील असा कोणताही देश असा आहे.

---

१. १९६५ चा अधिनियम १०-कलम ६९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

३१. कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या कोणत्याही संपत्तीवर संपदा शुल्क प्रदेय झाले आहे आणि त्यानंतर पाच वर्षांच्या आत पहिल्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर जिच्याकडे संपत्ती संक्रामित झाली अशा व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या त्याच संपत्तीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर पुन्हा संपदा शुल्क प्रदेय झाले आहे अशी मंडळाची खात्री झाली असेल अशा बाबतीत याप्रमाणे संक्रामित होणाऱ्या संपत्तीच्या संबंधात, उपरोक्त दुसऱ्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर प्रदेय असलेल्या संपदा शुल्काची रक्कम पुढीलप्रमाणे कमी करण्यात येईल :— संपत्तीच्या त्वरित उत्तराधिकारासाठी मजरा.

दुसरा मृत्यू पहिल्या मृत्यूपासून एक वर्षाच्या आत झाला तर, पन्नास टक्क्यांनी ;

दुसरा मृत्यू पहिल्या मृत्यूपासून दोन वर्षांच्या आत झाला तर, चाळीस टक्क्यांनी ;

दुसरा मृत्यू पहिल्या मृत्यूपासून तीन वर्षांच्या आत झाला तर, तीस टक्क्यांनी ;

दुसरा मृत्यू पहिल्या मृत्यूपासून चार वर्षांच्या आत झाला तर, वीस टक्क्यांनी ;

दुसरा मृत्यू पहिल्या मृत्यूपासून पाच वर्षांच्या आत झाला तर, दहा टक्क्यांनी :

परंतु, दुसऱ्या मृत्यूनंतर ज्यावर शुल्क प्रदेय आहे असे संपत्तिमूल्य पहिल्या मृत्यूनंतर ज्यावर शुल्क प्रदेय होते अशा संपत्तिमूल्याहून अधिक असेल अशा बाबतीत, या कलमाखाली ज्याच्या बाबतीत घटीची रक्कम परिगणना करून ठरवावयाची त्या शुल्काची रक्कम परिगणना करून ठरवण्याच्या प्रयोजनार्थ पहिल्या मूल्याऐवजी नंतरचे मूल्य धरण्यात येईल.

**स्पष्टीकरण १.**—या कलमाच्या प्रयोजनासाठी, प्रत्येक मृत्यू लगतपूर्व मृत्यूच्या संबंधात दुसरा मृत्यू असल्याचे मानण्यात येईल.

**स्पष्टीकरण २.**—या कलमाच्या प्रयोजनांसाठी कोणत्याही कालावधीची संगणना करताना, जिच्या संपत्तीच्या संबंधात संपदा शुल्क प्रदेय झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये होणारे मृत्यू हे एकच मृत्यू असल्याचे समजण्यात येईल आणि उक्त तीन महिन्यांच्या कालावधीमध्ये होणाऱ्या नंतरच्या मृत्यूमुळे त्याच संपत्तीवर कोणतेही संपदा शुल्क पुन्हा द्यावे लागणार नाही.

**३२.** कोणत्याही हिंदू विधिप्रणालीद्वारे नियंत्रित होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूनंतर कोणत्याही संपत्तीमधील तिचा हितसंबंध त्या व्यक्तीच्या विधवेकडे प्रक्रांत झाला असेल त्याबाबतीत, विधवा तिच्या पतीच्या मृत्यूनंतर सात वर्षांच्या आत मृत्यू पावली आणि पूर्वोक्त हितसंबंध प्रत्यावर्ती मालकाकडे किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकाकडे प्रक्रांत झाला असेल तेव्हा, तिच्या पतीच्या मृत्यूनंतर असा हितसंबंध संक्रामित व्हावयाच्या बाबतीत संपदा शुल्क भरण्यात आले असेल तर आणि तेथवर, विधवेच्या मृत्यूनंतर पूर्वोक्त हितसंबंध संक्रामित व्हावयाच्या बाबतीत कोणतेही संपदा शुल्क बसवता येणार नाही. हिंदू विधवेचा जो हितसंबंध प्रत्यावर्ती मालकाकडे प्रक्रांत होतो त्याला सूट.

**३३.** (१) मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या त्याच्या मालकीच्या पुढीलपैकी कोणत्याही प्रकारच्या संपत्तीबाबत या पोटकलमात प्रत्येक खंडासमोर विनिर्दिष्ट केलेल्या मर्यादेपर्यंत कोणतेही संपदा शुल्क प्रदेय असणार नाही — सूट.

(क) मृताने आपल्या मृत्यूपूर्वी सहा महिन्यांच्या कालावधीत एखाद्या सार्वजनिक धर्मादाय प्रयोजनासाठी केलेल्या [१][एका किंवा अधिक दानांखाली] प्राप्त झालेली संपत्ती —दोन हजार पाचशे रुपये इतक्या मूल्यमर्यादेपर्यंत;

(ख) मृताने आपल्या मृत्यूपूर्वी [२][दोन वर्षांच्या] कालावधीत अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या [१][एका किंवा अधिक दानांखाली] प्राप्त झालेली संपत्ती—एक हजार पाचशे रुपये इतक्या मूल्यमर्यादेपर्यंत ;

(ग) मृताला आपल्या उदरनिर्वाहासाठी द्रव्यार्जन करता यावे यासाठी आवश्यक होती अशी कारागिराची हत्यारे, शेतकी अवजारे अथवा अन्य कोणतीही हत्यारे किंवा अवजारे यांचा समावेश असलेल्या गृहोपयोगी चिजा—दोन हजार पाचशे रुपये इतक्या मूल्यमर्यादेपर्यंत ;

(घ) विक्रीसाठी उद्देशित नसलेली पुस्तके ;

(ङ) परिधानवस्त्रे—पण परिधानवस्त्रांवर कशिदाकाम किंवा शिवणकाम करून जडवलेली असली वा नकली रत्ने किंवा रत्नवत् खडे किंवा भूषणे यांचा यात समावेश नाही;

(च) संपदा शुल्क भरण्यासाठी मृताने काढलेल्या किंवा उक्त प्रयोजनासाठी शासनाकडे अभिहस्तांकित केलेल्या एका किंवा अधिक आयुर्विमापत्राखाली प्रदेय असलेले पैसे—प्रदेय असलेल्या शुल्काच्या रकमेच्या मर्यादेपर्यंत[३] * * * ;

---

१. १९५८ चा अधिनियम ३३–कलम १२ द्वारे "दानाखाली" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९५६ चा अधिनियम १३–कलम ३८ द्वारे 'एक वर्ष' या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

३. १९५४ चा अधिनियम १७–कलम ४ द्वारे ", पण पाच रुपयांहून अधिक नव्हे" हे शब्द गाळले (१५ ऑक्टोबर, १९५३ रोजी व तेव्हापासून).

(छ्) संपदा शुल्क भरण्यासाठी विहित असेल अशा पद्धतीने शासनाकडे निक्षेपित केलेले पैसे विहित असेल अशा दराने त्यावर देय म्हणून प्रोद्भूत झालेल्या व्याजासह प्रदेय असलेल्या शुल्काच्या रकमेच्या मर्यादेपर्यंत[1] * * * * :

[2][परंतु, ज्या रकमेबाबत कलम (च्) किंवा (छ्) याखाली किंवा दोन्ही खाली कोणतेही संपदा शुल्क प्रदेय असणार नाही अशी एकूण रक्कम पन्नास हजारांहून अधिक असणार नाही;]

(ज्) मृत व्यक्तीने काढलेल्या एका किंवा अधिक आयुर्विमापत्रांखाली प्रदेय असलेले पैसे---पाच हजार रुपयांच्या मर्यादेपर्यंत ;

(झ्) जी राष्ट्रीय, शास्त्रीय किंवा ऐतिहासिक महत्त्वाची असून मृताच्या कुटुंबात ठेवून घेण्यात आली आहेत व मंडळ विहित करील अशा शर्तींनुसार ज्यांबद्दल व्यवहार करण्यात येतो किंवा ज्यांची विल्हेवाट करण्यात येते अशी अथवा जी शासनाला किंवा कोणत्याही विद्यापीठाला किंवा अन्य सार्वजनिक संस्थेला बिनशर्त देऊन टाकलेली किंवा मृत्युपत्राने दिलेली आहेत अशी रेखाटने, रंगचित्रे, छापप्रती, हस्तलिखिते, कलाकृती किंवा पुरातत्त्वीय किंवा शास्त्रीय संग्रह ;

(ञ्) मृताच्या कुटुंबात ठेवण्यात आलेली व मंडळ विहित करील अशा शर्तींनुसार ज्यांबद्दल व्यवहार करण्यात येतो किंवा ज्यांची विल्हेवाट करण्यात येते अशी व विकण्यासाठी उद्देशित नसलेली खंड (झ्) खाली न येणारी रेखाटने, रंगचित्रे, छायाचित्रे, छापप्रती, हस्तलिखिते, आणि अन्य कोणतीही वंशपरंपरागत वस्तू ;

(ट्) जीवनावश्यक गरजांबाबत आपल्यावर अवलंबून असलेल्या स्त्री-नातेवाईकांपैकी कोणाच्याही विवाहासाठी मृत आई-वा-बापाने किंवा नैसर्गिक पालकाने काढलेल्या किंवा केलेल्या विमापत्रांनुसार किंवा न्यासाच्या घोषणापत्रांनुसार किंवा संव्यवस्थांनुसार वेगळे काढून ठेवलेले पैसे---अशांपैकी प्रत्येक नातेवाईकाच्या विवाहाच्या बाबतीत [3] [दहा हजार रुपये] इतक्या मर्यादेपर्यंत ;

[4][(ठ्) 'विलीन संस्थाने (कराधान सवलती) आदेश, १९४९'---परिच्छेद १३ खाली किंवा 'भाग ख संस्थाने (कराधान सवलती) आदेश, १९५०'---परिच्छेद १५ खाली केंद्र शासनाने एखाद्या संस्थानाधिपतीचे अधिकृत निवासस्थान म्हणून घोषित केलेली त्या संस्थानाधिपतीच्या ताब्यातील कोणतीही एक इमारत ;

(ड्) जो संघराज्याच्या सशस्त्र सेनेचा सदस्य होता व शत्रुविरोधी कामगिऱ्या चालू असताना केलेल्या लढाईमध्ये मारला गेला असेल त्या मृताची संपत्ती ;]

[5][(ड्ड्) कोणत्याही पोलीस दलाचा (सीमा सुरक्षा दलासह) सदस्य असून जो सीमेचे संरक्षण करीत असताना कोणत्याही लढाईमध्ये मारला गेला असेल त्या मृताची संपत्ती ;]

[6][(ढ्) आपले निवासस्थान म्हणून अनन्यपणे मृत व्यक्ती ज्याचा वापर करत होती असे एक घर किंवा त्याचा भाग---असे घर दहा हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावी असेल तर त्याच्या ऐन मूल्याइतक्या पण एक लाख रुपयांहून अधिक नाही इतक्या मर्यादेपर्यंत आणि इतर कोणत्याही बाबतीत संपूर्ण ऐन मूल्याच्या मर्यादेपर्यंत ;]

[7][(ण्) मृताने, त्याच्या मृत्यूपूर्वीच्या पाच वर्षांच्या कालावधीपूर्वी आपल्या विवाहसाथीला पुत्राला, कन्येला, भावाला किंवा बहिणीला दिलेल्या कोणत्याही दानाखाली प्राप्त झालेली संपत्ती

परंतु, ती संपत्ती ३१ मार्च, १९६४ नंतर सुरू होणाऱ्या कोणत्याही निर्धारण वर्षासाठी 'दान कर अधिनियम, १९५८' (१९५८ चा १८) याखाली दान कराच्या आकारणीला पात्र असली पाहिजे किंवा त्या अधिनियमाच्या कलम ५ खाली आकारणीपात्र नसली पाहिजे;]

[8][(त्) 'राष्ट्रीय संरक्षण सुवर्ण रोखे, १९८०'---एकूण पन्नास किलोग्रॅम वजनाच्या सोन्यासाठी असलेल्या अशा रोख्यांच्या ऐन मूल्याच्या मर्यादेपर्यंत :

परंतु, असे रोखे कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित झाले असतील तर, या खंडानुसार प्रदान करण्यात आलेली सूट त्यानंतरच्या कोणत्याही मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या त्याच रोख्यांच्या बाबतीत उपलब्ध असणार नाही.]

---

१. १९५४ चा अधिनियम १७-कलम ४ द्वारे ", पण पाच रुपयांहून अधिक नव्हे" हे शब्द गाळले (१५ ऑक्टोबर, १९५३ रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता–कलम ४ द्वारे घातले (१५ ऑक्टोबर, १९५३ रोजी व तेव्हापासून).

३. १९५८ चा अधिनियम ३३–कलम १२ द्वारे "पाच हजार रुपये" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता –कलम १२ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

५. १९६६ चा अधिनियम १३–कलम ३८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

६. १९६४ चा अधिनियम ५-कलम ४९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).

७. १९६५ चा अधिनियम १०–कलम ६९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

८. १९६५ चा अधिनियम ४१–कलम ५ द्वारे घातले.

(२) कोणत्याही संपत्तिवर्गाच्या किंवा व्यक्तिवर्गाच्या बाबतीत, पोटकलम (१) अन्वये उपबंधित करण्यात आलेल्या सवलतींच्या शिवाय आणखी काही सवलत देण्यात यावी अशी परिस्थिती आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, त्यास शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, अशा कोणत्याही संपत्ति-वर्गाच्या अथवा कोणत्याही व्यक्तिवर्गाच्या संपूर्ण संपत्तीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत, संपदा शुल्कातून कोणतीही सूट देता येईल, दरात घट करता येईल किंवा अन्य आपरिवर्तन करता येईल आणि याप्रमाणे काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना ती काढण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येईल.

## भाग ४ था

## संपत्तीची एकवट व शुल्काचे दर

[1][ ३४. (१) मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या कोणत्याही संपत्तीवर भरावयाच्या संपदा एकवट. शुल्काचा दर निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी,——

(क) कलम ३३–पोटकलम (१)-खंड (ग्), (घ्), (ङ्), (झ्), (ञ्), [2][(ठ्), (ड्), [3][(ड्ड्),] [4][(ढ्), (ण्) आणि (त्)]] यांखाली संपदा शुल्कातून सूट देण्यात आलेल्या संपत्तीहून अन्य अशी याप्रमाणे संक्रामित होणारी सगळी संपत्ती ;

(ख) पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या कोणत्याही राज्यात असलेली याप्रमाणे संक्रामित होणारी कोणतीही शेतजमीन असल्यास ती ; आणि

(ग्) याप्रमाणे संक्रामित होणारी जी संपत्ती मिताक्षरा, मरुमक्कत्तायम्, किंवा अलियसंतान कायदा याद्वारे नियंत्रित होणाऱ्या हिंदू कुटुंबाच्या एकत्र कौटुंबिक संपत्तीतील सहदायकी हितसंबंधाची बनलेली असेल तिच्या बाबतीत मृत व्यक्तीच्या सर्व रेषीय वंशजांचा संयुक्त कौटुंबिक संपत्तीतील हितसंबंधदेखील ;

हे मिळून एक संपदा होईल अशा रीतीने त्यांची एकवट करण्यात येईल आणि त्यांच्या ऐन मूल्याच्या संबंधात लागू असलेल्या दराने किंवा दरांनी त्यावर संपदा शुल्क बसवण्यात येईल.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या अशा कोणत्याही संपदेमध्ये संपदा शुल्कातून सूट मिळालेल्या कोणत्याही संपत्तीचा समावेश असेल तर, याप्रमाणे सूट न मिळालेल्या कोणत्याही संपत्तीवर बसणारे संपदा शुल्क इतक्या रकमेचे असेल की, संपूर्ण संपदेच्या मूल्याशी याप्रमाणे सूट न मिळालेल्या संपत्तीच्या मूल्याचे जे प्रमाण आहे त्याच प्रमाणात जी रक्कम संपदेपैकी एखाद्या भागास याप्रमाणे सूट देण्यात आली असती तर संपूर्ण संपदेवर जेवढी शुल्काची रक्कम प्रदेय झाली असती त्या एकूण रकमेशी प्रमाणशीर असेल.

**स्पष्टीकरण.**——या पोटकलमाच्या प्रयोजनांसाठी, "संपदा शुल्कातून सूट देण्यात आलेली संपत्ती" याचा अर्थ,——

(एक) कलम ३३ खाली संपदा शुल्कातून सूट देण्यात आलेली कोणतीही संपत्ती असा आहे ;

(दोन) पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या कोणत्याही राज्यात असलेली कोणतीही शेतजमीन असा आहे ;

(तीन) मिताक्षरा, मरुमक्कत्तायम् किंवा अलियसंतान कायदा यांद्वारे नियंत्रित होणाऱ्या हिंदू कुटुंबाच्या एकत्रित कौटुंबिक संपत्तीमध्ये असलेले, मृताहून अन्य सर्व सहदायादांचे हितसंबंध असा आहे.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, संक्रामित होणाऱ्या ज्या संपत्तीमध्ये कलम २ चा खंड (१५) याच्या स्पष्टीकरणाच्या आधारे संपत्ती म्हणून समजला जाणारा अधिकार किंवा ऋण किंवा लाभ या रूपात नसलेला असा मृताचा हितसंबंध कधीही नव्हता अशा कोणत्याही संपत्तीची कोणत्याही संपत्तीशी एकवट केली जाणार नाही, पण ती स्वयमेव एक संपदा असेल, आणि तिच्या ऐन मूल्याच्या बाबतीत लागू होणाऱ्या दराने किंवा दरांनी संपदा शुल्क बसवण्यात येईल.

(४) प्रत्येक संपदेमध्ये त्या संपदेत अंतर्भूत असलेल्या संपत्तीवर थेट मृताच्या मृत्यूच्या दिनांकापर्यंत प्रोद्भूत झालेल्या आणि त्या दिनांकास अदत्त असलेल्या सर्व प्राप्तींचा अंतर्भाव असेल.

(५) या कलमाच्या प्रयोजनांसाठी एकाच मृत्यूच्या संदर्भात कोणत्याही संपत्तीची एकापेक्षा अधिक वेळा एकवट करण्यात येणार नाही, तसेच तिच्या बाबतीत एकापेक्षा अधिक वेळा संपदा शुल्क बस-विण्यात येणार नाही. ]

---

१. १९५८ चा अधिनियम ३३–कलम १३ द्वारे कलम ३४ ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९६४ चा अधिनियम ५–कलम ४९ द्वारे "(ठ्) व (ड्)" याऐवजी घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).

३. १९६६ चा अधिनियम १३–कलम ३८ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६५ रोजी व तेव्हापासून).

४. १९६५ चा अधिनियम ४१–कलम ५ द्वारे "(ढ्) व (ण्)" याऐवजी घातले.

शेतजमीन अंतर्भूत असलेल्या संपत्तीवरील संपदा शुल्काचे दर.

३५. [१][(१) संपदा शुल्काचे दर दुसऱ्या अनुसूचीमध्ये उल्लेखिल्याप्रमाणे असतील.]

[२] * * * * * * *

(३) पोटकलम (१) आणि दुसरी अनुसूची यांत काहीही अंतर्भूत असले तरी कोणत्याही व्यक्तीच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या कोणत्याही संपत्तीमध्ये पूर्णतः किंवा अंशतः शेतजमीन अंतर्भूत असेल आणि संपदेचे ऐन मूल्य दोन लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल तर, पुढील रकमा वटाव म्हणून मजरा घालण्यात येतील.—

(क) ज्या संपदेमध्ये पूर्णतः शेतजमीन अंतर्भूत असेल अशा संपदेच्या बाबतीत प्रदेय असलेल्या संपदा शुल्काच्या एक चतुर्थांशाइतकी रक्कम, आणि

(ख) जिच्यामध्ये फक्त अंशतः शेतजमीन अंतर्भूत असेल अशा संपदेच्या बाबतीत, संपदेपैकी शेतजमिनीच्या रूपात असलेल्या भागावर प्रदेय असलेल्या संपदा शुल्काच्या एक चतुर्थांशाइतकी रक्कम —अशा भागावरील शुल्क म्हणजे संपदेच्या मूल्याशी शेतजमिनीच्या मूल्याचे जे प्रमाण आहे तेच प्रमाण संपदा शुल्काच्या एकूण रकमेशी ज्या रकमेचे असेल ती रक्कम होय.

## भाग ५ वा

## आकारणीपात्र मूल्य

ऐन मूल्य अंदाजे कसे ठरवावे.

३६. (१) कोणत्याही संपत्तीचे ऐन मूल्य म्हणजे ती संपत्ती मृताच्या मृत्यूच्या वेळी खुल्या बाजारात विकली असती तर नियंत्रकाच्या मते तिला जी किंमत आली असती तेवढी किंमत असे अंदाजे ठरवण्यात येईल.

(२) या कलमाखाली ऐन मूल्याचा अंदाज ठरवताना नियंत्रक, मृताच्या मृत्यूच्या वेळी असलेल्या बाजार किंमतीनुसार संपत्तीची किंमत निश्चित करील आणि संपूर्ण संपत्ती एकाच वेळी विकावयास काढावयाची आहे असे धरून अंदाज करण्यात आला आहे या कारणास्तव अंदाजे ठरवलेल्या मूल्यात कोणतीही घट करणार नाही :

परंतु, मृताचा मृत्यू झाल्याकारणाने संपत्तीचे मूल्य घटले आहे असे, नियंत्रकाची खात्री होईल अशा रीतीने शाबीत करण्यात आले असेल तर, किंमत निश्चित करताना मूल्यऱ्हास हिशेबात घेण्यात येईल.

अन्यक्रामणावर निर्बंध असेल त्यावेळी खाजगी कंपनीमधील शेअर्सचे मूल्यांकन.

३७. एखाद्या खाजगी कंपनीच्या अधिसंघ नियमावलीमध्ये शेअर्सच्या अन्यक्रामणावर निर्बंध घालणारे उपबंध असतील त्यावेळी शेअर्सचे मूल्य कंपनीच्या एकूण मत्तेच्या मूल्याच्या संदर्भात विनिश्चित करता येण्यासारखे नसेल तर ते मूल्य नियमावलीच्या अधीनतेने, खरेदीदार हा धारक म्हणून नोंदला जाण्यास हक्कदार होईल या अटींवर ते शेअर्स खुल्या बाजारात विकले गेले असते तर जी किंमत आली असती तितके असल्याचे अंदाजे ठरवण्यात येईल, पण एखादा विशिष्ट क्रेता त्याच्या स्वतःच्या विशेष कारणांसाठी खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा अधिक किंमत देऊ शकेल हे तथ्य दुर्लक्षिले जाईल.

अपेक्षी हितसंबंधाचे मूल्यांकन.

३८. संपदेमध्ये अपेक्षी हितसंबंध समाविष्ट असतील तेव्हा त्या हितसंबंधाच्या संबंधातील संपदा शुल्क, शुल्काला उत्तरदायी असणाऱ्या व्यक्तीच्या विकल्पानुसार एकतर उर्वरित संपदेच्या संबंधातील शुल्क भरताना किंवा हितसंबंध कब्जागत होईल त्यावेळी भरण्यात येईल, आणि जर ते शुल्क उर्वरित संपदेच्या बाबतीतील संपदा शुल्काबरोबर भरण्यात आले नाही तर,—

(क) उर्वरित संपदेच्या संबंधातील संपदा शुल्क निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी हितसंबंधाचे मूल्य हे मृताच्या मृत्यूच्या वेळी असलेले त्याचे मूल्य असेल ; आणि

(ख) हितसंबंध कब्जागत होण्याच्या वेळचा त्याच्या संबंधातील संपदा शुल्काचा दर हा, उर्वरित संपदेचे पूर्वी विनिश्चित केलेले मूल्य व तसेच हितसंबंध कब्जागत होण्याच्या वेळी असलेले त्याचे मूल्य यांनुसार परिगणना करून ठरवण्यात येईल.

सहदायकी संपत्तीमधील जो हितसंबंध मृत्यूबरोबर समाप्त होतो त्याचे मूल्यांकन.

३९. (१) हिंदू कायद्याच्या मिताक्षरा प्रणालीद्वारे नियंत्रित होणाऱ्या कोणत्याही कुटुंबाच्या सामाईक संपत्तीमधील जो सहदायकी हितसंबंध त्या कुटुंबातील एखाद्या सदस्याच्या मृत्यूबरोबर समाप्त होतो त्याच्या समाप्तीतून प्रोद्भूत होणाऱ्या किंवा उत्पन्न होणाऱ्या लाभाचे मूल्य हे मृताच्या मृत्यूच्या लगतपूर्वी वाटण्या झाल्या असत्या तर सामाईक संपत्तीपैकी जो हिस्सा मृताच्या वाटचाला आला असता त्याचे ऐन मूल्य असेल.

(२) मरुमक्कत्तायम् वारसा नियमाद्वारे नियंत्रित होणारे तरवड किंवा तवज्जे यांच्या किंवा अलियसंतान वारसा नियमाद्वारे नियंत्रित होणारे कुटुंब किंवा कवरु यांच्या संपत्तीमधील जो हितसंबंध त्यातील एखाद्या सदस्याच्या मृत्यूबरोबर समाप्त होतो त्याच्या समाप्तीतून प्रोद्भूत होणाऱ्या किंवा उत्पन्न होणाऱ्या लाभाचे मूल्य हे मृताच्या मृत्यूच्या लगतपूर्वी वाटण्या झाल्या असत्या तर तरवड किंवा तवज्जे यांच्या किंवा, प्रकरणपरत्वे, कुटुंब किंवा कवरु यांच्या संपत्तीपैकी जो हिस्सा मृताच्या वाटचाला आला असता त्याचे ऐन मूल्य असेल.

---

१. १९५८ चा अधिनियम ३३—कलम १४ द्वारे पोटकलम (१) ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम १४ द्वारे पोटकलम (२) गाळले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

(३) मताच्या मृत्यूच्या लगतपूर्वी वाटण्या झाल्या असत्या तर त्याच्या वाटचाला किती हिस्सा आला असता ते काढण्याकरिता मिताक्षरा, मरुमक्कत्तायम् किंवा अलियसंतान कायद्याद्वारे नियंत्रित होणाऱ्या हिंदू कुटुंबांच्या सामाईक संपत्तीचे ऐन मूल्य अंदाजे ठरवण्याच्या प्रयोजनार्थ या अधिनियमाचे उपबंध संपूर्ण एकत्र कौटुंबिक संपत्ती मृताच्या मालकीची असती तर ते जसे लागू झाले असते तसे, होईल तेथवर लागू होतील.

४०. मृताच्या मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या हितसंबंधाच्या समाप्तीमधून प्रोद्भूत होणाऱ्या किंवा उत्पन्न होणाऱ्या लाभाचे मूल्य हे—— मृत्यूबरोबर समाप्त होणाऱ्या हितसंबंधामधून मिळणाऱ्या लाभांचे मूल्यांकन.

(क) हितसंबंधाची व्याप्ती संपत्तीच्या संपूर्ण प्राप्तीवर असेल तर त्या संपत्तीचे ऐन मूल्य असेल ; आणि

(ख) हितसंबंधाची व्याप्ती संपत्तीच्या संपूर्ण प्राप्तीपेक्षा कमी प्राप्तीवर असेल तर, ज्यावर हितसंबंधाची व्याप्ती असेल इतक्या जास्तीच्या संपत्तीचे ऐन मूल्य असेल.

४१. या अधिनियमाच्या उपबंधांच्या अधीनतेने, नियंत्रक संपदा शुल्काच्या प्रयोजनासाठी विहित केले असेल अशा पद्धतीने व अशा साधनांनी कोणत्याही संपत्तीचे मूल्य विनिश्चित करील आणि त्याने कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी कोणत्याही संपत्तीचे निरीक्षण करून मूल्यासबंधी अभिप्राय देण्यास प्राधिकृत केले तर ती व्यक्ती विहित असेल अशा वाजवी वेळी संपत्तीच्या ठिकाणी प्रवेश करून तिचे निरीक्षण करू शकेल. मूल्यांकन नियंत्रकाने करावयाचे.

४२. नियंत्रक या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीला कोणत्याही संपत्तीच्या मूल्यासंबंधी अभिप्राय देण्यास सांगेल तेव्हा, अशा मूल्यांकनाचा वाजवी खर्च नियंत्रकाकडून भागविण्यात येईल. मूल्यांकनाचा खर्च.

४३. एखाद्या संपदेचा भाग असणाऱ्या कोणत्याही संपत्तीवरील शुल्कास उत्तरदायी असणाऱ्या व्यक्तीने अर्ज केल्यानंतर, तसे सोईस्करपणे करता येईल असे नियंत्रकाला वाटले तर, कोणत्याही वर्गाची किंवा वर्णनाची जी संपत्ती अशा संपदेचा भाग असेल तिच्याबाबतीत त्याने स्वीकारलेल्या मूल्यांकनाची रक्कम तो प्रमाणित करील. नियंत्रकास मूल्यांकन स्वीकारता येईल व सोईस्कर असेल त्यावेळी प्रमाणित करता येईल.

## भाग ६ वा

## वजाती

४४. संपदा शुल्काच्या प्रयोजनार्थ संपदेचे मूल्य ठरवताना, अंत्यसंस्कारांचा खर्च (एक हजार रुपयांपेक्षा अधिक नाही इतका) आणि ऋणे व बोजे यांबाबत मजरा देण्यात येईल पण—— संपदेचे आकारणीपात्र मूल्य ठरवताना अंत्यसंस्कारांचा वाजवी खर्च आणि काही अपवाद करून ऋणे व बोजे यांबाबत मजरा देणे.

(क) मृताने केलेली ऋणे, किंवा मृताने केलेल्या विल्हेवाटीद्वारे निर्माण केलेले बोजे हे, कलम २७ च्या उपबंधांच्या अधीनतेने, पैशाच्या रूपातील किंवा पैशाच्या सममूल्यांकाच्या रूपातील पूर्ण प्रतिफलाच्या बदल्यात सद्भावपूर्वक मृताच्या स्वतःच्या उपयोगासाठी व लाभासाठी केलेले किंवा निर्माण केलेले नसतील आणि त्याच्या हितसंबंधातून निष्पन्न होणारे असतील तर अशी केलेली ऋणे आणि निर्माण केलेले बोजे यांबाबत, किंवा

(ख) ज्या ऋणाच्या बाबतीत, अन्य कोणत्याही संपदेकडून किंवा व्यक्तीकडून प्रतिपूर्ती होण्याचा अधिकार असून अशी प्रतिपूर्ती करून घेणे शक्य नसेल तर अशा कोणत्याही ऋणाच्याबद्दल, किंवा

(ग) संपदेच्या निरनिराळ्या भागांवर प्रभारित असलेले एकच ऋण किंवा बोजा याबाबत एकापेक्षा अधिक वेळा, किंवा

(घ) देज म्हणून मृताने किंवा मृताच्या वतीने केलेल्या ऋणांच्या बाबतीत, अशी ऋणे पाच हजार रुपयांपेक्षा जितकी अधिक असतील तितक्या व्याप्तीपर्यंत,

मजरा देण्यात येणार नाही आणि ज्याबाबत मजरा देण्यात आला आहे असे कोणतेही ऋण किंवा बोजा त्यांचे दायित्व असलेल्या संपत्तीच्या मूल्यातून वजा करण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.——या कलमाच्या प्रयोजनासाठी, "अंत्यसंस्कारांचा खर्च" यामध्ये मृताच्या मृत्यूपासून एक वर्षाच्या कालावधीत मृताचे श्राद्ध किंवा वर्षी विधी यांच्या संबंधात येणाऱ्या सर्व खर्चाचा अंतर्भाव असेल.

४५. मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या किंवा संक्रामित झाल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संपत्तीमधील कोणत्याही अपेक्षी हितसंबंधाच्या खरेदीच्या किंवा संपादनाच्या किंवा विलोपनाच्या——मग ते कायद्याच्या प्रवर्तनामुळे होवो वा अन्यथा होवो——, प्रयोजनासाठी किंवा त्या प्रतिफलाच्या बदल्यात पूर्णतः किंवा अंशतः ऋण केलेले असेल किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल आणि जिचा अपेक्षी हितसंबंध याप्रमाणे खरेदी करण्यात, संपादन करण्यात किंवा विलोपित करण्यात आला अशी कोणतीही व्यक्ती (मृताने केलेल्या विल्हेवाटीखाली किंवा कायद्यानुसार त्याच्याकडून प्रक्रांत झाल्यामुळे किंवा त्याने मृत्युपत्र न केल्यामुळे) त्या वजातयोग्य ऋणांवरील मर्यादा.

संपत्तीमधील कोणत्याही हितसंबंधास हक्कदार होत असेल तर, संपदा शुल्काच्या प्रयोजनासाठी मृताच्या संपदेचे मूल्य ठरवताना अशा ऋणाच्या किंवा बोजाच्या बाबतीत कोणताही मजरा देण्यात येणार नाही, आणि जिच्यावर अशा कोणत्याही ऋणाचा किंवा बोजाचा प्रभार आहे अशी कोणतीही संपत्ती त्या ऋणा-तून किंवा बोजातून मुक्त अशा अवस्थेत संक्रामित झाल्याचे मानण्यात येईल :

परंतु :—

(क) पूर्वोक्त अशा प्रयोजनासाठी किंवा अशा प्रतिफलाच्या बदल्यात असे ऋण किंवा बोजा केवळ अंशतःच केला किंवा निर्माण करण्यात आला असेल तर, हा उपबंध अशा ऋणाच्या किंवा बोजाच्या केवळ त्या अंशासच लागू होईल, आणि

(ख) संपत्तीमधील जिचा अपेक्षी हितसंबंध याप्रमाणे खरेदी करण्यात, संपादन करण्यात किंवा विलोपित करण्यात आला ती व्यक्ती त्या संपत्तीच्या भागातील हितसंबंधासच हक्कदार झाली तर, संपूर्ण संपत्तीच्या मूल्याशी संपत्तीमधील ज्या भागातील हितसंबंधास ती हक्कदार असेल त्या भागाच्या मूल्याचे जे प्रमाण असेल तेच प्रमाण त्या ऋणाच्या किंवा बोजाच्या ज्या अंशाचे संपूर्ण ऋणाशी किंवा बोजाशी असेल त्यालाच केवळ हा उपबंध लागू होईल.

आणखी मर्यादा.

४६. (१) कलम ४४ च्या खंड (क) मध्ये उल्लेखल्याप्रमाणे मृताने केलेल्या ऋणाबाबत किंवा त्यात उल्लेखल्याप्रमाणे मृताने केलेल्या विलेखवाटीद्वारे निर्माण करण्यात आलेल्या बोजाबाबत, हा उपबंध नसता तर, त्या कलमाखाली जो कोणताही मजरा देता आला असता तो त्यामध्ये,—

(क) मृताच्या मार्फतीने प्राप्त झालेली संपत्ती; किंवा

(ख) पूर्वोक्त अशा संपत्तीच्या रूपात नसलेले पण मृताच्या मार्फतीने प्राप्त होणाऱ्या कोणत्या-ही संपत्तीस जी कोणी व्यक्ती हक्कदार होती किंवा जिच्या साधनसंपत्तीत ती संपत्ती केव्हातरी समाविष्ट होती अशा व्यक्तीने दिलेले प्रतिफल,

या रूपातील जे प्रतिफल त्याबाबत दिलेले असेल त्यापैकी कशाच्याही मूल्याशी प्रमाणशीर इतक्या व्याप्तीपर्यंत कपात होण्यास पात्र असेल :

परंतु, दिलेले प्रतिफल संपूर्णपणे किंवा त्याचा एखादा भाग या पोटकलमाच्या खंड (ख) मध्ये उल्लेखलेल्या अशा प्रतिफलाचा बनलेला असेल त्या बाबतीत जर, दिलेल्या प्रतिफलाचे किंवा, प्रकरण-परत्वे, त्यातील त्या भागाचे मूल्य मृताच्या मार्फतीने प्राप्त झालेल्या संपत्तीपैकी जी संपत्ती दिलेल्या प्रतिफलात समाविष्ट असेल अथवा वार्षिकी किंवा अन्य हितसंबंध यांची खरेदी किंवा तरतूद यासंबंधात कलम १६-पोटकलम (१) च्या परंतुकात उल्लेखिली आहेत तशा सारखी प्रतिफल देण्याच्या संबंधातील तथ्ये जिच्याबाबत शाबीत करण्यात येतील अशी जी संपत्ती असेल (कोणतीही असल्यास) तिच्याहून अन्य सगळी संपत्ती उपयोजित करून जे मूल्य उपलब्ध करता आले असते त्याहून अधिक आहे असे नियंत्रकाची खात्री पटेल अशाप्रकारे शाबीत करण्यात आले तर, अशा जादा रकमेच्या बाबतीत कपात केली जाणार नाही.

(२) जे ऋण फेडले गेले नसते किंवा जो बोजा विमुक्त केला गेला नसता तर मृताच्या मृत्यूनंतर त्याबाबतीत पोटकलम (१) परिणासक झाले असते त्याची फेड किंवा विमुक्ती यासाठी किंवा त्यापोटी अथवा ज्याच्या बाबतीत त्याच्या मृत्यूनंतर उक्त पोटकलम परिणामक झाले असते ते ऋण किंवा बोजा कमी करण्यासाठी मृताने दिलेला किंवा उपयोजिलेला पैसा किंवा पैशाचा सममूल्यक मृत्यूच्या [१][ दोन वर्षे ] आधी याप्रमाणे दिलेला किंवा उपयोजिला नसेल तर तो मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीत समाविष्ट असल्याचे मानली जाणारी संपत्ती म्हणून समजली जाईल आणि कलम [२][ २६ ] मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी त्याबाबत तदनुसार संपदा शुल्क प्रदेय असेल.

(३) कलम १६–पोटकलम (२) चे उपबंध ज्याप्रमाणे त्या कलमाच्या प्रयोजनासाठी परिणामक होतात त्याचप्रमाणे ते या कलमाच्या प्रयोजनासाठी परिणामक होतील.

परकीय देशात राहणाऱ्या व्यक्तींना देय असलेली ऋणे, त्या देशामधील दत्तशुल्क संपत्ती खेरीजकरून अन्य बाबतीत प्रथमच वजा करावयाची नाहीत.

४७. [३][ भारताबाहेर ] राहणाऱ्या व्यक्तींना मृताकडून देय असलेल्या ऋणांबाबत ती [४][ भारतात ] फेडण्याच्या कराराने काढली नसतील किंवा [४][ भारतात ] स्थित असलेल्या संपत्तीवर प्रभारित नसतील तर, जिच्यावरील संपदा शुल्क भरण्यात आले असेल अशा मृताच्या [३][ भारताबाहेर ] असलेल्या कोणत्याही संपत्तीचे मूल्य खेरीजकरून अन्य कशातूनही मजरा देण्यात येणार नाही; आणि ज्या व्यक्तीस अशी कोणतीही ऋणे देय आहेत अशी व्यक्ती जेथे राहात असेल त्या परकीय देशात असलेली मृताची संपत्ती ऋणांच्या परतफेडीसाठी अपुरी आहे असे नियंत्रकाची खात्री होईल अशा रीतीने दाखवून देण्यात येईल तेवढी व्याप्ती खेरीजकरून एरव्ही, अशा ऋणाच्या बाबतीत संपदा शुल्क परत केले जाणार नाही.

---

१. १९६६ चा अधिनियम १३–कलम ३८ द्वारे 'एक वर्ष' या उल्लेखाऐवजी वरील उल्लेख घातला.

२. १९५८ चा अधिनियम ३३–कलम १५ द्वारे "२५" ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता–कलम १६ द्वारे "या अधिनियमाचा विस्तार असलेल्या राज्यक्षेत्रांबाहेर" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. कित्ता–कलम १६ द्वारे 'उक्त राज्यक्षेत्रे' या उल्लेखाऐवजी भारताचे उल्लेख घातले.

४८. संपत्ती, [1][ भारताबाहेर ] असल्यामुळे संपत्ती प्रशासित करताना किंवा ती स्वाधीन करून घेताना कोणताही अतिरिक्त खर्च आलेला आहे याबाबत नियंत्रकाची खात्री झाल्यास तो संपत्तीच्या मूल्यावर काही झाले तरी पाच टक्क्यांपेक्षा अधिक नाही इतक्या मर्यादेपर्यंत अशा खर्चादाखल संपत्तीच्या मूल्यामधून मजरा देऊ शकेल. परदेशातील संपत्ती स्वाधीन करून घेण्याच्या किंवा तिचे प्रशासन करण्याच्या खर्चाबाबत विवक्षित मर्यादांमध्ये मजरा देता येईल.

४९. जर मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणारी कोणतीही संपत्ती प्रतियोगी नसलेल्या देशात असून, अशा मृत्यूमुळे त्या संपत्तीच्या बाबतीत त्या देशात एखादे शुल्क प्रदेय आहे अशी नियंत्रकाची खात्री झाली तर तो, यासंबंधात मंडळाकडून करण्यात येतील अशा नियमांच्या अधीनतेने संपत्तीच्या मूल्यामधून त्या शुल्काची संपूर्ण रक्कम किंवा तिचा अंश मजरा घालू शकेल. प्रतियोगी नसलेल्या देशात भरलेल्या शुल्काबाबत मजरा.

स्पष्टीकरण.—या कलमात, " प्रतियोगी नसलेला देश " या शब्दप्रयोगाचा अर्थ, या अधिनियमाच्या प्रयोजनांपुरता प्रतियोगी देश म्हणून घोषित करण्यात न आलेला भारताहून अन्य कोणताही देश असा आहे.

५०. जिच्याबाबतीत या अधिनियमाखाली संपदा शुल्क बसवण्याजोगे आहे अशा कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत संप्रमाण, प्रशासनपत्र किंवा उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळवण्यासाठी, [5]* * * कोणत्याही राज्यात अंमलात असलेल्या कोणत्याही न्यायालय फी विषयक कायद्याखाली कोणतीही फी भरण्यात आली असेल तर, प्रदेय संपदा शुल्काची रक्कम याप्रमाणे भरण्यात आलेल्या न्यायालय फीच्या [2][ [4]* * * इतक्या रकमेने ] कमी करण्यात येईल. मृताच्या संपदेचे प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी न्यायालय फी भरण्यात आली असेल तर संपदा शुल्कात सवलत.

[3][ ५० क. कोणत्याही संपत्तीच्या दानाच्या बाबतीत, 'दान कर अधिनियम, १९५८' (१९५८ चा १८) याखाली कर भरण्यात आलेला असून ती संपत्ती या अधिनियमाखाली संक्रामित होणारी संपत्ती म्हणून दात्याच्या संपदेत समाविष्टही असेल तर, या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली प्रदेय असलेले संपदा शुल्क हे त्या अधिनियमाखाली अशा कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत भरलेल्या दान-कराइतक्या रकमेने कमी करण्यात येईल.] [3][दान-कर भरण्यात आलेला असेल तर संपदा शुल्कात सवलत.]

[6][ ५० ख. या अधिनियमाखाली संपदा शुल्क बसवण्याजोगी अशी कोणतीही संपत्ती मृताच्या मृत्यूनंतरच्या दोन वर्षांच्या कालावधीच्या आत हस्तांतरित करण्यात आली असेल आणि अशा हस्तांतरणामुळे उद्भवणाऱ्या भांडवली लाभांच्या बाबतीत 'प्राप्तिकर अधिनियम, १९६१' (१९६१ चा ४३) याखाली कर भरण्यात आला असेल तर, प्रदेय असलेले संपदा शुल्क, अशा हस्तांतरणाच्या ठोक आवकेशी हस्तांतरणाच्या आवकेमधून संपदा शुल्कापोटी भरण्यात आलेल्या रकमेचे जे प्रमाण असेल तेच प्रमाण याप्रमाणे भरण्यात आलेल्या कराच्या एकूण रकमेशी ज्या रकमेचे असेल तितक्या रकमेने कमी करण्यात येईल : [6][भांडवली लाभांवर कर भरण्यात आलेला असेल तर संपदा शुल्कात सवलत.]

परंतु, उत्तरदायी व्यक्तीच्या अर्जावरून मंडळ, पूर्वोक्त दोन वर्षांच्या कालावधीमध्ये संपत्तीचे हस्तांतरण न करण्यास उत्तरदायी व्यक्तीला पुरेसे कारण होते अशी स्वतःची खात्री झाली तर तो कालावधी वाढवून देऊ शकेल. ]

## प्रकरण ७ वे

## शुल्काची उगराणी

५१. मंडळ विहित करील अशा साधनांनी व अशा रीतीने संपदा शुल्काची उगराणी करता येईल. शुल्काच्या उगराणीची पद्धत.

[7][५२. (१) संपदा शुल्कास उत्तरदायी असणाऱ्या व्यक्तीच्या अर्जावरून केंद्र शासनाला मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणारी कोणतीही संपत्ती अशा संपूर्ण शुल्काची किंवा त्याच्या अंशाची पूर्ती म्हणून केंद्र शासन व ती व्यक्ती यांच्यामध्ये संमत होईल अशा किंमतीला स्वीकारता येईल, आणि तदनंतर अशी व्यक्ती त्या संपत्तीचा कब्जा ते शासन याबाबत विनिर्दिष्ट करील अशा प्राधिकरणाकडे सुपूर्द करील. संपत्तीच्या हस्तांतरणाद्वारा शुल्काचा भरणा.

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम १७ द्वारे "या अधिनियमाचा विस्तार असलेल्या राज्यक्षेत्राबाहेर" याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—१९५८ चा अधिनियम ३३-कलम १८ द्वारे " इतक्या रकमेने " याऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता—१९५८ चा अधिनियम ३३-कलम १९ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

४. १९६४ चा अधिनियम ५-कलम ४९ द्वारे " निम्म्या " हा शब्द गाळला (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).

५. १९५४ चा अधिनियम ४१-कलम २(२) व अनुसूची यांद्वारे " जम्मू व काश्मीर राज्याहून अन्य " हे शब्द गाळले.

६. १९६४ चा अधिनियम ३१-कलम १९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).

७. कित्ता—कलम १९ द्वारे कलम ५२ ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).

(२) त्या त्या काळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोटकलम (१) खाली प्राधिकरणाकडे संपत्तीचा कब्जा सुपूर्द करण्यात येईल त्या दिनांकास---

(एक) संपत्ती केंद्र शासनाकडे निहित होईल, आणि

(दोन) केंद्र शासन आवश्यक तर नोंदणी प्राधिकरणास त्याप्रमाणे कळवील;

आणि ते प्राधिकरण केंद्र शासन निदेशित करील तशा रीतीने संपत्ती प्रशासित करील.

(३) पोटकलम (१) मध्ये उल्लेखिलेली किंमत मृताच्या संपदेच्या बाबतीत या अधिनियमाखाली देय असलेल्या एकूण रकमेहून अधिक होत असेल तेथे, पुढील क्रमानुसार अशी जादा रक्कम तो कोणताही कर, दंड, व्याज किंवा अन्य रक्कम---

(एक) 'केंद्रीय महसूल मंडळ, अधिनियम, १९६३' (१९६३ चा ५४)-कलम २-खंड (ग) मध्ये उल्लेखिलेल्यांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली मृताची जी प्राप्ती, खर्च किंवा धनदौलत किंवा त्याने केलेले दान याच्या बाबतीत भरण्यास मृताचा वैध प्रतिनिधी दायी आहे;

(दोन) संपदेच्या प्रशासनाच्या कालावधीपुरते मृताच्या संपदेच्या बाबतीत पूर्वोक्तांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली भरण्यास मृत्युपत्रव्यवस्थापक दायी आहे ;

(तीन) पूर्वोक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली भरण्यास प्रस्तुत संपत्तीला हितार्थ हक्कदार असलेली व्यक्ती दायी आहे,

त्या रकमेचा भरणा करण्यासाठी उपयोजित करण्यात येईल आणि काही शिल्लक असल्यास ती उत्तरदायी व्यक्तीस देण्यात येईल. ]

**उत्तरदायी व्यक्ती आणि त्यांची कर्तव्ये व दायित्वे.**

५३. (१) मृताच्या मृत्यूबरोबर कोणतीही संपत्ती संक्रामित होईल त्याबाबतीत---

(क) अशी संपत्ती ज्यांच्याकडे कोणत्याही कब्जागत हितप्रद हितसंबंधासाठी याप्रमाणे संक्रामित होते किंवा याप्रमाणे संक्रामित होणाऱ्या संपत्तीमधील कोणताही हितसंबंध कोणत्याही वेळी ज्याच्या ठायी निहित असेल असा प्रत्येक वैध प्रतिनिधी,

(ख) याप्रमाणे संक्रामित होणाऱ्या संपत्तीमधील कोणताही हितसंबंध किंवा तिचे व्यवस्थापन कोणत्याही वेळी ज्याच्या ठायी निहित असेल असा प्रत्येक विश्वस्त, पालक, सुपूर्ददार किंवा अन्य व्यक्ती, आणि

(ग) याप्रमाणे संक्रामित होणाऱ्या संपत्तीमधील कोणताही हितसंबंध अन्यक्रामणाद्वारे किंवा अन्य पोटहक्काने जिच्या ठायी कब्जानिहित झाला असेल अशी प्रत्येक व्यक्ती,

मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या संपत्तीवरील संपूर्ण संपदा शुल्कास उत्तरदायी असेल, पण प्रत्यक्षात स्वत:च्या हाती आलेल्या अथवा स्वत:कडून हयगय किंवा कसूर झाली नसती तर, आपल्या हाती आली असती अशा मत्तेच्या मर्यादेच्या पलिकडे कोणत्याही जादा शुल्काबद्दल दायी असणार नाही :

परंतु, या कलमामधील कोणत्याही गोष्टीमुळे, संपत्तीच्या व्यवस्थापनाच्या ओघात जी व्यक्ती अन्य व्यक्तीसाठी केवळ अभिकर्ता किंवा कारभारी म्हणून कार्य करते ती व्यक्ती शुल्कास उत्तरदायी होणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जर मृताची एखादी मत्ता अन्य एखाद्या व्यक्तीच्या कब्जात असून तो विरुद्ध कब्जा आहे असे कायदेशीर वारसदाराने न्यायालयाचे समाधान होईल अशा प्रकारे शाबीत केले तर, अशा मत्तेबाबत प्रदेय असलेल्या शुल्कांशाबद्दल कायदेशीर वारसदार उत्तरदायी असणार नाही :

परंतु, मागाहून त्याला मत्तेचा कब्जा परत मिळेल तर व तेवढ्या व्याप्तीपर्यंत तो याप्रमाणे उत्तरदायी होईल.

[1][(३) या कलमाखाली संपदा शुल्कास उत्तरदायी असणारी प्रत्येक व्यक्ती, मृताच्या मृत्यूपासून सहा महिन्यांच्या आत, ज्यांच्या बाबतीत संपदा शुल्क प्रदेय आहे अशा सर्व संपत्तींचा विहित नमुन्यातील व विहित रीतीने सत्यापित केलेला हिशेब नियंत्रकाकडे सुपूर्द करील :

परंतु, नियंत्रक विहित असतील अशा शर्तींवर---व्याज भरण्याची शर्त धरून---पूर्वोक्त सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देऊ शकेल.]

(४) जी संपत्ती आपणांस परिमाण किंवा मूल्य माहीत नसल्यामुळे आपण आपल्या हिशेबात धरलेली नाही अशी कोणतीही संपत्ती उत्तरदायी व्यक्तीला माहीत असेल तर, अशी संपत्ती अस्तित्वात आहे, पण आपणांस तिचे परिमाण किंवा मूल्य माहीत नाही आणि ते परिमाण व मूल्य विनिश्चित केले जाताच आपण त्याचा पूरक हिशेब सादर करण्याचे व अशा संपत्तीबाबत ज्या शुल्कास आपण दायी होऊ ते आणि त्यामुळे मूळ हिशेबात उल्लेखिलेल्या संपत्तीबाबत प्रदेय असे आणखी कोणतेही शुल्क ही दोन्ही भरण्याचे आपण अभिवचन देत आहोत, असे तिला निवेदन करता येईल.

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २० द्वारे पोटकलम (३) ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

(५) मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या कोणत्याही संपत्तीबाबतच्या संपदा शुल्कास दोन किंवा अधिक व्यक्ती उत्तरदायी असतील तर,——मग त्या एकाच भूमिकेतून असोत वा वेगवेगळ्या भूमिकेतून असोत——त्या व्यक्ती याप्रमाणे संक्रामित होणाऱ्या संपत्तीवरील संपूर्ण संपदा शुल्कास संयुक्तपणे व अलगपणे दायी असतील.

५४. (१) कलम ११ च्या अर्थानुसार मृत्यूबरोबर समाप्त होणारा असा मर्यादित हितसंबंध कब्जागत हितसंबंध झाल्यानंतर त्याची संपूर्णतः किंवा अंशतः विल्हेवाट करण्यात आली किंवा तो समाप्त झाला तर——ज्या संपत्तीमध्ये हितसंबंध विद्यमान असेल तिचे स्वरूप काहीही असो——मृत्यू झाल्यावर प्रदेय होणाऱ्या कोणत्याही संपदा शुल्काबद्दल त्या कलमाच्या आधारे पुढील व्यक्ती (या कलमाव्यतिरिक्त एरव्ही त्याबद्दल उत्तरदायी असलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या शिवाय आणखी) उत्तरदायी होतील, त्या अशा—— विवक्षित प्रकरणांत, उत्तरदायी व्यक्तींमध्ये विश्वस्त समाविष्ट असू शकतील.

(क) ज्या संव्यवस्थेनुसार हितसंबंध विद्यमान होता ती संव्यवस्था मृत्यूच्यावेळी अस्तित्वात असेल तर त्या संव्यवस्थेखालील त्या त्या काळाचे विश्वस्त ; आणि

(ख) ती तशी नसेल तर त्या संव्यवस्थेखाली लगतपूर्वी विश्वस्त असलेल्या व्यक्ती.

(२) जेथे——

(क) संव्यवस्थेखालील विश्वस्त कलम ११ च्या आधारे कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत प्रदेय असलेल्या संपदा शुल्कास उत्तरदायी होऊ शकत असतील, आणि

(ख) ती संपत्ती किंवा तिचा कोणताही भाग संव्यवस्थेत समाविष्ट असण्याचे थांबावे असे उद्देशित असेल,

तेथे जर विश्वस्तांनी नियंत्रकाच्या मते जी रक्कम संभावी शुल्क रक्कम म्हणून समजणे योग्य होईल अशा रकमेबाबतचे प्रमाणपत्र नियंत्रकाकडून मिळवले, आणि प्रमाणपत्रासाठी करावयाच्या अर्जाच्या संबंधात नियंत्रकाने मागितलेली सर्व माहिती व पुरावा दिला तर, प्रमाणपत्र ज्याच्याशी संबंधित आहे त्या शुल्काबद्दल प्रमाणित रकमेपेक्षा अधिक रकमेस कोणतीही व्यक्ती संव्यवस्थेखालील विश्वस्त म्हणून दायी असणार नाही.

(३) याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, जी संपत्ती संव्यवस्थेमध्ये समाविष्ट आहे किंवा होती त्या संपत्तीवर कलम ११ च्या आधारे प्रदेय असलेल्या संपदा शुल्कास संव्यवस्थेखालील विश्वस्त म्हणून जी व्यक्ती उत्तरदायी होऊ शकेल त्या व्यक्तीचा स्वतःच्या हाती असलेली जी संपत्ती याप्रमाणे समाविष्ट असेल अशा कोणत्याही संपत्तीवर संभावी शुल्क रक्कम व त्याच्या बाबतीतील परिव्यय यांबद्दल धारणाधिकार असेल.

**स्पष्टीकरण.**——कोणत्याही शुल्काच्या संभावी रकमेचा या कलमामधील उल्लेख हा ती रक्कम आकारणीयोग्य होईल असे गृहीत धरून, त्या शुल्काच्या संभावी रकमेचा निर्देशक म्हणून समजण्यात येईल.

५५. संपदा शुल्काला उत्तरदायी असलेली प्रत्येक व्यक्ती, नियंत्रकाच्या मते जिच्याकडे कलम १७ मध्ये उल्लेखिल्याप्रमाणे मृताने संपत्तीचे हस्तांतरण केले असेल अशी प्रत्येक कंपनी, जी व्यक्ती अशा कंपनीचा अधिकारी किंवा लेखापरीक्षक आहे किंवा होती अशी कोणतीही व्यक्ती, आणि मृताचा मृत्यू झाल्यावर जिच्याबाबत शुल्क वसूल करावयाचे असते त्या संपदेच्या अथवा अशा संपदेपैकी कोणत्याही भागाच्या उत्पन्नाच्या कोणत्याही भागाचा जिने कब्जा घेतला किंवा जिने तो प्रशासित केला असल्याचे नियंत्रक समजतो अशी प्रत्येक व्यक्ती ही, जी कोणतीही संपत्ती मृताच्या मृत्यूनंतर जिच्याबाबत संपदा शुल्क वसूल करावयाचे असते अशा संपदेचा भाग आहे असे समजण्यास नियंत्रकाला कारण असेल तिच्यासंबंधी नियंत्रकाने तपशील मागवल्यास तशा तपशिलाचे स्वतःच्या उत्तम माहितीनुसार व समजुतीनुसार विवरणपत्र व सोबत नियंत्रक मागवील तसे हिशेब, दस्तऐवज, पुरावा किंवा माहिती सुपूर्द करून सत्यापित करील. जिच्याकडे कब्जा असल्याचे समजले जाते अशा प्रत्येक व्यक्तीने, नियंत्रकाकडून मागणी होईल त्याप्रमाणे संपत्तीच्या तपशिलाचे विवरणपत्र द्यावयाचे.

[1][५६. (१) ज्या बाबतीत प्रतिनिधित्व प्रदान होण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल अशा सर्व बाबतीत—— नियंत्रकास तपशील पुरवण्यात आल्याशिवाय प्रतिनिधित्व, इत्यादी प्रदान करावयाचे नाही.

(क) मृताचा मृत्युपत्रव्यवस्थापक, त्याच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे, 'न्यायालय फी अधिनियम, १८७०' (१८७० चा ७)-कलम १९झ खाली न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या मूल्यांकनाबाबत प्रतिज्ञालेखास जोडण्यात आलेल्या समुचित हिशेबात जिच्याबाबत मृताच्या मृत्यूनंतर संपदा शुल्क प्रदेय असेल अशी सर्व संपत्ती विनिर्दिष्ट करील आणि हिशेबासहित त्या प्रतिज्ञालेखाची एक प्रत नियंत्रकाकडे सुपूर्द करील, आणि

(ख) अर्जदाराने खंड (क) मध्ये विहित असलेला हिशेब दिलेला असून, हिशेबात समाविष्ट असलेल्या संपत्तीच्या बाबतीत प्रदेय असलेले संपदा शुल्क भरण्यात आले आहे किंवा, प्रकरणपरत्वे, भरण्यात येईल किंवा कोणतेही संपदा शुल्क देय नाही अशा अर्थाचे कलम ५७-पोटकलम (२) किंवा कलम ६७ खाली नियंत्रकाकडून मिळालेले प्रमाणपत्र हजर केले आहे असे होईपर्यंत त्याच्या अर्जावरून अर्जदारास प्रतिनिधित्व प्रदान होण्यास हक्कदार करणारा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २१ द्वारे कलमे ५६ ते ६५ यांऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

(२) उत्तराधिकार–प्रमाणपत्र प्रदान होण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल अशा सर्व बाबतीत, अर्जदाराकडून अर्जाची एक प्रत नियंत्रकाला सादर करण्यात येईल आणि अर्जात उल्लेखिलेल्या संपत्तीच्या बाबतीत प्रदेय असलेले संपदा शुल्क भरण्यात आले आहे किंवा, प्रकरणपरत्वे, भरण्यात येईल किंवा कोणतेही संपदा शुल्क देय नाही अशा अर्थाचे कलम ५७-पोटकलम (२) किंवा कलम ६७ खाली नियंत्रकाकडून मिळालेले प्रमाणपत्र अर्जदार हजर करीपर्यंत त्याच्या अर्जावर त्याला अशा प्रमाणपत्रास हक्कदार करणारा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

पक्के निर्धारण करण्यापूर्वी तात्पुरते निर्धारण करण्याची शक्ती.

५७. (१) संपदा शुल्क मृताच्या मृत्यूच्या दिनांकापासून देय असेल, आणि कलम ५३ किंवा कलम ५६ खाली सुपूर्द करण्यात आलेला हिशेब मिळाल्यानंतर केव्हाही नियंत्रकास हिशेब सुपूर्द करणाऱ्या व्यक्तीकडून प्रदेय असलेल्या संपदा शुल्काचे याप्रमाणे सुपूर्द करण्यात आलेल्या हिशेबाच्या आधारे संक्षिप्त रीतीने तात्पुरते निर्धारण करण्याच्या कामाला लागता येईल.

(२) पोटकलम (१) खाली तात्पुरते निर्धारण करण्यात आल्यावर, जिच्याबाबत याप्रमाणे निर्धारण करण्यात आले ती व्यक्ती, तात्पुरत्या निर्धारणानुसार कोणतेही संपदा शुल्क प्रदेय असल्यास त्याचा नियंत्रकाकडे भरणा करील किंवा त्याच्या भरण्याबाबत नियंत्रकाला समाधानकारक वाटेल अशी प्रतिभूती देईल, आणि त्यानंतर नियंत्रक त्या व्यक्तीला प्रमाणपत्रात उल्लेखिलेल्या संपत्तीच्या बाबतीत असे शुल्क भरण्यात आले आहे किंवा भरण्यात येईल किंवा, प्रकरणपरत्वे, कोणतेही संपदा शुल्क प्रदेय नाही असे प्रमाणपत्र देईल.

(३) कलम ५८ खाली पक्के निर्धारण करण्यात आल्यानंतर पोटकलम (१) खाली करण्यात आलेल्या तात्पुरत्या निर्धारणापोटी भरण्यात आलेली कोणतीही रक्कम पक्क्या निर्धारणापोटी भरण्यात आल्याचे मानण्यात येईल.

(४) पोटकलम (१) खाली करण्यात आलेल्या तात्पुरत्या निर्धारणाविरुद्ध कोणतेही अपील होऊ शकणार नाही, पण अशा कोणत्याही तात्पुरत्या निर्धारणाच्या कारणास्तव किंवा परिणामी केलेल्या किंवा राहिलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे कलम ५८ खालील पक्क्या निर्धारणाच्या ओघात उद्‌भवेल अशा कोणत्याही वादग्रस्त बाबीच्या गुणदोषानुसार झालेल्या निर्णयास बाध येणार नाही.

निर्धारण.

५८. (१) कलम ५३ किंवा कलम ५८ खाली सुपूर्द करण्यात आलेला हिशेब बरोबर व पूर्ण आहे याबाबत, उत्तरदायी व्यक्तीची उपस्थिती आवश्यक न करता नियंत्रकाची खात्री पटली तर, तो मृताच्या संपदेचे ऐन मूल्य निर्धारित करील आणि संपदा शुल्क म्हणून प्रदेय असलेली रक्कम निश्चित करील.

(२) नियंत्रकाची तशी खात्री न झाल्यास, तो उत्तरदायी व्यक्तीवर नोटीस बजावून तिला नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकास आपल्या कार्यालयात जातीने उपस्थित होण्यास किंवा उत्तरदायी व्यक्ती आपल्या हिशेबाच्या पुष्ट्यर्थ ज्यावर विसंबून राहू शकेल असा कोणताही पुरावा त्या दिनांकास हजर करण्यास किंवा करविण्यास फर्मावील.

(३) उत्तरदायी व्यक्ती हजर करील असा पुरावा व कोणत्याही विनिर्दिष्ट मुद्यांवर आपणास आवश्यक वाटेल असा अन्य पुरावा ऐकून घेतल्यानंतर, नियंत्रक लेखी आदेशाद्वारे मृताच्या संपदेचे ऐन मूल्य निर्धारित करील व संपदा शुल्क म्हणून प्रदेय असलेली रक्कम निश्चित करील.

(४) कलम ५३ किंवा कलम ५६ खाली आवश्यक असल्याप्रमाणे कोणताही हिशेब सुपूर्द करण्यात आला नसेल किंवा उत्तरदायी व्यक्तीने पोटकलम (२) खाली बजावण्यात आलेल्या नोटिशीच्या अटींचे अनुपालन करण्यात कसूर केली असेल तर, नियंत्रक आपल्या उत्तम निर्णयशक्तीनुसार निर्धारण करील आणि संपदा शुल्क म्हणून प्रदेय असलेली रक्कम निश्चित करील.

निर्धारणातून निसटलेली संपत्ती.

५९. नियंत्रकास,—

(क्) उत्तरदायी असलेल्या व्यक्तीकडून कलम ५३ खाली किंवा कलम ५६ खाली मृताच्या संपदेचा हिशेब सादर न केल्यामुळे किंवा निर्धारणासाठी आवश्यक असलेली सर्व महत्त्वाची तथ्ये पूर्णपणे व खरेपणाने प्रकट न केल्यामुळे किंवा त्या कामी कसूर झाल्यामुळे, संपदा शुल्क आकारण्यास पात्र असलेली कोणतीही संपत्ती, हिशेबात अंतर्भूत करण्यात आलेल्या संपत्तीचे न्यून-मूल्यांकन होऊन अथवा त्यात अंतर्भूत करावयास हवी होती अशी कोणतीही संपत्ती त्यात अंतर्भूत करण्याचे राहून जाऊन अथवा त्यात अत्यंत कमी दराने किंवा अन्यथा निर्धारण होऊन निर्धारणातून निसटली आहे असे समजण्यास कारण असेल तर, किंवा

(ख) खंड (क्) मध्ये निर्देशिल्याप्रमाणे अशी अकृती किंवा कसूर झालेली नसूनही, संपदा शुल्क आकारण्यास पात्र असलेली कोणतीही संपत्ती निर्धारणातून निसटली आहे—मग ते हिशेबात अंतर्भूत करण्यात आलेल्या संपत्तीच्या न्यूनमूल्यांकनामुळे झालेले असो किंवा जी अंतर्भूत करावयास हवी होती अशी कोणतीही संपत्ती त्यात अंतर्भूत करण्याचे राहून गेल्यामुळे असो किंवा अत्यंत कमी दराने किंवा अन्यथा निर्धारण केल्यामुळे झालेले असो—असे समजण्यास आपल्याजवळील माहितीमुळे कारण मिळाले असेल तर,

तो कोणत्याही वेळी, कलम ७३क च्या उपबंधाच्या अधीनतेने कलम ५३ खाली आवश्यक असल्या-प्रमाणे उत्तरदायी व्यक्तीला हिशेब सादर करण्यास फर्मावू शकेल आणि कलम ५८ चे उपबंध जणू काही अशा संपत्तीला लागू असावेत त्याप्रमाणे तिचे निर्धारण किंवा कर-निर्धारण करण्याची कार्यवाही करू शकेल.

६०. (१) (क्) एखाद्या व्यक्तीने कलम ५३ किंवा कलम ५६ खाली मृताच्या संपत्तीचा हिशेब सुपूर्द करण्याच्या किंवा नियंत्रकाच्या कलम ५५ किंवा कलम ५९ खालील कोणत्याही आज्ञेचे अनुपालन करण्याच्या कामी वाजवी कारणाशिवाय कसूर केली आहे अथवा पूर्वोक्तांपैकी कोणत्याही कलमाखाली आवश्यक असलेल्यांपैकी कोणताही हिशेब किंवा विवरणपत्र दिलेल्या कालावधीत आणि आवश्यक केलेल्या पद्धतीने सुपूर्द करण्याच्या किंवा सादर करण्याच्या कामी वाजवी कारणाशिवाय कसूर केली आहे; किंवा कसूर किंवा लपवणूक याबद्दल दंड.

(ख्) तिने कलम ५८ च्या पोटकलम (२) खालील नोटिशीचे अनुपालन करण्याच्या कामी वाजवी कारणाशिवाय कसूर केली आहे; किंवा

(ग्) तिने मृताच्या संपत्तीचा तपशील लपविला आहे किंवा बुद्धिपुरस्सर तिच्यासंबंधी चुकीचा तपशील पुरवला आहे; किंवा

(घ्) ती व्यक्ती कलम २०क मध्ये निर्देशिल्याप्रमाणे कंपनी असून, तिने त्या कलमाखाली कंपनीकडून देय असलेली संपदा शुल्काची रक्कम याबाबतीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीत भरण्याच्या कामी वाजवी कारणाशिवाय कसूर केली आहे,

अशी नियंत्रकाची, अपील नियंत्रकाची किंवा अपील अधिकरणाची खात्री झाली तर तो किंवा ते लेखी आदेशाद्वारे असे निदेशित करू शकेल की, अशा व्यक्तीने पुढीलप्रमाणे भरणा करावा :—

(एक) खंड (क्) किंवा खंड (घ्) मध्ये निर्देशलेल्या बाबतीत, तिच्याकडून प्रदेय असलेल्या संपदा शुल्कांच्या रकमेशिवाय आणखी, अशा शुल्काच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नाही अशी रक्कम; आणि

(दोन) खंड (ख्) किंवा खंड (ग्) मध्ये निर्देशिलेल्या बाबतीत, तिच्याकडून प्रदेय असलेल्या संपदा शुल्काच्या रकमेशिवाय आणखी, अशा व्यक्तीच्या हिशेबात ऐन मूल्य म्हणून दर्शवलेले मूल्य यथातथ्य म्हणून स्वीकारण्यात आले असते तर जे चुकवले गेले असते असे कोणतेही संपदा शुल्क असल्यास त्याच्या रकमेच्या दुपटीपेक्षा अधिक नाही अशी रक्कम.

(२) संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय पोटकलम (१) खाली कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

६१. आपण काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या आत कोणत्याही वेळी नियंत्रक, अपील नियंत्रक किंवा अपील अधिकरण स्वत: होऊन अभिलेखावरून उघड दिसून येणारी कोणतीही चूक दुरुस्त करू शकेल आणि उत्तरदायी व्यक्तीने, प्रकरणपरत्वे, नियंत्रक, अपील नियंत्रक, अपील अधिकरण याच्या निदर्शनास आणून दिलेली अशी कोणतीही चूक तो किंवा ते तेवढयाच कालावधीत दुरुस्त करील : चुकांची दुरुस्ती.

परंतु, ज्या दुरुस्तीमुळे परिणामी प्रदेय संपदा शुल्क वाढते अशी कोणतीही दुरुस्ती उत्तरदायी व्यक्तीला त्या बाबतीत तिची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिली गेल्याशिवाय केली जाणार नाही.

६२. (१) (क्) (एक) नियंत्रकाने केलेल्या कोणत्याही मूल्यांकनावर, किंवा नियंत्रकाच्या आदेशांविरुद्ध अपील.

(दोन) कलम ५८ किंवा कलम ५९ खाली प्रदेय असलेले संपदा शुल्क निश्चित करण्याबाबत नियंत्रकाने दिलेल्या कोणत्याही आदेशावर, किंवा

(तीन) कलम ६०, कलम ७२ किंवा कलम ८४ अनुसार, नियंत्रकाने बसवलेल्या कोणत्याही दंडावर, किंवा

(चार) संपदा शुल्काच्या प्रयोजनासाठी कलम ७३ च्या पोटकलम (५) खाली लागू केले तसे 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा १०) कलम ४६ चे पोटकलम (१) याखाली नियंत्रकाने बसवलेल्या कोणत्याही दंडावर आक्षेप घेणाऱ्या, किंवा

(ख्) कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत प्रदेय असलेल्या संपदा शुल्काच्या रकमेबाबतचे आपले दायित्व नाकारणाऱ्या;

कोणत्याही व्यक्तीस, कलम ७३ खाली मागणी-नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, विहित नमुन्यात अपील नियंत्रकाकडे अपील करता येईल व त्याचे विहित पद्धतीने सत्यापन करण्यात येईल :

परंतु, अपील दाखल करण्यापूर्वी शुल्क भरण्यात आले नाही तर, खंड (क्) च्या उप-खंड (चार) खाली कोणतेही अपील होऊ शकणार नाही.

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या तीस दिवसांच्या कालावधीत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते अशी अपील नियंत्रकाची खात्री झाल्यास त्याला तो कालावधी संपल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.

(३) अपील नियंत्रक अपिलाच्या सुनावणीसाठी दिवस व स्थळ निश्चित करील आणि वेळोवेळी सुनावणी तहकूब करू शकेल.

(४) अपील नियंत्रक,—

(क्) अपिलाच्या सुनावणीच्या वेळी, अपीलकर्त्यास अपिलाच्या कारणांमध्ये विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या कोणत्याही अपील-कारणाबाबत बोलण्यास मुभा देऊ शकेल.

(ख्) अपिलाचा निकाल करण्यापूर्वी स्वतःला योग्य वाटेल अशी आणखी चौकशी करू शकेल किंवा नियंत्रकाकरवी आणखी चौकशी करू शकेल.

(५) अपिलाचा निकाल करताना, अपील नियंत्रक स्वतःला योग्य वाटेल असा आदेश काढू शकेल व त्यामध्ये संपदा शुल्क किंवा दंड वाढवणारा आदेश समाविष्ट असू शकेल :

परंतु, प्रदेय असलेले संपदा शुल्क किंवा दंड वाढवणारा कोणताही आदेश, त्यामुळे बाधित झालेल्या व्यक्तीस अशा वाढीविरुद्ध कारण दर्शवण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय काढला जाणार नाही.

(६) अपील नियंत्रक अपिलाचे काम संपताच आपण काढलेला आदेश अपीलकर्त्यास व नियंत्रकास कळवील.

अपील नियंत्रकाच्या आदेशावर अपील अधिकरणाकडे अपील.

६३. (१) अपील नियंत्रकाने कलम ६२ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशावर आक्षेप घेणाऱ्या कोणत्याही उत्तरदायी व्यक्तीला, अशा आदेशाची नोटीस तिच्यावर बजाविण्यात आली असेल त्या दिनांका-पासून साठ दिवसांच्या आत अपील अधिकरणाकडे अपील करता येईल.

(२) कलम ६२ खाली अपील नियंत्रकाने काढलेला कोणताही आदेश बरोबर असल्याबाबत नियंत्रकाची खात्री पटली नाही तर, त्याला अशा आदेशाविरुद्ध अपील अधिकरणाकडे अपील करता येईल आणि नियंत्रकाला आदेश कळवण्यात आला असेल त्या दिनांकापासून साठ दिवस संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी असे अपील करता येईल.

(३) पोटकलमे (१) व (२) यांमध्ये निर्देशिलेल्या साठ दिवसांच्या आत अपील दाखल न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत अधिकरणाची खात्री झाली तर, त्याला तो कालावधी संपल्यानंतर अपील दाखल करून घेता येईल.

(४) अपील अधिकरणाकडे करावयाचे अपील विहित नमुन्यात असेल आणि विहित पद्धतीने त्याचे सत्यापन करण्यात येईल आणि पोटकलम (२) खालील अपिलाची बाब खेरीजकरून इतर बाबतीत, त्यासोबत शंभर रुपये इतकी फी द्यावी लागेल.

(५) अपील अधिकरण, अपिलातील पक्षकारांना आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्यावर, स्वतःला योग्य वाटतील असे आदेश देऊ शकेल, आणि अशा कोणत्याही आदेशांत, प्रदेय असलेले संपदा शुल्क किंवा दंड वाढविणारा आदेश समाविष्ट असू शकेल :

परंतु, प्रदेय असलेले संपदा शुल्क किंवा दंड वाढवणारा कोणताही आदेश त्या वाढीमुळे बाधित झालेल्या व्यक्तीस अशा वाढीविरुद्ध कारण दर्शवण्याची वाजवी संधी देण्यात आल्याशिवाय काढला जाणार नाही.

(६) जेथे अपीलकर्ता एखाद्या संपत्तीच्या मूल्यांकनास आक्षेप घेईल तेथे, अपील अधिकरण विवाद्य मूल्याचा प्रश्न दोन मूल्यांकनकर्त्यांच्या लवादाकडे निर्देशित करू शकेल आणि अपीलकर्त्याने तशी मागणी केल्यास निर्देशित करील व त्यांच्यापैकी एका मूल्यांकनकर्त्याचे नामनिर्देशन अपीलकर्ता व दुसऱ्याचे नाम-निर्देशन उत्तरदाता करील आणि अधिकरण त्या प्रश्नाचा संबंध येत असेल तेथवर मूल्यांकनकर्त्यांच्या निर्णयाशी सुसंगत अशा रीतीने पोटकलम (५) खाली आपले आदेश काढील :

परंतु, दोन मूल्यांकनकर्त्यांमध्ये मतभेद झाला तर, एकमताने ठरवलेल्या किंवा एकमत न झाल्यास अपील अधिकरणाने नामनिर्देशित केलेल्या तिसऱ्या मूल्यांकनकर्त्याकडे ती बाब निर्देशित करण्यात येईल, आणि त्या मूल्यांकनकर्त्याचा मूल्यांकनाच्या प्रश्नावरील निर्णय अंतिम असेल.

(७) पोटकलम (६) खालील कोणत्याही लवाद कार्यवाहीचा खर्च, ज्याच्या सांगण्यावरून तो प्रश्न मूल्यांकनकर्त्यांकडे निर्देशित करण्यात आला असेल त्या केंद्र शासनाला किंवा, प्रकरणपरत्वे, उत्तरदायी व्यक्तीला सोसावा लागेल :

परंतु, उत्तरदायी व्यक्ती तिच्या सांगण्यावरून करण्यात आलेल्या कोणत्याही निर्देशनात पूर्णतः किंवा अंशतः यशस्वी होईल तेथे, तिने सोसावयाच्या खर्चाची व्याप्ती अपील अधिकरणाच्या विवेकाधीन असेल.

(८) पोटकलम (६) खाली लवाद निर्णयासाठी आपणाकडे निर्देशित केलेल्या कोणत्याही बाबीचा निकाल करताना मूल्यांकनकर्ता स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी करू किंवा करवू शकेल आणि अपील-कर्त्यास व उत्तरदात्यास आपापले म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्यावर स्वतःला योग्य वाटतील असे आदेश काढू शकेल व अशा आदेशांची एकेक प्रत अपील अधिकरणाकडे पाठवील.

(९) या कलमाखाली अपील अधिकरणाने काढलेल्या प्रत्येक आदेशाची एकेक प्रत उत्तरदायी व्यक्तीकडे व नियंत्रकाकडे पाठविण्यात येईल.

(१०) कलम ६४ मध्ये उपबंधित केले असेल तेवढे सोडून इतर बाबतीत, अपील अधिकरणाने अपीलान्ती दिलेला कोणताही आदेश अंतिम असेल.

(११) 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम १९२२' (१९२२ चा ११)-कलम ५-क याची पोट-कलमे (५), (७) आणि (८) यांचे उपबंध अपील अधिकरण त्या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडीत असताना त्याला जसे लागू असतात तसे ते उपबंध त्या अधिकरणाला ते या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडीत असताना लागू होतील.

६४. (१) उत्तरदायी व्यक्ती किंवा नियंत्रक त्याच्यावर कलम ६३ खाली आदेश बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत, अशा आदेशामधून उद्‌भवणारा कोणताही विधि-विषयक प्रश्न उच्च न्यायालयाकडे निर्देशित करण्याची अपील अधिकरणाकडे मागणी करणारा विहित नमुन्यातील अर्ज व तो अर्ज उत्तरदायी व्यक्तीने केला असल्यास सोबत शंभर रुपये फी भरून अपील अधिकरणाकडे सादर करू शकेल, आणि अपील अधिकरण, त्याच्या मते अशा आदेशामधून विधिविषयक प्रश्न उद्‌भवत असेल तर, ते प्रकरण उच्च न्यायालयाच्या मतासाठी परिकथित करील. उच्च न्यायालयाकडे निर्देशन.

(२) पोट-कलम (१) खालील अर्ज पूर्वोक्त नव्वद दिवसांच्या आत सादर न करण्यास पुरेसे कारण होते याबाबत अपील अधिकरणाची खात्री झाली तर, उक्त कालावधी संपल्यानंतर तो दाखल करून घेता येईल.

(३) पोट-कलम (१) खाली अर्ज करण्यात आला असता, जर अपील अधिकरणाने--

(क) कोणताही विधिविषयक प्रश्न उद्‌भवत नाही या कारणावरून ते प्रकरण परिकथित करण्यास नकार दिला तर, किंवा

(ख) तो मुदतबाह्य झालेला आहे या कारणावरून तो फेटाळला तर,

अर्जदारास, त्याच्यावर नकाराची किंवा, प्रकरणपरत्वे, फेटाळणीची नोटीस बजावण्यात येईल त्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, उच्च न्यायालयाकडे अर्ज करता येईल, आणि उच्च न्यायालय अपील अधिकरणाचा निर्णय बरोबर असल्याबाबत स्वतःची खात्री झाली नाही तर, अपील अधिकरणास ते प्रकरण उच्च न्यायालयाकडे परिकथित करण्याची आज्ञा करू शकेल, आणि अशी आज्ञा मिळाल्यावर अपील अधिकरण ते प्रकरण परिकथित करील :

परंतु, प्रकरण परिकथित करण्याबाबत उत्तरदायी व्यक्तीने अपील अधिकरणाकडे मागणी केली असता कोणताही विधिविषयक प्रश्न उद्‌भवत नाही या कारणावरून अपील अधिकरणाने तसे करण्यास नकार दिला असेल अशा कोणत्याही बाबतीत, प्रकरण परिकथित करण्यास नकार देणारी नोटीस उत्तर-दायी व्यक्तीला मिळेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत तिला अर्ज मागे घेता येईल, आणि तिने तसे केले तर पोटकलम (१) खाली तिने भरलेली फी तिला परत करण्यात येईल.

(४) उच्च न्यायालयाकडे केलेल्या परिकथनात तथ्ये, अपील अधिकरणाचा निर्णय व प्रकरणातून उद्‌भवणारा विधिविषयक प्रश्न पुढे मांडण्यात येईल.

(५) जसे परिकथित केले आहे तशा स्वरूपात ते प्रकरण त्यामधून उद्‌भवणाऱ्या विधिविषयक प्रश्नाचा निर्णय करणे शक्य होण्यास पुरेसे आहे अशी उच्च न्यायालयाची खात्री झाली नाही तर, ते अपील अधिकरणाला आपण निर्देशित करू अशी आपरिवर्तने त्यात करण्याची आज्ञा करू शकेल.

(६) अशा कोणत्याही प्रकरणाची सुनावणी झाल्यावर उच्च न्यायालय त्यामुळे उद्‌भवलेल्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय करील, आणि तसे करताना, स्वतःला योग्य वाटल्यास विधिविषयक प्रश्नाच्या शब्दयोजनेत फेरबदल करू शकेल आणि ज्यावर असा निर्णय आधारलेला असेल ते कारण अंतर्भूत करून त्यावर न्यायनिर्णय देईल आणि न्यायनिर्णयाची प्रत न्यायालयाची मोहर व प्रबंधकाची सही यांनिशी अपील अधिकरणाकडे पाठवील आणि अपील अधिकरण अशा न्यायनिर्णयाला अनुरूप अशा रीतीने त्या प्रकरणाचा निकाल करण्यासाठी आवश्यक असतील असे आदेश देईल.

(७) उच्च न्यायालयाकडे केलेल्या कोणत्याही निर्देशनाचा परिणाम म्हणून कोणत्याही निर्धारणाची रक्कम कमी करण्यात आली असेल तेथे, संपदा शुल्क म्हणून काही रक्कम जादा भरली गेली असेल तर ती रक्कम नियंत्रक देववील अशा व्याजासह परत करण्यात येईल--मात्र, सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्याची परवानगी मागण्याचा आपला उद्देश आहे अशी सूचना नियंत्रकाने अशा निर्देशनाचा निकाल हाती आल्यापासून तीस दिवसांच्या आत दिल्यास सर्वोच्च न्यायालयातील अपील निकालात निघेपर्यंत अशा परताव्याचे प्रदान पुढे ढकलण्यास नियंत्रकास प्राधिकृत करणारा आदेश उच्च न्यायालयाने दिलेला असेल तर गोष्ट अलाहिदा.

(८) उच्च न्यायालयाकडे करण्यात आलेल्या कोणत्याही निर्देशनाचा खर्च उच्च न्यायालयाच्या विवेकाधीन राहील.

(९) 'भारतीय मुदत अधिनियम, १९०८' (१९०८ चा ९) याचे कलम ५ हे या कलमाखाली उच्च न्यायालयाकडे केलेल्या अर्जास लागू होईल.

(१०) या कलमाखाली एखादे प्रकरण उच्च न्यायालयाकडे परिकथित करण्यात आले असेल तेव्हा उच्च न्यायालयाच्या दोनपेक्षा कमी नाहीत इतक्या न्यायाधीशांचे न्यायपीठ त्याची सुनावणी करील आणि अशा न्यायाधीशांच्या किंवा अशा बहुसंख्याक (असल्यास) न्यायाधीशांच्या मतानुसार त्याचा निर्णय केला जाईल :

परंतु, बहुमत नसेल तेथे न्यायाधीश, ज्याबाबत त्यांच्यात मतभेद आहे तो विधिविषयक मुद्दा परिकथन करतील, आणि त्यानंतर उच्च न्यायालयाचा एक किंवा अधिक अन्य न्यायाधीश त्या प्रकरणाची फक्त त्याच विधिविषयक मुद्यावर सुनावणी करतील, आणि ज्यांनी प्रकरणाची पहिली सुनावणी केली ते धरून, प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या न्यायाधीशांच्या बहुमतानुसार त्या मुद्याचा निर्णय केला जाईल.

सर्वोच्च न्यायालयाकडे अपील.

**६५.** (१) कलम ६४ खाली परिकथित केलेल्या प्रकरणावर उच्च न्यायालयाने दिलेल्या न्याय-निर्णयाविरुद्ध, ज्या बाबतीत उच्च न्यायालय ते प्रकरण सर्वोच्च न्यायालयाकडे अपील करण्यास योग्य म्हणून प्रमाणित करील अशा कोणत्याही बाबतीत सर्वोच्च न्यायालयाकडे अपील होऊ शकेल.

(२) या कलमाखालील अपिलात उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयात बदल करण्यात आला असेल किंवा तो फिरवण्यात आला असेल तेथे, कलम ६४ च्या पोटकलम (६) मध्ये उपबंधित केलेल्या पद्धतीने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात येईल.

(३) सर्वोच्च न्यायालयाने निवाडचाने देववलेल्या परिव्ययाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या अंमलबजावणीसाठी आपणांकडे अर्ज आला असता उच्च न्यायालय तो आदेश अंमलबजावणीसाठी उच्च न्यायालयास दुय्यम असलेल्या कोणत्याही न्यायालयाकडे पाठवू शकेल. ]

उच्च न्यायालयाकडे निर्देशन केले असता प्रतिनिधित्वाचे प्रदान करण्यास विलंब लावावयाचा नाही.

**६६.** कोणतेही प्रतिनिधित्व प्रदान केले जाण्यासाठी अर्ज करण्यात आला असेल तेथे, कलम ६४ खाली उच्च न्यायालयाकडे एखादे निर्देशन करण्यात आले आहे या कारणावरून त्याकामी विलंब लावता येणार नाही.

[१][संपदा शुल्क भरल्याचे प्रमाणपत्र.]

[१][**६७.** कलम ५८ खाली करण्यात आलेल्या निर्धारणावरून नियंत्रकाने प्रदेय ठरवलेली संपदा शुल्काची रक्कम उत्तरदायी व्यक्तीने भरली असेल तेथे, त्या व्यक्तीच्या अर्जावरून नियंत्रक तशा आशयाचे प्रमाणपत्र तिला देईल. ]

अपेक्षी हितसंबंधाच्या बाबतीत शुल्काचे परिवर्तन.

**६८.** अपेक्षी हितसंबंधास हक्कदार असलेल्या व्यक्तीच्या अर्जावरून स्वविवेकानुसार नियंत्रकाला असे संपदा शुल्क विवक्षित रकमेत परिवर्तित करता येईल की, जे त्या परिवर्तनाच्या अभावी प्रदेय होईल किंवा होऊ शकेल, व ती रक्कम तत्काळ द्यावी लागेल, आणि नियंत्रक ती रक्कम ठरवण्यासाठी अशा शुल्काबाबतचे दायित्व आणि त्याचा दर व रक्कम यांवर परिणाम करणारी संभावी परिस्थिती लक्षात घेऊन व तीन टक्के दराने व्याजाची गणना करून अशा शुल्कावर विद्यमान मूल्य ठरवील, आणि अशी रक्कम मिळाल्यावर नियंत्रक, तदनुसार प्रमाणपत्र देईल.

गुंतागुंतीच्या प्रकरणांतील निर्धारण.

**६९.** ज्या ज्या व्यक्तींच्या मृत्यूनंतर संपत्ती संक्रामित झाली त्यांची संख्या किंवा मृत्यूबरोबर संक्रामित झालेल्या संपत्तीमधील वेगवेगळ्या व्यक्तींच्या हितसंबंधाचे गुंतागुंतीचे स्वरूप यांमुळे किंवा अन्य कोणत्याही कारणामुळे, एखादी संपत्ती किंवा तीमधील कोणताही हितसंबंध याच्या बाबतीत प्रदेय असलेल्या संपदा शुल्काची रक्कम नेमकेपणाने विनिश्चित करणे अथवा संपत्तीच्या किंवा हितसंबंधाच्या मूल्याच्या मानाने गैरवाजवी खर्च केल्याशिवाय ती विनिश्चित करणे कठीण असेल तर, शुल्कास उत्तरदायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अर्जावरून आणि संपत्तीचे परिमाण व तिच्यामधील अनेक हितसंबंध आणि त्या प्रकरणाची अन्य परिस्थिती याबाबत आपल्या शक्तीनुसार सर्व माहिती तिने मंडळाला दिल्यावर मंडळ संपत्ती किंवा हितसंबंध आणि त्यामधील विविध हितसंबंध किंवा त्यांपैकी कोणताही हितसंबंध त्यांच्याबाबत प्रदेय असलेल्या सर्व किंवा कोणत्याही शुल्कांबद्दल तोड म्हणून संपत्तीच्या किंवा हितसंबंधाच्या मूल्यावर परिस्थिती लक्षात घेता योग्य वाटेल अशी रक्कम निर्धारित करू शकेल आणि याप्रमाणे निर्धारित केलेल्या रकमेचा भरणा अशा संपत्तीच्या किंवा हितसंबंधाच्या संबंधातील संपदा शुल्काबाबत सांगितलेल्या सर्व दाव्यांसंबंधी संपूर्ण भरणा म्हणून स्वीकारू शकेल आणि तदनुसार प्रमाणपत्र देईल.

भरणा पुढे ढकलण्यास नियंत्रक सशर्त मुभा देऊ शकेल.

**७०.** (१) कोणत्याही संपत्तीवर बसणाऱ्या संपदा शुल्काची रक्कम बेसुमार भुर्दंड बसल्याशिवाय एकदम उभी करता येणार नाही याबाबत नियंत्रकाची खात्री झाल्यास, तो स्वतःला योग्य वाटेल त्याप्रमाणे तितक्या कालावधीपुरते, तितक्या व्याप्तीपर्यंत व चार टक्के किंवा संपत्तीपासून मिळणारे त्याहून अधिक दराचे कोणतेही व्याज यांहून अधिक नाही इतके व्याज देण्याच्या शर्तीवर आणि तशा अन्य अटींवर भरणा पुढे ढकलण्यास मुभा देऊ शकेल.

(२) पोटकलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, स्थावर संपत्तीच्या संबंधातील संपदा शुल्क उत्तरदायी असलेल्या व्यक्तीच्या विकल्पानुसार, [२][चार] समान वार्षिक हप्त्यांनी किंवा [३][आठ] समान सहामाही हप्त्यांनी व ज्या दिनांकास पहिला हप्ता प्रदेय असेल त्या दिनांकापासून दरसाल

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २२ द्वारे मूळ कलम ६७ ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता--कलम २३ द्वारे मूळ "आठ" या शब्दाऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

३. कित्ता--कलम २३ द्वारे "सोळा" या शब्दाऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

दर शेकडा चार दराने व्याजासहित किंवा संपत्तीपासून मिळणाऱ्या त्याहून अधिक दराच्या कोणत्याही व्याजासहित भरता येईल आणि शुल्काच्या भरणा न केलेल्या भागावरील व्याज प्रत्येक हप्त्यात समाविष्ट करून तदनुसार भरणा करावा लागेल; पण त्या त्या काळी भरणा न झालेले शुल्क, ते भरण्याच्या दिनांकापर्यंतच्या व्याजासहित कोणत्याही वेळी भरता येईल आणि संपत्ती विकण्यात आली असेल त्याबाबतीत, विक्री पूर्ण झाल्यावर ते भरण्यात येईल आणि याप्रमाणे भरणा न झाल्यास कलम ७३ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने ते वसूल करण्यात येईल.

७१. ज्या मृत्यूनंतर संपदा शुल्क आकारणीयोग्य झाले त्या मृत्यूपासून वीस वर्षे संपल्यानंतर असे कोणतेही शुल्क अदत्त राहिले तर, स्वतःला योग्य वाटल्यास मंडळ अशा शुल्कास उत्तरदायी असलेल्या अगर त्या संपत्तीत हितसंबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या अर्जावरून, असे शुल्क किंवा त्याचा कोणताही भाग किंवा त्यावरील कोणतेही व्याज यांचा भरणा माफ करू शकेल. मृत्यू झाल्यापासून वीस वर्षांनंतर अदत्त राहिलेल्या शुल्कास व व्याजास मंडळ माफी देऊ शकेल.

७२. या अधिनियमातील या भागाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात येणारे सर्व प्रतिज्ञालेख, हिशेब, प्रमाणपत्रे, विवरणपत्रे व प्रपत्रे मंडळ विहित करील अशा नमुन्यात असतील व त्यात तसा विहित तपशील अंतर्भूत असेल आणि मंडळाने तसे आवश्यक केल्यास ते दोन प्रतींत केले जातील आणि हिशेब व विवरणपत्रे मंडळाने विहित केलेल्या रीतीने आणि पुस्तक व दस्तऐवज हजर करून सुपूर्द करण्यात व शपथेवर सत्यापित करण्यात येतील आणि या कलमाच्या उपबंधांचे अनुपालन करण्यात बुद्धिपुरस्सर कसूर करील अशी कोणतीही व्यक्ती [१][एक हजार रुपयांहून अधिक नाही इतकी रक्कम दंड म्हणून भरण्यास पात्र असेल: परंतु, संबंधित व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय या कलमाखाली कोणताही दंड बसविण्यात येणार नाही. ] नमुने.

[२][७३. (१) या अधिनियमाखाली काढण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचा परिणाम म्हणून कोणतेही संपदा शुल्क, दंड किंवा व्याज प्रदेय होईल तेव्हा, असे शुल्क, दंड किंवा व्याज भरण्यास उत्तरदायी किंवा दायी असलेल्या अन्य व्यक्तीवर नियंत्रक याप्रमाणे किती रक्कम प्रदेय आहे आणि किती मुदतीत ती भरावी लागेल ते विनिर्दिष्ट करणारी मागणी नोटीस बजावील. [२][शुल्क, दंड, इत्यादींच्या मागणीची नोटीस व वसुली.]

(२) पोटकलम (१) खाली काढलेल्या मागणी नोटिशीमध्ये प्रदेय म्हणून विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही रक्कम नोटिशीत उल्लेखिलेल्या अशा मुदतीत, अशा ठिकाणी व अशा व्यक्तीकडे किंवा याप्रमाणे कोणतीही मुदत उल्लेखिण्यात आली नसेल तर, नोटीस बजाविण्यात आल्याच्या दिनांकानंतर येणाऱ्या दुसऱ्या महिन्याच्या पहिल्या दिवशी किंवा त्यापूर्वी भरावी लागेल आणि याप्रमाणे भरणा करण्यास चुकणारी कोणतीही उत्तरदायी व्यक्ती कसूरदार असल्याचे मानण्यात येईल.

(३) भारतात पैसे पाठविण्यास भारताबाहेरील ज्या देशाच्या कायद्यांनुसार प्रतिषेध किंवा निर्बंध असेल त्या देशात असलेल्या मत्तेच्या संबंधाने उत्तरदायी व्यक्तीबाबत निर्धारण करण्यात आले असेल तर, नियंत्रक संपदा शुल्कापैकी ज्या भागाचा त्या देशातील मत्तेशी संबंध जोडता येण्यासारखा आहे त्याच्या बाबतीत उत्तरदायी व्यक्तीने कसूर केली आहे असे समजणार नाही, आणि पैसे पाठविण्याबाबतचा प्रतिषेध किंवा निर्बंध दूर केला जाईपर्यंत उत्तरदायी व्यक्तीने शुल्काच्या त्या भागाच्या बाबतीत कसूर केलेली नाही असे समजत राहील.

(४) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, उत्तरदायी व्यक्तीने कलम ६२ खाली अपील सादर केलेले असेल तेथे, अशा अपिलाचा निकाल झालेला नाही तोपर्यंत स्वविवेकानुसार नियंत्रकास उत्तरदायी व्यक्तीने कसूर केलेली नाही असे समजता येईल.

(५) 'भारतीय प्राप्तिकर अधिनियम, १९२२' (१९२२ चा ११)-कलम ४६ ची पोटकलमे (१), (१क), (२), (३), (४), (५), (५क) व (६) व (७) आणि कलम ४७ यांचे उपबंध, जणू काही ते या अधिनियमाचे उपबंध असावेत आणि प्राप्तिकर व त्या अधिनियमाखाली दंड किंवा व्याज म्हणून बसवलेल्या रकमा यांच्याऐवजी संपदा शुल्क (तात्पुरते निर्धारित केलेले संपदा शुल्क धरून) व या अधिनियमाखाली दंड किंवा व्याज म्हणून बसवलेल्या रकमा यांचा आणि प्राप्तिकर अधिकाऱ्याच्या ऐवजी संपदा शुल्क नियंत्रक याचा निर्देश करत असावेत त्याप्रमाणे लागू होतील.

७३क. या अधिनियमाखाली कोणतेही संपदा शुल्क बसविण्यासाठी कोणतीही कार्यवाही—— [२][निर्धारणाची किंवा फेरनिर्धारणाची कार्यवाही सुरू करण्यासाठी मुदत.]

(क्) पहिल्या निर्धारणाच्या बाबतीत, ज्याच्या संपत्तीच्या बाबतीत संपदा शुल्क प्रदेय झाले त्या मृताच्या मृत्यूच्या दिनांकापासून पाच वर्षे संपल्यानंतर; आणि

(ख्) फेरनिर्धारणाच्या बाबतीत, या अधिनियमाखाली संपदा शुल्कासाठी अशा संपत्तीबाबत निर्धारण केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षे संपल्यानंतर

सुरू करता येणार नाही. ]

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २४ द्वारे "कलम ५६ मध्ये उल्लेखिलेल्या दंडास पात्र असेल" या मजकुराऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता——कलम २५ द्वारे कलम ७३ ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

## भाग ८ वा

### संपदा शुल्काचा संपत्तीवरील प्रभार आणि त्याबाबतचे पैसे उभारण्याबाबत सुविधा

संपदा शुल्क हा त्यास पात्र असलेल्या संपत्तीवरील पहिला प्रभार.

७४. (१) कलम १९ च्या उपबंधांच्या अधीनतेने, मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या जंगम किंवा स्थावर संपत्तीच्या बाबतीत प्रदेय होणारे संपदा शुल्क हा, याप्रमाणे संक्रामित होणारी जी स्थावर संपत्ती असेल (शेतजमीन धरून)––मग त्याच्या मृत्यूनंतर ती कोणाकडेही निहित होवो––तिच्यावरील या अधिनियमाच्या ६ व्या भागाखाली मजरा घालण्यायोग्य ऋणे व बोजे यांच्यानंतरचा पहिला प्रभार असेल ; आणि अशा संपत्तीचे कोणतेही खाजगी हस्तांतरण किंवा सुपूर्दगी अशा संपदा शुल्काबाबत सांगितलेल्या कोणत्याही दाव्यापुढे शून्य असेल.

(२) मृताच्या मृत्यूबरोबर मृताच्या वैध प्रतिनिधीहून अन्य कोणत्याही व्यक्तीकडे संक्रामित होणाऱ्या जंगम संपत्तीतील कोणत्याही कब्जागत हितसंबंधाच्या मूल्याशी यथाप्रमाण असा संपदेवरील शुल्काचा भाग हा अशा हितसंबंधावरील पहिला प्रभार असेल :

परंतु, अशा प्रभाराची दखल नसताना सद्भावपूर्वक मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात खरेदी करणाऱ्या व्यक्तीपुरती ती संपत्ती याप्रमाणे प्रभाराधीन असणार नाही.

(३) नियंत्रक स्वतःला योग्य वाटेल अशा परिस्थितीत व अशा शर्तींवर, कोणतीही संपत्ती––मग ती जंगम असो वा स्थावर असो––संपूर्णतः किंवा तिचा एखादा भाग या कलमाखालील प्रभारापासून मुक्त करू शकेल.

विवक्षित प्रकरणांत संपदा शुल्कामधून विमुक्ती.

७५. कलम ६७ खाली नियंत्रकाने किंवा कलम ६९ खाली मंडळाने दिलेले प्रमाणपत्र, त्यामध्ये अंतर्भूत असलेली संपत्ती व त्या संपत्तीचा संबंध येत असेल तेथवर प्रमाणपत्र देण्यात आलेली व्यक्ती यांना संपदा शुल्काबाबत सांगितलेल्या आणखी कोणत्याही दाव्यापासून विमुक्त करील, पण कपटाची किंवा महत्त्वाची तथ्ये प्रकट करण्यात कसूर झाल्यास कोणत्याही व्यक्तीस किंवा संपत्तीस संपदा शुल्कामधून विमुक्त करणार नाही आणि मृत्यूबरोबर संक्रामित झाल्याचे मागाहून दाखविण्यात आलेल्या संपत्तीच्या बाबतीत प्रदेय असलेल्या शुल्कावर किंवा त्या प्रमाणपत्रात समाविष्ट असलेल्या संपत्तीच्या बाबतीत त्या कारणांमुळे प्रदेय असलेल्या कोणत्याही जास्तीच्या शुल्कावर परिणाम करणार नाही :

परंतु तरीसुद्धा, प्रमाणपत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत प्रदेय असलेल्या संपूर्ण संपदा शुल्कामधून विमुक्ती मिळाल्याचे दर्शविणारे प्रमाणपत्र, असे कोणतेही कपट किंवा कसूर असली तरी त्याची दखल नसताना सद्भावपूर्वक मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात खरेदी करणाऱ्या व्यक्तीला शुल्कभारातून मुक्त करील.

विवक्षित प्रकरणांत उत्तरदायी व्यक्तीची विश्वस्तांनी किंवा मालकांनी परतफेड करावयाची.

७६. कलम ५३ खाली उत्तरदायी असलेल्या व्यक्तीने तिच्याकडे संक्रामित न झालेल्या कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत संपदा शुल्काच्या कोणत्याही भागाचा भरणा केला तर, प्रसंगपरत्वे, आवश्यक असेल तेथे, संपत्तीचे विश्वस्त किंवा मालक त्याची त्याला परतफेड करतील.

शुल्क भरण्यासाठी किंवा अगोदरच भरलेली रक्कम उभारण्यासाठी सुविधा.

७७. (१) कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत संपदा शुल्क भरण्यास जी प्राधिकृत आहे किंवा जिला ते भरणे आवश्यक करण्यात आले आहे त्या व्यक्तीस शुल्क भरण्यासाठी किंवा ते अगोदरच भरण्यात आले असेल तेव्हा शुल्काची रक्कम उभारण्यासाठी, त्या संपत्तीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विक्रीद्वारे किंवा गहाणाद्वारे किंवा त्यावरील समापनीय प्रभाराद्वारे असे शुल्क आणि स्वतः योग्यपणे भरलेले व्याज व केलेला खर्च यांची रक्कम उभारण्याची शक्ती असेल––मग ती संपत्ती तिच्यामध्ये निहित झालेली असो वा नसो :

परंतु, अशी कोणतीही विक्री किंवा गहाण किंवा समापनीय प्रभार याखाली प्रदेय असलेली कोणतीही रक्कम ज्या व्यक्तीकडून उभारली जात असेल तिच्या विकल्पानुसार, (अशी रक्कम किंवा तिचा भाग प्रदेय संपदा शुल्काचे प्रतिरूप असेल तितक्या व्याप्तीपर्यंत) ती रक्कम उभी करणाऱ्या व्यक्तीला ती न देता नियंत्रकाला देता येईल.

(२) कोणत्याही संपत्तीत हितसंबंध असणारी जी व्यक्ती संपत्तीबाबतचे संपदा शुल्क भरील ती जणू काही तिच्याकडे संपत्ती गहाण टाकून त्या संपत्तीबाबतच्या संपदा शुल्काची रक्कम उभारण्यात आलेली असावी त्याप्रमाणे तशाच प्रभारास हक्कदार असेल.

(३) जी संपत्ती संव्यवस्थेमध्ये समाविष्ट असेल किंवा संव्यवस्थेखालील न्यासांच्या प्रीत्यर्थ खर्च करण्यासाठी न्यास म्हणून धारण केली असेल तिच्या विक्रीमधून उद्भवणारा कोणताही पैसा, संव्यवस्थेत समाविष्ट असलेल्या व त्याच न्यासाच्या प्रीत्यर्थ धारण केलेल्या संपत्तीबाबतचे कोणतेही संपदा शुल्क भरण्याच्या कामी लावता येईल.

## भाग ९ ब

## संकीर्ण

**विवक्षित प्रकरणात न्यायालयांच्या अधिकारितेस अडकाठी.**

७८. या अधिनियमाखाली निश्चित केलेले कोणतेही संपदा शुल्क रद्द ठरवण्यासाठी किंवा, त्यात फेरबदल करण्यासाठी कोणत्याही दिवाणी न्यायालयात कोणताही दावा दाखल केला जाणार नाही आणि या अधिनियमाखाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करावयाच्या योजलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल [१][शासन किंवा] शासनाचा कोणताही अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही अभियोग, दावा किंवा अन्य कार्यवाही होऊ शकणार नाही.

**शपथेवर पुरावा घेणे, इत्यादींबाबतची शक्ती.**

७९. कलम ४ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्यांपैकी मूल्यांकनकर्त्याहून अन्य प्रत्येक प्राधिकरणास या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी दाव्याची संपरीक्षा करताना पुढील बाबींच्या संबंधात 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली न्यायालयामध्ये निहित करण्यात आलेल्या आहेत तशाच शक्ती असतील, त्या बाबी अशा:—

(क) कोणत्याही व्यक्तीला उपस्थित राहण्यास भाग पाडणे व तिची शपथेवर तपासणी करणे ;

(ख) दस्तऐवजांचा शोध घेणे व ते दाखल करणे या गोष्टी आवश्यक करणे ;

(ग) प्रतिज्ञालेखाच्या स्वरूपात पुरावा स्वीकारणे ;

(घ) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्रे काढणे ;

आणि अशा कोणत्याही प्राधिकरणासमोरील या अधिनियमाखालील कोणतीही कार्यवाही, 'भारतीय दंड संहिता' (१८६० चा ४५)-कलम १९३ व २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

**[२][निर्धारणांच्या बाबतीतील माहिती प्रकट करणे.]**

[२][८०. एखादी व्यक्ती या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही निर्धारणाबाबतच्या कोणत्याही माहितीसाठी विहित नमुन्यात नियंत्रकाकडे अर्ज करील तेव्हा, नियंत्रक तशी माहिती देणे सार्वजनिक हिताचे आहे अशी स्वतःची खात्री झाल्यास फक्त त्याच निर्धारणाबाबतची मागितलेली माहिती देऊ शकेल किंवा देववू शकेल आणि या बाबतीतील त्याचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयात तो प्रश्नास्पद केला जाणार नाही.

**उत्तरदायी व्यक्तींच्या संबंधातील माहिती प्रकाशित करणे.**

८०क. (१) कोणत्याही उत्तरदायी व्यक्तींची नावे किंवा अशा व्यक्तींच्या बाबतीतील या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीशी संबंधित असा अन्य कोणताही तपशील प्रकाशित करणे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा समयोचित आहे असे केंद्र शासनाचे मत असेल तर, ते स्वतःला योग्य वाटेल अशा रीतीने अशी नावे आणि तपशील प्रकाशित करवू शकेल.

(२) या अधिनियमाखाली बसवण्यात आलेल्या कोणत्याही दंडाच्या बाबतीत या कलमाखाली कोणतीही गोष्ट, अपील नियंत्रकाकडे अपील सादर करण्याची मुदत अपील दाखल केले न जाता संपून गेली किंवा अपील करण्यात आले असल्यास त्याचा निकाल झाला असे होईपर्यंत प्रकाशित करण्यात येणार नाही. ]

**माहिती पुरविण्यासाठी राज्यांबरोबर व्यवस्था.**

८१. केंद्र शासनाला कोणत्याही राज्याच्या शासनाबरोबर, या अधिनियमाखाली किंवा त्या राज्यात त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली कोणतेही संपदा शुल्क बसविण्याच्या किंवा वसूल करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक असेल अशा माहितीच्या आदान-प्रदानाची व्यवस्था करता येईल.

**नोटिसा बजावणे.**

८२. या अधिनियमाखालील कोणतीही नोटीस किंवा आज्ञापत्र त्यामध्ये नामनिर्दिष्ट करण्यात आलेल्या व्यक्तीवर डाकेने किंवा ते जणू काही 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' (१९०८ चा ५) याखाली न्यायालयाने काढलेले समन्स असावे त्याप्रमाणे बजावता येईल.

**प्राधिकृत प्रतिनिधींच्या मार्फत उपस्थिती.**

८३. संपदा शुल्कास उत्तरदायी असलेली जी व्यक्ती या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाही-च्या संबंधात कलम ४ च्या पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकरणा-समोर, ज्या बाबतीत तिने कलम ७९ खाली जातीने उपस्थित रहाणे आवश्यक असते ती बाब खेरीजकरून एरव्ही, उपस्थित रहाण्यास हक्कदार असेल किंवा तसे जिला आज्ञापित करण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती तिने याबाबत ज्या व्यक्तीला लेखी प्राधिकृत केले असेल अशी तिची नातेवाईक व्यक्ती किंवा तिने कायम नेमलेली व्यक्ती अथवा विधिव्यवसायी किंवा सनदी लेखाकार [३][किंवा विहित करण्यात येईल अशी अर्हता असलेली अन्य कोणतीही व्यक्ती ] यांच्यामार्फत उपस्थित राहू शकेल.

---

१. १९६४ चा अधिनियम ५-कलम ४९ द्वारे घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).
२. किता—कलम ४९ द्वारे कलम ८० ऐवजी घातले (१ एप्रिल, १९६४ रोजी व तेव्हापासून).
३. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २६ द्वारे घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

**स्पष्टीकरण.**—या कलमात—

(क) "उत्तरदायी व्यक्तीने कायम नेमलेली व्यक्ती" यामध्ये, जेथे उत्तरदायी व्यक्तीचे चालू खाते असेल किंवा तिचे अन्य नेहमीचे व्यवहार चालत असतील अशा अनुसूचित बँकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश असेल;

[1][(ख) "विधिव्यवसायी" याचा अर्थ उच्च न्यायालयाचा अधिवक्ता, वकील किंवा न्यायवादी असा आहे आणि त्यामध्ये व्यवसायात असलेल्या प्लीडरचा समावेश आहे;]

(ग) "सनदी लेखाकार" याचा अर्थ 'सनदी लेखाकार अधिनियम, १९४९' (१९४९ चा ३८) यामध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सनदी लेखाकार असा आहे.

[2][कंपन्यांनी मृत व्यक्तीचा तपशील नियंत्रकास पुरवावयाचा.]

[2][८४. (१) 'कंपनी अधिनियम, १९५६' (१९५६ चा १) याच्या अर्थानुसार जी कंपनी आहे तिला तिच्या प्रधान अधिकाऱ्यांपैकी कोणाच्याही मार्फत, कंपनीच्या कोणत्याही सदस्याच्या किंवा ऋण-पत्रधारकाच्या मृत्यूचे वृत्त कळले असेल तेथे, मृत्यूची खबर मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत ती कंपनी कंपनीमधील मृताच्या हितसंबंधाबाबतचा विहित असेल अशा तपशील नियंत्रकास पुरवील आणि मृताच्या नावावर असलेल्या कोणत्याही शेअर्सचे किंवा ऋणपत्रांचे हस्तांतरण झाले असेल तेव्हा, हस्तांतरितीने असे शेअर्स किंवा ऋणपत्रे मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात संपादन केली नसतील तर अथवा अशा शेअर्सच्या किंवा ऋणपत्रांच्या बाबतीतील संपदा शुल्क भरण्यात आले आहे किंवा भरण्यात येईल किंवा, प्रकरणपरत्वे, कोणतेही संपदा शुल्क प्रदेय नाही अशा आशयाचे नियंत्रकाचे प्रमाणपत्र कंपनीपुढे दाखल करण्यात आले नसेल तर कंपनीने त्या हस्तांतरणाची नोंदणी करणे कायदेशीर होणार नाही.

(२) केंद्रीय, राज्य किंवा प्रांतीय अधिनियमान्वये स्थापन झालेल्या निगमाला त्याच्या प्रधान अधिकाऱ्यांपैकी कोणाच्याही मार्फत निगमाचे पुंजरोखे, शेअर्स किंवा अन्य रोखे यांचा नोंदलेला धारक असलेल्या व्यक्तीच्या मृत्यूचे वृत्त कळले असेल तेथे, मृत्यूची खबर मिळाल्यापासून तीन महिन्यांच्या आत निगमाकडून निगमातील मृताच्या हितसंबंधाबाबतचा विहित असेल असा तपशील नियंत्रकाला पुरविण्यात येईल.

(३) या कलमाच्या उपबंधाचे अनुपालन करण्याच्या कामी वाजवी कारणांशिवाय कसूर करील अशी कोणतीही कंपनी किंवा निगम एक हजार रुपये इतका दंड भरण्यास पात्र असेल.]

मंडळाच्या नियम करण्याबाबतच्या शक्ती.

८५. (१) पूर्व प्रकाशनाच्या शर्तीच्या अधीनतेने आणि केंद्र शासनाच्या नियंत्रणाच्या अधीनतेने मंडळास, ज्या बाबी विहित करणे या अधिनियमानुसार आवश्यक किंवा अनुज्ञेय आहे अथवा या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी किंवा त्याची अंमलबजावणी करण्यासाठी ज्या विहित करणे आवश्यक किंवा सोईस्कर आहे त्या सर्व बाबी विहित करणारे असे या अधिनियमाशी विसंगत नसलेले नियम करता येतील.

(२) नियम करण्याबाबत या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तीमध्ये, तिच्या वापराच्या प्रथम प्रसंगी, नियमांस किंवा त्यांपैकी कोणत्याही नियमास या अधिनियमाच्या प्रारंभ दिनांकाच्या अगोदरचा नाही अशा दिनांकापासून पूर्वलक्षी प्रभाव देण्याची शक्ती समाविष्ट असेल.

(३) या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम, ते करण्यात आल्यानंतर होईल तितक्या लवकर, संसदेच्या दोन्ही सभागृहांसमोर ठेवण्यात येतील.

---

१. १९५८ चा अधिनियम ३३-कलम २६ द्वारे मूळ खंड (ख) ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. कित्ता—कलम २७ द्वारे मूळ कलम ८४ ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

## पहिली अनुसूची

( कलम ५ पहा )

### ज्यांमध्ये शेतजमिनींवर संपदा शुल्क आकारणीयोग्य आहे अशी राज्ये

मुंबई.

मध्यप्रदेश.

ओरिसा.

पंजाब.

उत्तर प्रदेश.

हैद्राबाद.

मध्य भारत.

राजस्थान.

सौराष्ट्र.

सर्व भाग ' ग ' राज्ये.

[१][आसाम---

बिहार.]

[२][त्रावणकोर-कोचीन.]

[३][तामिळनाडू.]

[४][आंध्र.]

[५][म्हैसूर.]

[६][पतियाळा व पूर्व पंजाब राज्य संघ.]

---

१. अधिसूचना क्र. एस.आर.ओ. ११३८, दि. ७ एप्रिल, १९५४, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृ. ६६६ द्वारे घातले.

२. अधिसूचना क्र. एस.आर. ओ. ९०४, दि. २२ एप्रिल, १९५५, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ ७६१ द्वारे घातले.

३. अधिसूचना क्र. एस आर. ओ. १२२७, दि. ६ जून, १९५५, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १०३६ द्वारे घातले.

४. अधिसूचना क्र. एस.आर. ओ. १८७७, दि. २२ ऑगस्ट, १९५५, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १६९४ द्वारे घातले.

५. अधिसूचना क्र. एस.आर. ओ. ३६६०, दि. ९ डिसेंबर, १९५५, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ १६९४ द्वारे घातले.

६. अधिसूचना क्र. एस. आर. ओ. ९६६, दि. २० एप्रिल, १९५६, **भारताचे राजपत्र**, भाग दोन, विभाग ३, पृष्ठ ५९७ द्वारे घातले.

[1][ दुसरी अनुसूची

( कलम ५, २०क आणि ३५ पहा )

**संपदा शुल्काचे दर**

[2][ भाग १ ला

मृताच्या मृत्यूबरोबर संक्रामित होणाऱ्या किंवा संक्रामित झाल्याचे मानण्यात येणाऱ्या कोणत्याही संपत्तीच्या बाबतीत—

| | | |
|---|---|---|
| (१) | संपदेचे ऐन मूल्य रु. ५०,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | काही नाही; |
| (२) | संपदेचे ऐन मूल्य रु. ५०,००० पेक्षा अधिक असेल पण रु. १,००,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | संपदेचे ऐन मूल्य रु. ५०,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या ४ टक्के; |
| (३) | संपदेचे ऐन मूल्य रु. १,००,००० पेक्षा अधिक असेल पण रु. २,००,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | रु. २,००० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु, १,००,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या १० टक्के; |
| (४) | संपदेचे ऐन मूल्य रु. २,००,००० पेक्षा अधिक असेल पण रु. ३,५०,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | रु. १२,००० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु. २,००,०००पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या १५ टक्के; |
| (५) | संपदेचे ऐन मूल्य रु. ३,५०,००० पेक्षा अधिक असेल पण रु. ५,००,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | रु. ३४,५०० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु. ३,५०,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या २५ टक्के; |
| (६) | संपदेचे ऐन मूल्य रु. ५,००,००० पेक्षा अधिक असेल पण रु. १०,००,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | रु. ७२,००० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु. ५,००,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या ३० टक्के; |
| (७) | संपदेचे ऐन मूल्य रु. १०,००,००० पेक्षा अधिक असेल पण रु. १५,००,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | रु. २,२२,००० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु. १०,००,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या ४० टक्के; |
| (८) | संपदेचे ऐन मूल्य रु. १५,००,००० पेक्षा अधिक असेल पण रु. २०,००,००० पेक्षा अधिक नसेल तेथे. | रु. ४,२२,००० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु. १५,००,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या ५० टक्के; |
| (९) | संपदेचे ऐन मूल्य रु. २०,००,००० पेक्षा अधिक असेल तेथे. | रु. ६,७२,००० अधिक संपदेचे ऐन मूल्य रु. २०,००,००० पेक्षा जितक्या रकमेने अधिक असेल तिच्या ८५ टक्के. ] |

**भाग २ रा**

कलम २०क मध्ये निर्देशल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही कंपनीमध्ये मृताने धारण केलेल्या शेअर्सच्या किंवा ऋणपत्रांच्या बाबतीत—

| | | शुल्काचा दर |
|---|---|---|
| (१) | शेअर्सचे किंवा ऋणपत्रांचे ऐन मूल्य रु. ५,००० पेक्षा अधिक नसेल तर— | काही नाही. |
| (२) | शेअर्सचे किंवा ऋणपत्रांचे ऐन मूल्य रु. ५,००० पेक्षा अधिक असेल तर— | ७½ टक्के.] |

---

१. १९५८ चा अधिनियम ३३–कलम २८ द्वारे २ ऱ्या अनुसूची ऐवजी घातले (१ जुलै, १९६० रोजी व तेव्हापासून).

२. १९६६ चा अधिनियम १३–कलम ३८ द्वारे १ ल्या भागाऐवजी घातले (१ एप्रिल, १९६६ रोजी व तेव्हापासून).

# THE ESTATE DUTY ACT, 1953

## संपदा शुल्क अधिनियम, १९५३

### इंग्रजी-मराठी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| abatement | कपात | [S. 46(1)-proviso] |
| absolute interest | अबाधित हितसंबंध | [S. 23-expl. (1)] |
| accounting years | हिशेब वर्षे | [S. 17(2)] |
| accruing or arising | प्रोद्भूत होणारा किंवा उत्पन्न होणारा | [S. 39(1)] |
| accumulations | संचयी प्राप्ती | [S. 27(7)(*iv*)(a)] |
| admit an appeal | अपील स्वीकृत करणे | [S. 62(2)] |
| advancement | अभिवृद्धि | [S. 2(17)] |
| adverse possession | विरुद्ध कब्जा | [S. 53(2)] |
| affairs | कारभार | [S. 17(4) (ii)(a)] |
| aggregate | एकवट | [S. 34 (1)(c)] |
| aggregate amount | एकवट रक्कम | [S. 17(2)] |
| aggregate net income | एकवट निव्वळ प्राप्ती | [S. 17(2)-proviso(a)] |
| aggregation | एकवट | [S. 34-m.n.] |
| agricultural lands | शेतजमिनी | [S. 5(2)] |
| allowance | मजरा | [S. 31-m.n.] |
| allow as a deduction | मजरा घालणे | [S. 26(2) |
| allow interest | व्याज देववणे | [S. 64(7)] |
| amount or value | प्रमाण किंवा मूल्य | [S. 53(4)] |
| annuity | वार्षिकी | [S. 27(7) (iii)] |
| anything done or suffered | केलेली किंवा साहिलेली कोणतीही गोष्ट | [S.57(4)] |
| appellant and respondent | अपीलकर्ता व उत्तरवादी | [S. 63(8)] |
| Appellate Controller | अपील नियंत्रक | [S. 2 (1A)] |
| Appellate Controller of Estate Duty | संपदा शुल्क अपील नियंत्रक | [S. 2 (1A)] |
| Appellate Tribunal | अपील अधिकरण | [S. 2 (1B)] |
| appoint | विनियुक्त करणे | [S. 2 (a)] |
| articles of association | अधिसंघ नियमावली | [S. 37] |
| assessment | निर्धारण | [S. 2(12A)] |
| assessment year | निर्धारण वर्ष | [S. 33 (1). (0)-proviso] |
| assess or re-assess | निर्धारण किंवा फेरनिर्धारण करणे | [S. 59] |
| assignee | अभिहस्तांकिती | [S. 14(1) [ |
| associated operations | सहयोगी क्रिया | [S. 27(7)(iv)] |
| assurance | हक्क आश्वासनपत्र | [S. 11 (1)] |
| at one's instance | –च्या सांगण्यावरून | [S. 63(7)-proviso] |
| attributable | संबंधनीय | [S. 73(3)] |
| avoidance | चुकवणे | [S. 30] |
| award costs | परिव्यय देववणे | [S. 65 (3)] |
| bailiff | कारभारी | [S. 53 (1)-proviso |
| Bench | न्यायपीठ | [S. 64(10)] |
| beneficial interest | हितप्रद हितसंबंध | [S. 15-expl.] |
| beneficially entitled | हितार्थ हक्कदार | [S.52(3)(*iii*)] |
| by concert or arrangement | एकविचाराने ठरवून किंवा आपसात व्यवस्था करून | [S.13] |

| | | |
|---|---|---|
| by itself | स्वयमेव | [S.34(3)] |
| by virtue of or in consequence of | --च्या मुळे किंवा --चा परिणाम म्हणून | [S. 14(1)-expl.] |
| by way of composition | तोड म्हणून | [S. 69] |
| capital gain | भांडवली लाभ | [S. 50B] |
| carry out the purpose | प्रयोजन पार पाडणे | [S. 85(1)] |
| Central Board of Direct Taxes | केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ | [S. 2(2)] |
| cesser | समाप्त होणे | [S. 7(1)] |
| charge *vb.* | प्रभारित करणे | [S. 3(1)(*c*)] |
| *n.* | (१) प्रभार | [Part VIII-heading] |
| | (२) आकारणी | [Part II-heading] |
| chargeable | (१) आकारणीपात्र | [S. 33(1) (*o*)-proviso] |
| | (२) प्रभाराधीन | [S. 74(2)-proviso] |
| | (३) आकारणीयोग्य | [First Sch-heading] |
| charge of duty | शुल्क आकारणी | [Part II-heading ] |
| chartered accountant | सनदी लेखाकार | [S. 83-expl.(*c*)] |
| children and issue | अपत्ये व संतती | [S. 27(7)(*ii*)] |
| claims | हक्कमागण्या | [S. 69] |
| collateral disposition | सांपार्श्विक विल्हेवाट | [S. 11(2)-proviso(2)] |
| collection | उगराणी | [Part VII-heading] |
| committee | सुपूर्ददार | [S. 53(1)(*b*)] |
| commute | संराशीकरण करणे | [S. 68] |
| company | कंपनी | [S. 2(3)] |
| composition | तोड | [S. 69 |
| conclusion of appeal | अपिलाचा निर्णय | [S. 62(6)] |
| contract a debt | ऋण काढणे | [S. 47] |
| control | नियंत्रणाधिकार | [S. 17(4)(*ii*)(*a*)] |
| controlled company | नियंत्रित कंपनी | [S. 17(1)] |
| Controller of Estate Duty | संपदा शुल्क नियंत्रक | [S. 2(5)] |
| coparcenary | सहदायकी | [S. 7(2)] |
| coparcenary interest | सहदायकी हितसंबंध | [S. 34(*c*)] |
| corporation sole | एकव्यक्तिक निगम | [S. 7(4)-expl.] |
| court fees | न्यायालय फी | [S. 50] |
| dedication or endowment | समर्पण किंवा स्थायी देणगी | [S. 2(19)] |
| deduction | वजात | [Part VI-heading] |
| depreciation | मूल्यह्रास | [S. 36(2)-proviso] |
| derivative title | पोटहक्क | [S. 53(1)(*c*)] |
| determinable | समापनीय | [S. 24(2)-proviso] |
| determination | १. समापन | [S. 2(11)] |
| | २. निर्णय | [S. 64(4)] |
| determine | समापित करणे | [S. 11(1)] |
| discharge | प्रभारमुक्त करणे | [S. 75] |
| discharge (of incumbrance) | विमुक्ति | [S. 46(2)] |
| discovery | शोध घेणे | [S. 79(*b*)] |
| disposer | विल्हेवाटकर्ता | [S. 24-m.n.] |
| dispose of | --ची विल्हेवाट करणे | [S. 2(9)] |
| disposing capacity | विल्हेवाटशक्ति | [S. 6-m.n.] |
| disposition | विल्हेवाट | [S. 16(2)(*b*)] |
| distributed assets | वितरित मत्ता | [S. 19(1)-expl.] |
| divesting | निर्णिहिती | [S. 11(1)] |

| | | |
|---|---|---|
| double taxation | दुबार कराधान | [S.30] |
| dower | देज | [S.44(d)] |
| duplication of charge | दुबार आकारणी | [S.20(1)(*f*)] |
| | | |
| earmark | वेगळी काढून ठेवणे | [S.33(*k*)] |
| endowment | स्थायी देणगी | [S.2(19)] |
| enforcing the attendance | उपस्थित राहण्यास भाग पाडणे | [S.79(*a*)] |
| escape assessment | निर्धारणातून निसटणे | [S.59(*a*)] |
| estate | (१) संपदा | [S.4(2A)] |
| | (२) हक्कसंबंध | [S.3(1A)] |
| estate duty | संपदा शुल्क | [S.2(7)] |
| estate in remainder or reversion | उर्वरित किंवा प्रत्यावर्ती हक्कसंबंध | [S.2(11)] |
| estate or class of estates | संपदा किंवा संपदावर्ग | [S.4(2A)] |
| estimate | अंदाजे ठरवणे | [S.36(1)] |
| executive or ministerial staff | कार्यकारी किंवा लिपिकीय कर्मचारीवर्ग | [S.4(4)] |
| executor | मृत्युपत्रव्यवस्थापक | [S.2(8)] |
| exemption | सूट | [S.33(2)] |
| evidence on affidavit | प्रतिज्ञालेखाच्या स्वरूपात पुरावा | [S.79(c)] |
| examination of witness | साक्षीदाराची तपासणी | [S.79(*d*)] |
| exonerate | मुक्त करणे | [S.75-proviso] |
| | | |
| failure or determination of interest | हितसंबंध निष्फळ होणे किंवा समाप्त होणे | [S.23] |
| first charge | पहिला प्रभार | [S.74(1)] |
| fit case for appeal | अपील करण्यास योग्य प्रकरण | [S.65(1)] |
| floating security | तरती प्रतिभूती | [S.19(5)] |
| form | (१) प्रपत्र | [S.72] |
| | (२) नमुना | [S.72] |
| | (३) शब्दयोजना | [S.64(6)] |
| form of the question of law | विधिविषयक प्रश्नाची शब्दयोजना | [S.64(6)] |
| full consideration | संपूर्ण प्रतिफल | [S.16(2)-proviso] |
| future interest | भावी हितसंबंध | [S.2(11)] |
| | | |
| general power | कुलमुखत्यारी | [S.2(9)] |
| gift made in contemplation of death | मरणासन्नतेच्या कल्पनेने केलेले दान | [S.8-expl.] |
| gift *mortis causa* | मरणासन्न दान | [S.8-m.n.] |
| give effect to | (—ची) अंमलबजावणी करणे | [S.85(1)] |
| grantee | (प्रमाणपत्र) देण्यात आलेली व्यक्ती | [S.75] |
| grant of representation | प्रतिनिधित्व प्रदान करणे | [S.2(1)] |
| grantor | दाता | [S.26(1)] |
| | | |
| heir at law | कायदेशीर वारस | [S.53(2)] |
| heirloom | वंशपरंपरागत वस्तू | [S.33(1)(*i*)] |
| holding of shares | धारण केलेले शेअर्स | [S.20(1)(*f*)] |
| | | |
| imposition | बसवणे | [Part II-heading] |
| in a fiduciary capacity | विश्वासाच्या नात्याने | [S.2(9)] |
| incidence of duty | शुल्काचा भार | [S.19-m.n.] |
| incumbrances | बोजे | [S.2(10)] |
| in one's own power | आपल्या शक्तीनुसार | [S.69] |

| | | |
|---|---|---|
| instrument *inter vivos* | जीवित व्यक्तींच्या दरम्यानचा संलेख | [S.2(9)] |
| in succession | अनुक्रमाने | [S.24(2)] |
| interest in possession | कब्जागत हितसंबंध | [S.11(1)] |
| interest limited to cease on a death | मृत्यूबरोबर समाप्त होणारा मर्यादित हितसंबंध | [S.11(1)] |
| intestate | अकृतमृत्युपत्र व्यक्ती | [S.23-expl.(2)] |
| investment company | गुंतवणक कंपनी | [S.17(*iv*)] |
| issue | संतति | [S.27(7)(*ii*)] |
| issued share capital | विक्रीस काढलेले भाग भांडवल | [S.17(4)(*ii*)(b)] |
| issuing commissions | आयोगपत्रे काढणे | [S.79(*d*)] |
| joint investments | संयुक्त विनिधाने | [S.13-m.n.] |
| keep up | चालू ठेवणे | [S.14(1)] |
| killed in action | युद्धात मारला गेलेला | [S.33(*m*)] |
| lay out upon the trusts of a settlement | संव्यवस्थेखालील न्यासांच्या प्रीत्यर्थ खर्च करणे | [S.77(3)] |
| legal practitioner | विधिव्यवसायी | [S.83-expl.(*b*)] |
| letters of administration | प्रशासनपत्र | [S.50] |
| levy (of duty) | (शुल्क) बसवणे | [Long Title] |
| levying or realising estate duty | संपदा शुल्क बसवणे किंवा वसूल करणे | [S.81] |
| life tenant | तहहयात मालक | [S.21(1)(*ii*)] |
| limitation | (१) प्रक्रांतिव्यवस्था | [S.2(16)] |
| | (२) मर्यादा | [S.45-m.n.] |
| lineal descendant | रेषीय वंशज | [S.19(4)(*iii*)(*a*)] |
| loan creditors | कर्जदाते धनको | [S.17(4)(*iv*)] |
| locality | ठिकाण | [S.21(2)] |
| majority | (१) बहुसंख्याक | [S.64(10)] |
| | (२) बहुमत | [S.64(10)-proviso] |
| make arrangements with | –बरोबर व्यवस्था करणे | [S.81] |
| make allowance for | –बद्दल मजरा देणे | [S.44] |
| make or enter in settlement | संव्यवस्था करणे किंवा तीत भाग घेणे | [S.14(3)(*b*)] |
| managing agent | व्यवस्थापन एजंट | [S.2(14A)] |
| managing director | व्यवस्थापन संचालक | [S.2(14A)] |
| mistake apparent from the record | अभिलेखावरून उघड दिसून येणारी चूक | [S.61] |
| money or money's worth | पैसा किंवा पैशाचे सममूल्यक | [S.16(2)-proviso] |
| natural guardian | नैसर्गिक पालक | [S.33(*k*)] |
| necessities of life | जीवनावश्यक गरजा | [S.33(*k*)] |
| nominee | नामनियुक्त व्यक्ती | [S.14(1)] |
| notice of demand | मागणी-नोटीस | [S.62(1)] |
| obligation | आबंधन | [S.17(4)(*iii*)] |
| occupation | ताबा | [S.33(1)(*l*)] |
| official residence | अधिकृत निवासस्थान | [S.33(1)(*l*)] |
| of general public ulitity | सर्वसाधारणपणे सार्वजनिक उपयोगाचे | [S.2(17)] |
| omission or failure | न करणे किंवा कसूर करणे | [S.59(*a*)] |
| on the death | मृत्यू होताच | [S.2(16)] |
| otherwise than by virtue of | –च्या आधारे नव्हे तर अन्यथा | [S.11(2)-third proviso] |

| | | |
|---|---|---|
| partition | वाटणी | [S.39(2)] |
| payments | (१) भरणे | [S.17(3)-proviso] |
| | (२) रकमा | [S.17(3)-proviso] |
| period ascertainable only by reference to the death | मृत्यूच्या संदर्भातच विनिश्चित करता येण्यासारखा कालावधी | [S.2(16)] |
| persons, natural or juridical | नैसर्गिक किंवा विधिकल्पित व्यक्ती | [S.2(19)] |
| place | गाव | [S.33(1)(n)] |
| power | मुखत्यारी | [S.2(9)] |
| power to appoint property | संपत्ती विनियुक्त करण्याची मुख्यत्यारी | [S.2(13)] |
| precious or semi-precious stones | रत्ने किंवा रत्नवत् खडे | [S. 33(1)(e)] |
| present value | विद्यमान मूल्य | [S. 68] |
| principal value | ऐन मूल्य | [S. 2(12A)] |
| prints | छापप्रती | [S. 33(1)(*i*)] |
| probate | संप्रमाण | [S. 50] |
| property derived from the deceased | मृतामार्फत मिळालेली संपत्ती | [S. 16(2)(9)] |
| property passing on the death | मृत्यूबरोबर संक्रामित होणारी संपत्ती | [S. 2(16)] |
| prospective amount of duty | संभावी शुल्करक्कम | [S. 54(2)] |
| provision | देणे | [S. 46(1)-proviso] |
| provisional assessment | तात्पुरते निर्धारण | [S. 57(1)] |
| public | इतरेजन | [S. 17(4)(1)] |
| public charitable purpose | सार्वजनिक धर्मादाय प्रयोजन | [S. 2(17) |
| question of law | विधिविषयक प्रश्न | [S. 64(1)] |
| raising a duty | शुल्काची रक्कम उभारणे | [S. 19(3)] |
| rateable part | हिस्सेरशीने येणारा भाग | [S. 19(2)] |
| realising | वसूल करणे | [S. 48] |
| reciprocal arrangements | प्रतियोगी व्यवस्था | [S. 14(2)-proviso] |
| reciprocating country | प्रतियोगी देश | [S. 30-expl.] |
| reclaim | परत मागून घेणे | [S. 12(1)] |
| recoupment | भरपाई | [S. 16(1)-proviso] |
| recovery | वसुली | [S. 73-m.n.] |
| reduction | घट | [S. 36(2)] |
| reference | निर्देशन | [S. 63(7)-proviso] |
| refusal or rejection | नकार किंवा फेटाळणी | [S. 64(3)] |
| regular assessment | पक्के निर्धारण | [S. 57(3)] |
| regularly employed | कायम नेमलेली | [S. 83-expl. (a)] |
| release | मुक्त करणे | [S. 74(b)] |
| relative | नातेवाईक | [S.17(4)(*iii*)(*a*)] |
| relevant disposition | संबद्ध विल्हेवाट | [S. 11(2)-proviso] |
| relief | सवलत | [S.33 (2)] |
| relief of | –तून सुटका | [S. 30] |
| remit | माफ करणे | [S. 71] |
| remittance | पैसे पाठवणे | [S. 73(3)] |
| repayment | परत देणे | [S. 47] |
| report | अभिप्राय देणे | [S. 41] |
| represent | –चे प्रतिरूप असणे | [S. 2(15)] |

| | | |
|---|---|---|
| representation | प्रतिनिधित्व | [S. 2(18)] |
| require | (१) आज्ञा करणे | [S. 64(3)] |
| | (२) मागणी करणे | [S. 64(3)-proviso] |
| requisition | आज्ञापत्र | [S. 64(3)] |
| reserved benefit | राखीव लाभ | [S. 10-proviso] |
| restrictive provision | निर्बंधक उपबन्ध | [S. 37] |
| retain | ठेवून घेणे | [S. 11(2)(*a*)] |
| retrospective effect | पूर्वलक्षी प्रभाव | [S. 85(2)] |
| reversioner | प्रत्यावर्ती मालक | [S. 32] |
| Ruler | संस्थानाधिपति | [S. 33(1)(*l*)] |
| satisfaction of debt | ऋणाची फेड | [S. 46(2)] |
| scale of charges | आकारश्रेणी | [S. 4(3)] |
| school of law | विधिप्रणाली | [S. 7(2)] |
| secretary | सचिव | [S. 2(14A)] |
| securities | रोखे | [S. 84(2)] |
| settled property | संव्यवस्थाबद्ध संपत्ती | [S. 2(19)] |
| settlement | संव्यवस्था | [S. 2(19)] |
| settlements with reservation | हक्क राखून केलेल्या संव्यवस्था | [S. 12-m.n] |
| settlor | संव्यवस्थाकर्ता | [S. 12-expl.] |
| set upon | ठरवणे | [S. 68] |
| share | १. शेअर | [S. 84(2)] |
| | २. हिस्सा | [S. 39(1)] |
| share capital | भागभांडवल | [S. 17(4)(*ii*)(*a*)] |
| state a case | प्रकरण परिकथित करणे | [S. 64(3)(*a*)] |
| statements and forms | विवरणपत्रे व प्रपत्रे | [S. 72] |
| statement of particulars | तपशिलाचे विवरणपत्र | [S. 55] |
| stock | पुंजरोखा | [S. 84(2)] |
| sub-coparcenary | उपसहदायकी | [S. 7(2)-expl.] |
| subsidiary company | पोटकंपनी | [S. 17(4)(*i*)] |
| substantially interested | ठळकपणे हितसंबंधित | [S. 17(4)(*i*)] |
| succession certificate | उत्तराधिकार प्रमाणपत्र | [S. 50] |
| *sui juris* | स्वाधिकारी | [S. 29] |
| superannuation fund | वयोनिवृत्तिवेतन निधि | [S. 29A(b)(i)] |
| surrender | अभ्यर्पण | [S. 11(1)] |
| take effect (out of) | (–तून) निष्पन्न होणे | [S. 3(1)(*b*)] |
| time barred | मुदतबाह्य | [S. 64(3)(*b*)] |
| tort | अपकृत्य | [S. 17(3)(*b*)] |
| total | एकूण | [S. 34(2)] |
| to the best of one's knowledge and belief | स्वतःच्या उत्तम माहितीनुसार व समजुतीनुसार | [S. 56(1)(*a*)] |
| to the entire exclusion of | सर्वस्वी वगळून | [S. 10] |
| transferred territories | हस्तांतरित राज्यक्षेत्रे | [S. 5-expl.] |
| under-valuation | न्यूनमूल्यांकन | [S. 59(a)] |
| value chargeable | आकारणीपात्र मूल्य | [Part V-heading] |
| valuer | मूल्यांकनकर्ता | [S. 2(20)] |
| vendor | विक्रेता | [S. 26(1)] |
| vested or contingent | निहित किंवा समाश्रित | [S. 2(11)] |
| voting power | मतदानशक्ति | [S. 17(4)(*b*)] |

| | | |
|---|---|---|
| wealth | धनदौलत | [S. 52(3)(1)] |
| wind up and dissolve | समापित व विसर्जित करणे | [S. 18(1)] |
| without excessive sacrifice | बेसुमार भुर्दंड बसल्याशिवाय | [S. 70(1)] |
| work into | जडवणे | [S. 33(1)(e)] |

---

## संपदा शुल्क अधिनियम, १९५३

## THE ESTATE DUTY ACT, 1953

### मराठी-इंग्रजी शब्दसूची

| | | |
|---|---|---|
| अकृतमृत्युपत्र व्यक्ती | intestate | [S. 23-expl(2)] |
| अधिकृत निवासस्थान | official residence | [S. 33(1)(*l*)] |
| अधिसंघ नियमावली | articles of association | [S. 37] |
| अनुक्रमाने | in succession | [S. 24(2)] |
| अंदाजे ठरवणे | estimate | [S. 36(1)] |
| अपकृत्य | tort | [S. 17(3)(*b*)] |
| अपत्ये व संतती | children and issue | [S. 27(7)(*ii*)] |
| अपिलाचा निर्णय | conclusion of appeal | [S. 62(6)] |
| अपील अधिकरण | Appellate Tribunal | [S. 2(1B)] |
| अपीलकर्ता व उत्तरवादी | appellant and respondent | [S. 63(8)] |
| अपील करण्यास योग्य प्रकरण | fit case for appeal | [S. 65(1)] |
| अपील नियंत्रक | Appellate Controller | [S. 2(1A)] |
| अपील स्वीकृत करणे | admit an appeal | [S. 62(2)] |
| अभिप्राय देणे | report | [S. 41] |
| अभिलेखावरून उघड दिसून येणारी चूक | mistake apparent from the record | [S. 61] |
| अभिवृद्धि | advancement | [S. 2(17)] |
| अभिहस्तांकिती | assignee | [S. 14(1)] |
| अभ्यर्पण | surrender | [S. 11(1)] |
| (—ची) अंमलबजावणी करणे | give effect to | [S. 85(1)] |
| आकारणे | charge | [Part II-heading] |
| आकारणीपात्र | chargeable | [S. 33(1)(*o*)-proviso] |
| आकारणीपात्र मूल्य | value chargeable | [Part V-heading] |
| आकारणीयोग्य | chargeable | [First Schedule-Heading] |
| आकारश्रेणी | scale of charges | [S.4(3)] |
| आपल्या शक्तीनुसार | in one's own power | [S. 69] |
| आबंधने | obligations | [S. 17(4)(*iii*)] |
| आयोगपत्रे काढणे | issuing commissions | [S. 79(*d*)] |
| आज्ञा करणे | require | [S. 64(3)] |
| आज्ञापत्र | requisition | [S. 64(3)] |
| इतरेजन | public | [S. 17(4)(*i*)] |
| उगराणी | collection | [Part VII-heading] |
| उत्तराधिकार प्रमाणपत्र | succession certificate | [S. 50] |
| उपसहदायकी | sub-coparcenary | [S. 7-expl.] |
| उपस्थित राहण्यास भाग पाडणे | enforcing the attendance | [S. 79(*a*)] |
| उर्वरित किंवा प्रत्यावर्ती हक्कसंबंध | estate in remainder or reversion | [S. 2(11)] |

| | | |
|---|---|---|
| ऋण काढणे | contract a debt | [S. 47] |
| एकवट | 1. aggregate | [S.34(1)(c)] |
| | 2. aggregation | [S.34-m.n.] |
| एकवट निव्वळ प्राप्ती | aggregate net income | [S.17-(2)proviso (a)] |
| एकवट रक्कम | aggregate amount | [S.17-(e)] |
| एकविचाराने ठरवून किंवा आपसात व्यवस्था करून | by concert or arrangement | [S. 13] |
| एकव्यक्तिक निगम | corporation sole | [S. 7(4)-expl.] |
| एकूण | total | [S. 34(2)] |
| ऐन मूल्य | principal value | [S. 2(12A)] |
| कपात | abatement | [S. 46(1)-proviso] |
| कब्जागत हितसंबंध | interest in possession | [S. 11(1)] |
| कंपनी | company | [S. 2(3)] |
| कर्जदाते धनको | loan creditors | [S. 17(4)(*iv*)] |
| कायदेशीर वारस | heir of law | [S. 53(2)] |
| कायम नेमलेली | regularly employed | [S. 83-expl. (*a*)] |
| कारभार | affairs | [S. 17(2)(*ii*)(*a*)] |
| कारभारी | bailiff | [S. 53(1)-proviso] |
| कार्यकारी किंवा लिपिकीय कर्मचारीवर्ग | executive or ministerial staff | [S. 4(4)] |
| कुलमुखत्यारी | general power | [S. 2(*a*)] |
| केन्द्रीय प्रत्यक्ष कर मंडळ | Central Board of Direct Taxes | [S. 2(2)] |
| केलेली किंवा साहिलेली कोणतीही गोष्ट | anything done or suffered | [S. 57(4)] |
| गाव | place | [S. 53(1)(n)] |
| गुंतवणूक कंपनी | investment company | [S. 17(*iv*)] |
| घट | reduction | [S. 36(2)] |
| चालू ठेवणे | keep up | [S. 14(1)] |
| चुकवणे | avoidance | [S. 30] |
| --चे प्रतिरूप असणे | represent | [S. 15] |
| --च्या आधारे नव्हे तर अन्यथा | otherwise than by virtue of | [S. 11(2)-proviso (2)] |
| --च्या मुळे किंवा--चा परिणाम म्हणून | by virtue of or in consequence of | [S. 14(1)-expl.] |
| --च्या सांगण्यावरून | at one's instance | [S. 63-(7)-proviso] |
| छापप्रती | prints | [S. 33(1)(*i*)] |
| जडवणे | work into | [S. 33(1)(*e*)] |
| जीवनावश्यक गरजा | necessities of life | [S. 33(*k*)] |
| जीवित व्यक्तींच्या दरम्यानचा संलेख | instrument *inter vivos* | [S. 2(9)] |
| ठरवणे | set upon | [S. 68] |
| ठळकपणे हितसंबंधित | substantially interested | [S. 17(4)(i)] |
| ठिकाण | locality | [S. 21(2)] |
| ठेवून घेणे | retain | [S. 11(2)(*a*)] |
| तपशिलाचे विवरणपत्र | statement of particulars | [S. 55] |
| तरती प्रतिभूती | floating security | [S. 19(5)] |
| तहहयात मालक | life tenant | [S. 21(1)(*ii*)] |
| तात्पुरते निर्धारण | provisional assessment | [S. 57(1)] |
| ताबा | occupation | [S. 33 (*l*)(*i*)] |

| | | |
|---|---|---|
| —तून सुटका | relief | [S. 30] |
| तोड | composition | [S. 69] |
| तोड म्हणून | by way of composition | [S. 69] |
| दाता | grantor | [S. 26(1)] |
| दुबार आकारणी | duplication of charge | [S. 20(1)(*f*)] |
| दुबार कराधान | double taxation | [S. 30] |
| देज | dower | [S. 44(*d*)] |
| देणे | provision | [S. 46(1)-proviso] |
| (प्रमाणपत्र) देण्यात आलेली व्यक्ती | grantee | [S. 75] |
| धनदौलत | wealth | [S. 53(3)(*i*)] |
| धारण केलेले शेअर्स | holding of shares | [S. 20(1)(*f*)] |
| न करणे किंवा कसूर करणे | omission or failure | [S. 59(*a*)] |
| नकार किंवा फेटाळणी | refusal or rejection | [S. 64(3)] |
| नमुना | form | [S. 72] |
| नातेवाईक | relative | [S. 17(4)(*iii*)(*a*)] |
| नामनियुक्त व्यक्ती | nominee | [S. 14(1)] |
| नियंत्रणाधिकार | control | [S. 17(4)(*ii*)(*a*)] |
| नियंत्रित कंपनी | controlled company | [S. 17(1)] |
| निर्णय | determination | [S. 64(4)] |
| निर्णिहिती | divesting | [S. 11(1)] |
| निर्देशन | reference | [S. 63(7)-proviso] |
| निर्धारण | assessment | [S. 2(12A)] |
| निर्धारण किंवा फेरनिर्धारण करणे | assess or re-assess | [S. 59] |
| निर्धारण वर्ष | assessment year | [S. 33(1)(*o*)-proviso] |
| निर्धारणातून निसटणे | escape assessment | [S. 59(*a*)] |
| निर्बंधक उपबंध | restrictive provision | [S. 37] |
| निहित किंवा समाश्रित | vested or contingent | [S. 2(11)] |
| (—तून) निष्पन्न होणे | take effect (out of) | [S. 3(1)(b)] |
| नैसर्गिक किंवा विधिकल्पित व्यक्ती | persons, natural or juridical | [S. 2(19)] |
| नैसर्गिक पालक | natural guardian | [S. 33(*k*)] |
| न्यायपीठ | Bench | [S. 64(10)] |
| न्यायालय फी | court fees | [S. 50] |
| न्यूनमूल्यांकन | under-valuation | [S. 59(*a*)] |
| पक्के निर्धारण | regular assessment | [S. 57(3)] |
| परत देणे | repayment | [S. 47] |
| परत मागून घेणे | reclaim | [S. 12(1)] |
| परिव्यय देववणे | award costs | [S. 65(3)] |
| परिसमापित व विसर्जित करणे | wind up and dissolve | [S. 18(1)] |
| पहिला प्रभार | first charge | [S. 74(1)] |
| पुंजरोखा | stock | [S. 84(2)] |
| पूर्ण हितसंबंध | absolute interest | [S. 23-expl.] |
| पूर्वलक्षी प्रभाव | retrospective effect | [S. 85(3)] |
| पोटकंपनी | subsidiary company | [S. 17(4)(*i*)] |
| पोटहक्क | derivative title | [S. 53(1)(*c*)] |
| पैसा किंवा पैशाचे सममूल्यक | money or money's worth | [S. 16(2)-proviso] |
| पैसे पाठवणे | remittance | [S. 73(3)] |
| प्रकरण परिकथित करणे | state a case | [S. 64(3)(*a*)] |

| | | |
|---|---|---|
| प्रक्रांतिव्यवस्था | limitation | [S. 2(16)] |
| प्रतिनिधित्व | representation | [S. 2(18)] |
| प्रतिनिधित्व प्रदान करणे | grant representation | [S. 2(1)] |
| प्रतियोगी देश | reciprocating country | [S. 30-expl.] |
| प्रतियोगी व्यवस्था | reciprocal arrangements | [S. 14(2)-proviso] |
| प्रतिज्ञालेखाच्या स्वरूपात पुरावा | evidence on affidavit | [S. 79(c)] |
| प्रत्यावर्ती मालक | reversioner | [S. 32] |
| प्रपत्र | form | [S. 72] |
| प्रभार | charge | [Part VIII-heading] |
| प्रभाराधीन | chargeable | [S. 74(2)-proviso] |
| प्रभारित करणे | charge | [S. 3(1)(c)] |
| प्रभारमुक्त करणे | discharge | [S. 75] |
| प्रमाण किंवा मूल्य | amount or value | [S. 53(4)] |
| प्रयोजन पार पाडणे | carry out the purpose | [S. 85(1)] |
| प्रशासनपत्र | letters of administration | [S. 50] |
| प्रोद्भूत होणारा किंवा उपत्न्न होणारा | accruing or arising | [S. 39(1)] |
| —बद्दल मजरा देणे | make allowance for | [S. 44] |
| —बरोबर व्यवस्था करणे | make arrangements with | [S. 81] |
| बसवणे | imposition | [Part II-heading] |
| (शुल्क) बसवणे | levy (of duty) | [Long Title] |
| बहुमत | majority | [S. 64(10)-proviso] |
| बहुसंख्याक | majority | [S. 64(10)] |
| बेसुमार भुर्दंड बसल्याशिवाय | without excessive sacrifice | [S. 70(1)] |
| बोजे | incumbrances | [S. 2(10)] |
| भरणे | payments | [S. 17(3)-proviso] |
| भरपाई | recoupment | [S. 16(1)-proviso] |
| भागभांडवल | share capital | [S. 17(4)(*ii*)(*a*)] |
| भांडवली लाभ | capital gains | [S. 50B] |
| भावी हितसंबंध | future interest | [S. 2(11)] |
| मजरा | allowance | [S. 31-m.n.] |
| मजरा घालणे | allow as a deduction | [S. 26(2)] |
| मतदानशक्ति | voting power | [S. 17(4)(6)] |
| मरणासन्न दान | gift *mortis causa* | [S. 8-m.n.] |
| मरणासन्नतेच्या कल्पनेने केलेले दान | gift made in comtemplation of death | [S. 8-expl.] |
| मर्यादा | limitation | [S. 2(16)] |
| मागणी करणे | require | [S. 64(3)] |
| मागणी-नोटीस | notice of demand | [S. 62(1)(*a*)] |
| माफ करणे | remit | [S. 71] |
| मुक्त करणे | 1. release | [S. 74(3)] |
| | 2. exonerate | [S. 75-proviso] |
| मुखत्यारी | power | [S. 2(*a*)] |
| मुदतबाह्य | time barred | [S. 64(3)(*b*)] |
| मूल्यऱ्हास | depreciation | [S. 36(2)-proviso] |
| मूल्यांकनकर्ता | valuer | [S. 20] |
| मृतामार्फत मिळालेली संपत्ती | property derived from the deceased | [S. 16(2)(6)] |
| मृत्युपत्रव्यवस्थापक | executor | [S. 2(8)] |

| | | |
|---|---|---|
| मृत्यूच्या संदर्भातच विनिश्चित करता येण्यासारखा कालावधी | period ascertainable only by reference to the death | [S. 2(16)] |
| मृत्यूबरोबर संक्रामित होणारी संपत्ती | property passing on the death | [S. 2(16)] |
| मृत्यूबरोबर समाप्त होणारा मर्यादित हितसंबंध | interest limited to cease on a death | [S. 11(1)] |
| मृत्यू होताच | on the death | [S. 2(16)] |
| युद्धात मारला गेलेला | killed in action | [S. 33-m.n.] |
| रकमा | payments | [S. 17(3)-proviso] |
| रत्ने किंवा रत्नवत् खडे | precious or semi-precious stones | [S. 33(1)(*e*)] |
| राखीव लाभ | reserved benefit | [S. 10-proviso] |
| रेषीय वंशज | lineal descendant | [S. 17(4)(*iii*)(*a*)] |
| रोखे | securities | [S. 84(2)] |
| वंशपरंपरागत वस्तू | heirloom | [S. 33(1)(j)] |
| वजात | deduction | [Part VI-heading] |
| वयोनिवृत्तिवेतन निधि | superannuation fund | [S. 29A(b)(i)] |
| वसुली | recovery | [S. 73-m.n.] |
| वसूल करणे | realise | [S. 48] |
| वाटणी | partition | [S. 39(2)] |
| वार्षिकी | annuity | [S. 27(7)(*iii*)] |
| विक्रीस काढलेले भाग भांडवल | issued share capital | [S. 17(4)(*ii*)(*b*)] |
| विक्रेता | vendor | [S. 26(1)] |
| वितरित मत्ता | distributed assets | [S. 19(1)-expl.] |
| विद्यमान मूल्य | present value | [S. 68] |
| विधिप्रणाली | school of law | [S. 7(2)] |
| विधिविषयक प्रश्न | question of law | [S. 64(1)] |
| विधिविषयक प्रश्नाची शब्दयोजना | form of the question of law | [S. 64(6)] |
| विधिव्यवसायी | legal practitioner | [S. 83-expl.(*b*)] |
| विनियुक्त करणे | appoint | [S. 2(9)] |
| विमुक्ति | discharge (of incumbrance) | [S. 46(2)] |
| विरुद्ध कब्जा | adverse possession | [S. 53(2)] |
| विल्हेवाट | disposition | [S. 16(2)(*b*)] |
| ---ची विल्हेवाट करणे | dispose of | [S. 2(9)] |
| विल्हेवाटकर्ता | disposer | [S. 24-m.n.] |
| विल्हेवाटशक्ति | disposing capacity | [S. 6-m.n.] |
| विवरणपत्रे व प्रपत्रे | statements and forms | [S. 72] |
| विश्वासाच्या नात्याने | in a fiduciary capacity | [S. 2(9)] |
| वेगळे काढून ठेवणे | earmark | [S. 33(k)] |
| व्यवस्थापन एजंट | managing agent | [S. 2(14A)] |
| व्यवस्थापन संचालक | managing director | [S. 2 (14A)] |
| व्याज देववणे | allow interest | [S. 64(7)] |
| शब्दयोजना | form | [S. 64(6)] |
| शुल्क आकारणी | charge of duty | [Part II-heading] |
| शुल्काचा भार | incidence of duty | [S. 19-m.n.] |
| शुल्काची रक्कम उभारणे | raising a duty | [S. 19(3)] |
| शेअर | share | [S. 84(2)] |
| शेतजमिनी | agricultural lands | [S. 5(2)] |
| शोध घेणे | discovery | [S. 79(*b*)] |
| संयुक्त विनिधाने | joint investments | [S. 13-m.n.] |
| संराशीकरण करणे | commute | [S. 68] |

| | | |
|---|---|---|
| संव्यवस्था | settlement | [S. 2(19)] |
| संव्यवस्था करणे किंवा तीत भाग घेणे | make or enter in settlement | [S. 14(3)(*b*)] |
| संव्यवस्थाकर्ता | settlor | [S. 12-expl.] |
| संव्यवस्थाबद्ध संपत्ती | settled property | [S. 2(19)] |
| संव्यवस्थेखालील न्यासांच्या प्रीत्यर्थ खर्च करणे | lay out upon the trusts of a settlement | [S. 77(3)] |
| संस्थानाधिपति | Ruler | [S. 33(1) (*l*)] |
| सचिव | secretary | [S. 2(14A)] |
| संचयी प्राप्ती | accumulations | [S. 27(7)(*iv*)(*a*)] |
| संतति | issue | [S. 27(7)(*ii*)] |
| सनदी लेखाकार | chartered accountant | [S. 83-expl.(e)] |
| समापन | determination | [S. 2(11)] |
| समापनीय | determinable | [S. 24(2)-proviso] |
| समापित करणे | determine | [S. 11(1)] |
| समापित व विर्सजित करणे | wind up and dissolve | [S. 18(1)] |
| समर्पण किंवा स्थायी देणगी | dedication or endowment | [S. 2(19)] |
| समाप्त होणे | cesser | [S. 7(1)] |
| संपत्ती विनियुक्त करण्याची मुखत्यारी | power to appoint property | [S. 2(13)] |
| संपदा | estate | [S.4(2A)] |
| संपदा किंवा संपदा वर्ग | estate or classes of estate | [S.4(2A)] |
| संपदा शुल्क | estate duty | [S.2(7)] |
| संपदा शुल्क अपील नियंत्रक | Appellate Controller of Estate Duty | [S.2(1A)] |
| संपदा शुल्क नियंत्रक | Controller of Estate Duty | [S.2(5)] |
| संपदा शुल्क बसवणे किंवा वसूल करणे | levying or realising estate duty | [S.81] |
| संपूर्ण प्रतिफल | full consideration | [S.16(2)-proviso] |
| संप्रमाण | probate | [S.50] |
| संबद्ध विल्हेवाट | relevant disposition | [S.11(2)-proviso] |
| संबंधनीय | attributable | [S.73(3)] |
| संभावी शुल्करक्कम | prospective amount of duty | [S.54(2)] |
| सर्वसाधारणपणे सार्वजनिक उपयोगाचे | of general public utility | [S.(2)(17)] |
| सर्वस्वी वगळून | to the entire exclusion of | [S.10] |
| सवलत | relief | [S.33(2)] |
| सहदायकी | coparcenary | [S.7(2)] |
| सहदायकी हितसंबंध | coparcenary interest | [S.34(c)] |
| सहयोगी क्रिया | associated operations | [S.27(7)(*iv*)] |
| सांपार्श्विक विल्हेवाट | collateral disposition | [S.11(2)-proviso (2)] |
| सार्वजनिक धर्मादाय प्रयोजन | public charitable purpose | [S.2(17)] |
| साक्षीदाराची तपासणी | examination of witness | [S.79(*d*)] |
| सुपूर्ददार | committee | [S.53(1)(*b*)] |
| सूट | exemption | [S.33(2)] |
| स्वतःच्या उत्तम माहितीनुसार व समजुतीनुसार | to the best of one's knowledge and belief | [S.56(1)(*a*)] |
| स्वयमेव | by itself | [S. 34(3)] |
| स्वाधिकारी | *sui juris* | [S.29] |
| हक्क आश्वासनपत्र | assurance | [S.11(1)] |
| हक्कमागण्या | claims | [S.69] |
| हक्क राखून केलेल्या संव्यवस्था | settlements with reservation | [S.12-m.n.] |
| हक्कसंबंध | estate | [S.3(1A)] |
| हस्तांतरित राज्यक्षेत्रे | transferred territories | [S.5-expl.] |
| हितप्रद हितसंबंध | beneficial interest | [S.15-expl.] |
| हितसंबंध निष्फळ होणे किंवा समाप्त होणे | failure or determination of interest | [S.23] |
| हितार्थ हक्कदार | beneficially entitled | [S.52(3)(*iii*)] |
| हिशेब-वर्षे | accounting years | [S.17(2)] |
| हिस्सा | share | [S. 39(1)] |
| हिस्सेरशीने येणारा भाग | rateable part | [S.19(2)] |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई